साहामाही " ३ " ८८
सालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास ........................ ४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ........०१

Annum in arrears 7 ,,1Rs 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy..................................4as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

Advertisement
Below 10 lines...2Rs
per line over10... 4 as
Repetition perline 3 as

VOL XXVII AKOLA MONDAY 3 APRIL 1893 NO. 13

वर्ष २७ आकोला सोमवार तारीख ३ माहे एप्रील सन १८९३ इ० अंक १३

## CLEMENTS TONIC

### दुखणेकऱ्यास संजीवनी

### क्लेमेंटचें टानिक.

( दुनियेचा पौष्टिक दवा )

क्लेमेंटचें टानिक ही रामबाण, त्वरित, आणि काय ती एकच खात्रीची औषधि आहे. तिच्या योगें मज्जूतील क्षीणता; शरीराचा ऱ्हास, चेतनाशक्तीचा हीनपणा, साधारण अशक्तता, कण्यांतलि थकवा, धातुश्राव आणि दुष्ट हवा, मनस्वी क्लेश, दगदग, दुर्व्यसन, दुरुपयोग, मूर्खपणा अगर अविचार या पासून शरीर क्षीण होऊन ज्या व्याधि जडतात त्या सर्व व्याधि व रोग दूर होतात.

क्लेमेंटचे टानिक स्वाभाविकपणेंच मनुष्याच्या शरीराला हुषारी आणते, क्षीण व अशक्त मनुष्यास तजेला व शक्ति देते. कमकुवत मनुष्यास सदृढ, बळकट व वीर्यवान बनविते आणि नाजूक स्त्रिया बांध्यानें मजबूत व पाणीदार अशा करितें.

तरुण, मध्यम वयाचे, व म्हातारे पुरुष व स्त्रिया यांस खात्रीचे गुणावह औषध म्हणजे क्लेमेंट टानिक असें आढळलें. शारीरिक मानसिक मनस्वी दगदग, दुःख, उघड्या हवेंत राहणें, गुप्तस्राव, छांदिष्टपणा यां पासून ज्यांना विकृति जडतात अथवा ज्यांनीं अज्ञानपणानें व खोडसाळपणानें प्रकृति बिघडून घेऊन स्वतांवर अनेक दुःखें ओढून घेतलीं त्या सर्वांस याचा गुण आला आहे. शरिर क्रमाक्रमानें थकत चाललें असतांना त्या ऱ्हासाचीं लक्षणें या औषधानें ताबडतोब नाहींतशीं होतात आणि कमी कमी झालेल्या शक्ति पूर्ती प्रमाणें जोमदार होऊन प्रकृति निकोप होते. मुख्य मुख्य इंद्रियें कमताकत झालीं, मेंदू बिघडला, शरीराचे व मनाचे व्यापार कुंठले, विचारांचा घोटाळा झाला, ज्याचा त्याला भरंवसा वाटेनासा झाला, स्वभाव अनावर व तीव्र कोपी झाला, उदासीनता व भित्रेपणा वाटला, गुडघे व पाठ थकली, छाती धडधडूं लागली, वातशूल झाला, कंबरेत सलका मारल्या तसेंच पाठींत दुखणें वेळोवेळ दात दुखणें अन्यत्र तिडकणें झोंप नाहींशी होणें, कपाळ दुखणें पहाटेस थकवा येऊन अवयव दुखणें, मूत्रपिंड व मूत्राशय यांची आग होणें लघवी पांढरी होणें परमा व गुप्तस्राव यांनीं धातुपात होणें या व्याधि झाल्या अथवा स्त्रीपुरुषास आपल्या जन्मांतलीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या बजावण्यास नालायक करणारा व त्यांच्या कामांत व्यत्यय आणणारा असा मानसिक व शारीरिक कोणताही आजार झाला तर या सर्वांवर क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय ठरला आहे व ठरत आहे.

क्लेमेंटचें टानिक हें खरोखरीच मनुष्यमात्रास एक ईश्वरी देणगीच मिळालेली आहे हें घेतल्या बरोबरच आपला रोगनाशक अद्भुत प्रभाव दाखवूं लागतें. ह्याविषयीं घेणारांची साक्ष सर्वत्र व विश्वसनीय अशी आहे. ते म्हणतात कीं, ह्याच्या प्रत्येक मात्रानें गुण येऊं लागतो. हें ज्ञानतंतूचीं जबरदस्त शक्ति वाढविणारें टॅनिक असून हें शरीरांतील सर्व अवयवांना व स्नायूंना ज्ञान तंतू योगानें पूर्व स्थितीवर आणणारें शक्तिदायक सत्व पोहोंचवितें; इतकेंच नाहीं पण तीक्ष्ण रोग थकवा, मेहनत, अतिश्रम अथवा कित्येक कुकर्माच्या योगें शरीरप्रकृति अशक्त झाली असली, किंवा जोंवर ज्ञानतंतूंची अशक्तता, साधारण किंवा स्थानिक अशक्तता चालू असेल तोंवर कोणत्याही कारणानें अशक्तता आलेली असली तरी हे औषध घेतल्यावर गुण आल्यावांचून राहणार नाहीं. जोंपर्यंत क्षीणता व ज्ञानतंतूंची अशक्तता हींच रोगाचीं कारणें असतील तोंपर्यंत, क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय आहे.

रोग्यांनीं लक्षांत ठेवावें कीं क्लेमेंटचें टानिक हेंच एक खात्रीचें औषध आहे, सर्व गांध्याकडे व बाजरांत तें विकत मिळतें F. Moor Clements. ही सही पेटीच्या बुडाशीं व वरच्या भागीं पाहून त्याची खात्री करून घेतांना सावधगिरी ठेवावी, आणि जे नकलीं औषधें विकतात त्यांच्या पासून घेऊं नये. 'क्लेमेंटचें टानिक' नांवानें शोध करा, आणि तेंच अस्सल औषध घ्या. हाड, मज्जा, व स्नायु ही यानें बनतात, आणि रक्त व मेंदु यांना हें फार मानवतें. हें घेतल्यानें प्रकृति सदृढ, बळकट, ताकतदार, आणि जोमदार होते आणि दुनियेंत या सारखी ईश्वरी देणगी दुसरी नाहीं.

इंडियांतील एजंट—केंप आणि को, ट्रेचर आणिको मुंबई, बालंटाईन को; स्मिथ, स्टानिस्टिट को, बोनन को, कलकत्ता; डब्ल्यू इ. स्मीथ को, मद्रास; एन. एस. फरनानडो, कोलम्बो; आणि सर्व ठोकळ व किरकोळ गांध्याचीं दुकान.

F. M. Clements, Inventor Sydney, Australia.

## अर्थशास्त्र.

( ११ वे अंकावरून पुढें चालूं )

### भांडवल.

अर्थोत्पत्तीस जशी जमीन आवश्यक आहे, तसेंच श्रमही आवश्यक आहेत, ही गोष्ट आह्मी येथें वर जे विवेचन केलें त्यावरून समजून आलीच असेल. परंतु नुसत्या जमीनीनें, व श्रमानें अर्थोत्पत्तीचें काम अबाधित व पूर्णपणें होऊं शकत नाहीं. तर त्यास तिसऱ्या एका गोष्टीची अनुकूलता लागते. ती गोष्ट कोणती ह्मणाल तर भांडवल. सम्पत्ती आणि पैसा ही एक नाहींत. आतां भांडवल ह्मणजे काय हें पाहूं. कित्येकांचा समज असा आहे कीं, भांडवल व पैसा हे एका अर्थाचे शब्द आहेत. परंतु पैसा ह्मणजे क्रयविक्रयाचें साधन, व किंमतीचें परिमाण आहे, असें जें पूर्वीं सांगितलें आहे, त्याचा विचार केला ह्मणजे, जशी संपत्ती आणि पैसा हीं एक नाहींत, तसेंच भांडवल व पैसा ही पण एक नाहींत, असें तेव्हांच समजून येईल. तर भांडवल ह्मणजे जर पैसा नाहीं तर तें काय आहे हा प्रश्न राहिलाच. ह्मणून भांडवलाची अशी व्यवस्था करितां येईल. कीं "भांडवल ह्मणजे संपत्तीतून मागे टाकलेली बचत जी पुढें नवीन संपत्ती उत्पन्न करण्यास सहाय भूत होते ती" कांहीं लोकांचें असें ह्मणणें आहे कीं संपत्तीच्या उत्पत्तीस, भांडवलाची जरूरी नाहीं; व ह्या प्रतिपादनाचे पुष्टीकरणार्थ असें उदाहरण देतात कीं रानटी मनुष्य आपला उदरनिर्वाह कंद मुळें व फळें मिळवून करितो व त्याजपाशी पूर्वींचा कांहीं संग्रह नसतो. तसेंच एखाद्या सुधारलेल्या देशांतील एखादा मनुष्य एखाद्या ओसाड बेटांत येऊन पडला तर तो आपल्या मेहनतीनें जमिनी पासून आपले निर्वाहाचे पदार्थ उत्पन्न करूं शकतो; व हळूंहळू त्याजजवळ संपत्ती जमते परंतु हें ह्मणणें खरें नसून भ्रांतिमूलक आहे. कारण वर सांगितलेला रानटी मनुष्य, गारेचें हत्यार बनवून, तें उपयोगांत आणूं लागल्या बरोबर तो भांडवला शिवाय आहे, असें ह्मणतां येत नाहीं. तसेंच राबीनसन क्रुसोनें सोमवारीं जमा केलेल्या फळांतून, अर्धीं फळें, मंगळवारीं आपल्या होडीचें काम व्यत्यय न येता करितां यावें, ह्मणून मागें टाकिल्या बरोबर, तोही भांडवलाशिवाय होता असें ह्मणतां येत नाहीं. ह्मणून साधारणपणें असें ह्मटलें पाहिजे, कीं अर्वाचीन काळच्या संसार स्थितीस, व अर्वाचीन उद्योग धंद्यांत भांडवल हें संपत्तीच्या उत्पत्तीस, ज्या गोष्टींची आवश्यकता आहे, त्यांपैकींच एक आहे.

मनुष्याचा निर्वाह पूर्वीं मिळवून ठेविलेल्या संपत्तीनें झाला नाहीं, तर शेतकीचीं कामें चालावयाचीं नाहींत धान्य पेरल्या पासून ते पिकून उपयोगी पडे पर्यंत, मध्यंतरी बराच काळ जातो. ह्मणून त्या अवकाशांत मजुरांचा निर्वाह, त्यांचे श्रम जे पदार्थ उत्पन्न करण्यास सहाय भूत होतात त्या पदार्थांवर होत नाहीं हें उघड आहे; तर त्यांना, किंवा दुसऱ्या मजुरानीं पूर्वीं मिळवून संग्रह केलेल्या संपत्तीवर होतो व ह्याच संपत्तीस भांडवल ह्मणतात. प्राचीन काळीं शेतकरी लोक, मजुरास मजुरी बद्दल पैसे न देतां धान्य, फळें वगैरेच देत असत ह्मणून वर सांगितलेली गोष्ट ज्यास्त स्पष्ट होते. अलीकडे शेतकरी व दुसरे कारखानदार आपआपला माल विकून जे पैसे येतात, त्यांतूनच मजुरांस मजुरी देण्याची वहिवाट सर्वत्र पडलेली आहे. आतां हा मजुरीचा पैसा, पूर्वीं संग्रह केलेल्या संपत्तीचेंच रूपांतर होय. ह्मणून ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, मजुरास हा जो पैसा दिला जातो, तो भांडवल नाहीं. तर ह्या पैशानें अन्न, वस्त्र वगैरे जरुरीचे पदार्थ येतात तें भांडवल आहे. सोन्या रुप्यानें मजुरांचा निर्वाह होत नाहीं; व त्यांचा मोबदला जर निर्वाहास लागणाऱ्या पदार्थांशीं केला नाहीं, तर त्यांचा कांहीं उपयोग नाहीं. दुकाळांत कधीं कधीं असें होतें कीं जवळ पुष्कळ पैसा असून, धान्यादि पदार्थ मिळत नाहींत. त्यामुळें उपाशी मरण्याचा प्रसंग येतो. यावरून पैशाचा प्रत्यक्ष कांहीं उपयोग नाहीं, हें उघड होतें.

कित्येकांचें असें ह्मणणें आहे कीं मजुरांची मजुरी भांडवलांतून दिली जात नसून तीं जें काय उत्पन्न करितात, त्यांतूनच त्यांना मजुरी मिळते. ह्मणजे श्रम आपली मजुरी बरोबर काढितात ह्या गोष्टीचे पुष्टीकरणार्थ, त्यांचे असें ह्मणणें पडतें कीं, एक आठवड्याचे नांगरटीस मजुरास जर १० रुपये द्यावे लागले वर याचें कारण असें आहे कीं नांगरलेल्या शेताची किंमत पडित शेतापक्षां जास्त असते; ह्मणून मजुरांनीं ही नवीन संपत्ती उत्पन्न केली, व तीतूनच त्यांची मजुरी निघाली. आतां ही गोष्ट खरी आहे कीं मजुरी व नफा यांचें मूळ अखेर श्रम व भांडवल ही एकत्र होऊन जें काय उत्पन्न करितात, त्यांच्या किंमतींतच आहे; परंतु माल तयार होईपर्यंत मजुरांस मजुरी देण्याची जबाबदारी भांडवलवाले आपले अंगावर घेतात मग माल तयार होण्यास महिन्यांचे महिने लागले तरी हरकत नाहीं.

व कधीं कधीं तर असें होतें कीं माल तयार झाल्यावर त्यांस गिऱ्हाईक मिळत नाहीं. तेव्हां अशा स्थितींत मजुरास मजुरी उघड उघड भांडवलांतूनच ह्मणजे पूर्वीं मागें टाकिलेल्या संपत्तीतूनच दिली जाते असें कोणासही कबूल करावें लागेल. समजा, कांहीं मजुरांनीं एक शेत पेरलें आहे; त्यांत पाऊस कमी झाला ह्मणून ह्मणा किंवा गारा पडल्यानें ह्मणा, कांहीं उत्पन्न झालें नाहींतर अशा स्थितींत मजुरास मजुरी मुळींच मिळू शकणार नाहीं. असें एखादे वेळेस त्यांचे काम फसलें तर जवळ कांहीं पूर्वींची बचत नसल्यामुळें त्यांचे फार हाल होतात. ह्मणून स्वतंत्रपणें कामें न घेतां मजुरीनें तीं करणें त्यांना सोईचें पडतें.

प्रत्येक कारखान्यांत मजुरास देण्या करितां जें भांडवल खर्च होतें त्यास मजुरी 'फंड' असें ह्मणतात आतां ह्या फंडाचा सर्वच भाग उत्पादक श्रम करण्याचे पोषणाकडे खर्ची पडतो असें नाहीं; तर ज्यांचें श्रमापासून कांहीं संपत्ती उत्पन्न होत नाहीं, त्यांचे कडेही खर्च होतो ह्मणून जेवढा भाग उत्पादक श्रम करण्याकडे खर्च होतो तेवढाच भाग भांडवल होऊं शकतो. तेव्हां मजुरी फंडाचे अर्थातच दोन

भाग झाले.  पुढें चालेल.

वऱ्हाडसमाचार

मित्ती चैत्र वद्य २ शंक १८१५

सर चार्लस इलियट बंगालचे लेफ्टेनंट गव्हरनर यांनीं त्या इलाख्यांतील ज्यूरीची न्यायपद्धति बंद केल्या बद्दल एकदम हुकूम सोडिला होता. आणि त्या अन्वयें अंमलबारी झाली तरी बंगालचे लोक पक्के निश्चयाचे असल्या मुळें त्यांनीं तो हुकूम रद्द करण्यासाठीं शास्त्रोक्त व राजनिष्ट उपायांनीं आपले प्रयत्न सतत चालूं ठेविले. बाबू लोकांनीं एकाग्रतेनें, निस्सीमपणानें व अभिमानानें महान् भगिरथ प्रयत्न केले आणि आतां मोठ्या आनंदाची बातमी कळते कीं, गेल्या बुधवारीं पूर्वीचा हुकूम रद्द करण्यांत आला. त्या हुकूमाच्या बचावला विषयीं विचार करण्यास नेमलेल्या ज्यूरी कमिशननें आपला रिपोर्ट हिंदुस्थान सरकाराप्रत सादर केला आहे आणि त्यांतील अभिप्राया बरहुकूमच पहिल्या दंडेलीच्या हुकुमास हरताळ लावण्यांत आला. ज्यूरीमध्यें मतभेद पडून ह्मणण्या सारखी दुफळी झाली नाहीं. व्हाइसराय साहेबांनीं स्टेट सेक्रेटरीस तारेनें ज्युरी कमिशनचा ठोंक अभिप्राय कळविला आहे आणि त्यावर उलट जबाब अनुकूलतेचा मिळाल्या बरोबर ज्यूरीच्या संबधानें कमिशननें केलेल्या सुधारणा करण्यांत येतील. कमिशनमध्यें सर रोमेशचंद्र मित्र व सर जोतेंद्र मोहन टागोर हे सभासद होते आणि रिपोर्टी विषयीं सर्व सभासदांचा एक विचार व एक मत हीं दिसून आलीं. त्यावरून ज्युरीची पद्धत अधीक सोयस्कर, लोकप्रिय व सन्मार्गदर्शीक होईल असेच नवे फेरफार सुचविले असावेत. अपराधांची वर्गवारी नव्यान तत्वावर करून क्रिमिनल प्रोसिजर मध्यें काहीं बदल करावयाचे आहेत. ज्युरीची पद्धत नको ह्मणणाऱ्या लोकांचे जे आक्षेप असत त्यांचें निरसन होईल आणि ज्यूरीच्या पद्धतीनें कित्येक वेळा गैरकायद्या व गर्हणीय असे जे प्रकार न्यायाला सोडून होत असत, त्यांची पुनरावृत्ति न होईल अशा बद्दल विशेष काळजीच्या सूचना कमिशननें केल्या आहेत. असो, समूळ वृक्ष उपटून टाकण्याचा विचार झाला होता त्या ऐवजीं ‘ कीं तोडितां तरू फुटे आणखी भरानें ’ या तत्वावर व्यवस्था झाली आणि ज्युरी प्रश्नाचा निकाल लाभकारक, व संतोषकारक असा होण्याच्या मार्गांव आहे ही मोठ्या हर्षाची गोष्ट होय. बंगाल्यांतील लोकमताचा प्रभाव, त्याचा सरकारावर दाब व लोकांचे एकमार्गी दीर्घ प्रयत्न हे पाहून इतर इलाख्यांनीं बाबू लोकांचे अभिनंदन करून त्यांचा कित्ता उचलावा असें आह्मी मनापासून इच्छितों.

मुंबईच्या पार्शी लोकांनीं एक मोठें प्रशंसनीय व अनुकरणीय संस्था काढली आहे. गर्भिणी स्त्रियांस बाळंतपणांत अनेक ताप व व्याधि जडतात आणि त्यापासून पुष्कळ बायका मृत्युमुखीं पडतात. मुंबईचे डाक्टर तेमुलजी नारीमन यांस शोध करितां करितां असें आढळलें कीं बाळंतपणांत रोग जडण्यास कारणें आरोग्यतेच्या शास्त्राला सोडून असलेले बाळंतपणाचे उपचार होत. पुष्कळ बायकांस हवा पाणी स्वच्छ, जागा माफक उष्णतेची व अन्य उपाय शरीरप्रकृतीला मानवणारे असे मिळत नाहींत. धनबल व मनुष्यबल ज्या घरीं आहे अशा स्थलीं ही वरील अडचणी अढळतात आणि योग्य व आवश्यक वैद्यकाची मदत बाळंतपणाच्या ऐन वेळेवर न मिळाल्यामुळें पुष्कळ मातृपदास पोचलेल्या स्त्रिया अनेक उपस्थित व्याधींनीं शेवटीं प्राणास मुकतात. असली हानि पार्शी लोकांतच काय पण किंबहुना त्यांच्या पेक्षां अधीक पटीनें आपल्या लोकांत ही वारंवार होत असते. पण ईश्वरावर हवाला सोंपविण्या पलीकडे आमच्या लोकांनीं कांहीं प्रयत्न केल्या विषयीं आम्हास स्मरत नाहीं. मुंबईच्या पार्शी लोकांनीं एक इस्पितळ काढिलें आहे आणि त्या ठिकाणीं गर्भिणी बाया प्रसूतीच्या समयाला जाऊन राहतात. त्या दवाखान्यांत त्यांची सर्व सुश्रूषा होऊन त्या सुखरूप पणें बाळंतपणांतून पार पडतात. बाळंतपण म्हणजे एक जीवावरची शिकारच आहे. तींत यश मिळतें तेव्हां स्त्री पुनर्जन्म होऊन परत मिळाली असें लोक मानतात तें कांहीं खोटें नाहीं. वास्तविकच वेळ तशा आणिबाणीची असते. तेव्हां अशा समयासाठीं स्वतंत्र दवाखाना व तत्संबधी सर्व सोयी असणें किती आवश्यक आहे हें लिहून कळविता येत नाहीं.

स्त्रियांचा बाळंतपणा निमित्त दवाखाना मुंबईस निघून सहा वर्षें झालीं. या संस्थेसाठीं नवीन इमारत बांधली जाणार आहे तिच्या पायाचा दगड बसविण्याचा समारंभ लेडी हारिस यांच्या हातून गेल्या आठवड्यांत झाला. त्या वेळीं त्या दवाखान्याची हकिकत सांगण्यांत आली तिजवरून अनेक गोष्टी लक्ष्यांत ठेवण्या सारख्या आहेत गेल्या सहा वर्षांत एकंदर ७९१ स्त्रियांचीं तेथें बाळंतपणें झालीं त्यांत एकाही प्रसंगीं कोणाच्या प्राणास दगा झाला नाहीं. या दवाखान्यांत प्रत्येक प्रसूताबद्दल कांहीं फी घेयत, खर्चवेच व औषधोपचार यांच्या मानानें आकारली जाते आणि तेवढ्या पैशांवर सर्व बाळंतपण बिनबोक होतें. लेडी डफरीन फंडाचा उपयोग स्त्रियांस डाक्टरी शिकविण्याकडे व बायकांसाठीं स्वतंत्र दवाखाने स्थापण्याकडे होतो हें ठीकच आहे. आणि त्या संस्थेचा उत्कर्ष होण्यासाठीं लोकांनीं बाळंतपणा निमित्त दवाखानें स्थापित केले तर एक मोठीच सुधारणा केल्या सारखें होईल. घरोघर या अडचणी येण्याचे मार्ग खुले असतात व बाळांतपणा साठीं विवंचना वारंवार गृहस्थास पडत असते तेव्हां वरील प्रकारचे दवाखाने निघून तेथें माफक खर्चांत बाळंतपण होण्याची युक्ति मुंबईच्या पार्शी लोकांनीं काढून तिचा अनुभव घेतला आहे तेव्हां तिच्याच मासल्यावर हिंदु लोकांनीं संस्था काढल्या असें आह्मी इच्छितों पण असा सुदीन केव्हां येईल हें सांगवत नाहीं.

## वऱ्हाड माजी विद्यार्थी समाज.

( मागील अंकावरून पुढें चालू )

नंतर मंडळी भोजनास गेली. भोजनाची सोय ही जवळ असलेल्या धर्मशाळेंत एक मोठा मांडव घालून त्यांत केली होती. ज्या प्रमाणें आपल्या हिंदु लोकांतील लग्न समारंभांत मुलीकडील मंडळी मुलाकडील मंडळींचे कोणते ही प्रकारें उणें पडूं देत नाहींत त्या प्रमाणें ह्या भोजनाचे वेळीं उमरावती येथील समाजांतील रिसेप्शन कमेटींतील लोक बाहेर गांवांहून आलेल्या आपल्या मित्र मंडळीस कोणतेच प्रकारें उणें पडूं न देण्यास तत्पर होती.

भोजनोत्तर पानसुपारी अत्तर गुलाब वगैरे घेऊन मंडळी कोठें ठिकठिकाणीं पांच सहा पांच सहा अशी जमून आपल्या मित्र मंडळींत पूर्वीं शाळेंत जे सुखाचे दिवस गेले त्यांची आठवण करून त्यावर चर्चा करीत बसली. एकीकडे त्यांचे मनोरंजनार्थ गवयाचें गाणें सुरु होतें. संध्याकाळीं मंडळीचे लॉन-टेनिस व आट्या पाट्याचे खेळ आटोपल्यावर डाक्टर गोविंदराव खोत यांचे ‘ गरोदर स्त्रियास होणारे विकार व त्यावर उपाय ’ ह्या विषयावर फार मनोवेधक व्याख्यान झालें डाक्टर खोत हे उमरावतीस फार प्रसिद्ध असून लोकप्रिय झाल्यानें श्रोत समाजही बराच जमला होता.

रात्रीं भोजन वगैरे आटोपल्यावर थोडे गायन झालें व नंतर मंडळी आपल्या जागीं आरामास गेली.

दुसरें दिवशीं सकाळीं स्नानसंध्या व चहा काफी वगैरे आटोपल्यावर पुन्हा सभा भरली. त्यांत पहिली सुचना अशी होती कीं वऱ्हाडांतील दोहोंपैकीं कोणत्यातरी एका हायस्कूलांत पी. इ. चा वर्ग असावा अशी सरकारास विनंती करावी. ही सुचना गतवर्षीं जमलेल्या समाजापुढें येऊन एक सबकमेटी नेमून तिचा चांगला विचार होऊन यंदा समाजाकडून पुढें सरकाराकडे विनंती रूपानें जावी असें ठरलें होतें. परंतु सदर्हू सुचने संबंधी जितकी माहिती मिळाली पाहिजे होती तितकी माहिती मिळाल्यानें हें काम पुढील समाजापर्यंत तहकूब ठेवावें लागलें.

दुसरी सूचना अशी होती कीं अनेकठेकाणीं वऱ्हाडांत कित्येक मराठी शाळांतून इंग्रजी शिकविण्याकरितां जो शिक्षक देतात त्याचे पगाराचा बोजा त्या गांवांतील लोकांवर पडतो. तरी हा पैसा सरकारांतून मिळत जावा ही खर्चाची बाब असून ह्यावर सरकारांतून शाळाखात्याकडे किती खर्च होतो, बचत किती राहते वगैरे संबंधानें माहिती पाहिजे आहे. ती मिळवून ह्याचा ही निकाल पुढील वर्षीं व्हावा असें सर्वानुमतें ठरलें. आणखी अशी एक सुचना समाजापुढें आली कीं हल्लीं वऱ्हाडांत शिकून तयार झालेल्या लोकांस सरकारी नोकऱ्या जितक्या मिळाव्या तितक्या मिळत नाहींत तरी असें न होतां मुंबई व इतर इलाख्या प्रमाणें येथें मिळून तयार झालेल्यांस त्यांचे विद्येनुरूप त्यांस प्रथम जागा द्यावी व नंतर इतर लोकांचा प्रवेश व्हावा. अशा अर्थाचा एक अर्ज करून तो सरकारास समाजतर्फे पाठवावा व असें झाल्यानें हल्लीं जी वरकड लोकांस मुबलक सवड मिळते ती कमी होईल. ह्या सुचनेचे वेळीं सभेस आलेल्या पैकीं पुष्कळ लोकांची फार कडाक्याचीं भाषणें झालीं. व नंतर ही सुचनास सर्वानुमतें पसार होऊन अर्ज पाठविण्याचे ठालें व सभा बरखास्त झाली.

आदले दिवसप्रमाणें भेवण वगैरे झाल्यावर पानसुपारी अत्तर गुलाब घेऊन मंडळी गाणें ऐकण्यास बसली व संध्याकाळीं लॉन-टेनिस व आट्यापाट्याचे खेळ आटोपल्यावर रा. विश्वनाथपंत काळे वकील यांचे वेदांतील ६० ऋचावर व्याख्यान झालें. व हें व्याख्यान झाल्यावर रा. रा. प्रल्हाद नारायण जोग बी. एल यांचे “ धर्माचें बीज ” ह्या विषयावर फार सुरस व्याख्यान झालें. अखेरीस अध्यक्ष रा. महादेव गंगाधर तामले यांनीं सदर्हू व्याख्यानकार ह्यांचा व्यादरींगशी कोणतेच प्रकारें संबंध नसतां त्यांनीं व्याख्यानें देण्याची मेहनत घेतली याबद्दल समाजतर्फे आभार प्रदर्शित केले. समाजास एक कायमचा सेक्रेटरी असावा अशी सुचना होती त्या प्रमाणें रा. रा. गोपाळ वामन बापट बी. ए. यांची त्या जागेवर सर्वानुमतें नेमणूक झाली व पुढील सालचा समाज बुलडाणें जिल्ह्यांतील लोकांचे आग्रहास्तव मलकापूर येथें भरविण्याचे सर्वानुमतें ठरून समाजाचें विसर्जन झालें. यंदाचा समाज आजपर्यंत उमरावतीस झालेल्या समाजापेक्षां चांगला झाला हे उमरावतीकरांस भूषणावह आहे. व मलकापूर हा गांव जरी लहान आहे तरी यंदा प्रमाणें पुढील सालीं ही तेथें समाज भरेल अशी उमेद आहे.

नामदार रावबहादूर कृष्णाजी लक्ष्मण नुलकर यांस गेल्या आठवड्यांत महाबळेश्वर मुक्कामीं देवाज्ञा झाली. वय जवळ जवळ सत्तर वर्षांचें होतें. पुण्या कडील वर्तमान पत्रांस चरित्रें लिहिण्यास योग्य स्थळ आहे व त्या प्रमाणें लिहून येणारच. हें यंदा संबधानें झालें. परंतु यांच्या मरणानें सुधारकपक्षाचा एक प्रचंड अग्रेसर वीर नाहींसा झाला. रावबहादूर सरदार देशमुख यांच्या तोडीचा पुण्यग्रामीं कोणत्या ही सभेंत अध्यक्षस्थान विराजमान करण्यास पात्र असा सद्गृहस्थ, व सार्वजनिक सभेचे निमंत्रित चेअरमन, आणि बरेंच मोठें दुर्मिळ पेन्शन उपभोगणारे गृहस्थ नाहिसे झाले. ईश्वरेच्छा बलीयसी. नामदारांस तीन पुत्र व तीन कन्या हयात आहेत. हीं सुशिक्षित आहेत परंतु राव बहादुरांची जागा भरून काढण्यास आमचे समाजात तूर्त कोणी दिसत नाहीं — “ कालोह्ययं निरवधिर्विपुलाच पृथ्वी ” हें मनांत आणून उत्पत्स्यते हि तस्य कोपि समानधर्मः हें समाधान मानून एकेश्वरी मतांच्या लोकांच्या प्रभूनी मृताच्या आत्म्यास शांति देण्या बद्दल प्रार्थना करितों.

# The Berar Samachar

MONDAY APRIL,
3 1893.

An act for restraining the migration of the coolies on Assam plantations is on the anvil of the Legislative Council of H. E. the Viceroy. We beg

to pass in review as rapidly as possible before it is too late arguments on some points claiming to be arguments employed to vindicate a system full of injustice and absurdity. The cultivation of an agricultural country like India should be fostered with the tenderest care by the Govt. The principles of free trade on the one hand—the absorbing sentiment of the middle of the present century backed up by economists of the highest note like Fawcett and others have been the ruling and guiding principle of England. They have hampered native industries and native manufactures. To improve the condition of the working classes, to raise the the Standard of comfort, to impose prudential checks on population by diffusion of education among the working classes have been for long the one paramount aim of our benign governmet.

The facilities of Railway conveyances, the increased communation between one part of this wide country cheapening travels and enabling labourers from one part of the country where there are low wages to travel to another where there are utopian wages have in fact reduced labour in all trades to a natural equality beyond the point of oscillation. Making allowance for the agreeableness or disagreeableness of employments, for the ease or difficulty, expense or cheapness of learning a trade, for the constancy or inconstancy of employment in a particular trade, for the amount of trust required to be reposed in the workers of a particular trade and for the stability or instability of the employments themselves the rate of wages in India has almost descended to a level of equality. What is it that has brought about this change? The answer is obvious. The increased facilities afford ed to labour to transmit itself from place to place along with the other circumstances above adverted to have brought about this desired effect.

Inspite of all this there is a corner in this wide country where Government have a tendency to force labourers to stay against their wishes and inclinations. Such a labourer is necessarily unskilful. For more skill on the part of forced workmen would mean an extra disqulification and dis ability to work harder for a mercenary employer who would apppopriate to himself all the proceeds of his labour. An unrewarded and unappreciated service is not only disheartening to the particular individual employed but it is also pernicious to the interests of those aspiring workmen who look up to that trade for making an honest profit from it. Its evils can never be exaggerated if to it were added the onesided protection given to the employers alone. Such a forced labour is always uneconomical producing much less than the outlay. In order to keep labour from dearth, death and starvation the employer must at least give as much as would feed labour. The labourers are not interested if their employers are thriving or growing bankrupts. The necessaries of life if denied would be death to the labourer and he would even welcome death. He has no interest in the profits due to his employers. We have shown the labour is both rude and expensive. Forced labour can only be made to work in gangs. Then there is the expense of constant superintendence. It is thus unthriftly from the disinterested condition of the labourer and from the expenses of watching such labourers. Forced labour then is a curse both to the employer as well as to the employed. "The mind its own resting place and make heaven of hell and hell of heaven." If this be the case we do not see any reason why government should try to patronise the Assam cultivators to the detriment of the labourers. Even the Pioneer is against such an enactment. We are fighting for the principle.

If the institution of slavery is condemned by our benign government elsewhere we can not reconcile their attitude towards Bengal labourers with that they have persistently shown in othe parts of their dominions. The proposed act and legislature touch Bengal vitally and we doubt not the spirit of the people there will indignantly oppose the government in the proposed legislature.

---

On the 28th. proximo the Hon. V. Bhashyam Iyengar delivered a very able, eloquent, and stirring speech at the Convocation of the Madras University. This week we cannot do full justice to the intellectual and literary feast to which he invites us in his long Convocation address. Amidst the many important subjects which he touches in his speech we are much struck at the rapid and interesting manner in which he takes a short view of 'social reform' which is power fully exercising the thought and action of our countrymen. Having suggested as the guiding principle in all spheres of progress and reform that 'moderation is like the silken string passing through the pearls of virtues' the honorable speaker requested in all earnestness and zeal the leaders of the varied communities 'to secure the sympathy of those for whose benefit they labour.' His strong argument was that Hindu Social institutions are elastic enough to welcome any reform but experience and knewledge must work together to effect it. We are almost prone to quote word for word the closing portion of his advice to the graduates:—

"The ruling convictions of mankind are often swayed by feeling, imagination, usage and tradition more than by logic and reason. If we examine the sources of popular morality we shall find that religious sentiment, cultivated moral sense, public opinion or positive law exercises influence, in varying degrees, on men's cearacter and actions. The sphere of positive law is limited. In modern Hindu society, for obvious reasons, public opinion will have to relied on as the most efficient regulator of the actions of the individual. It must, therefore, be the constant endeavour of all true reformers to create a sound and healthy public opinion in the community to which they belohg, an opinion moulded out of what is best in the literature, philosophy and religion of the East and of the West. The influence of such public opinion on the individual and the community cannot be over-rated. It will be the duty of every one of you to defer to it, and demonstrate by your example the wholesome influence which it ought to exersise. In all questions of social reform, as in politics, we have to look to the prscticabi lity, in the near future; of the change pro posed and, not unfrequently, have we to choose between two evils. Do not despise small reforms for which Society may be prepared, simply because they do not satisfy your ambition. On the other hand, refoms which are small in themselves, but are regarded as revolutionary by the people, are not worth your attempt. There is a wide scope for individual action in several matters of importance in which reforms, conducive to the welfare of the Society, can, with a certain degree of firmness of will and decision of character, be accomplished without doing any violence to Religion or Social organization. The progress made in this direction, we must confess, has, as yet, been but little. We ought to be able to effect it without seeking the interference of the Legislature in concerns which in all civilised countries are not generally attempted to be regulated by Positive Law. Do not neglect an exist iug institution which may be utilised to the greatest public good. Let your endevour always be to arrest its decay and extinction and to improve upon and refine it".

---

## वऱ्हाड

हवामान— उन्हाळा विशेष पखर भासूं लागला आहे उष्णमापक यंत्रांत पारा ९८ अंशा पर्यंत चढतो. यंदा पीकें बुडालीं ह्मणून लोक हवालदील आहेत आणि धान्याचा भाव उत्तरोत्तर चढत आहे. रोगराई ह्मणण्या सारखी विशेष नाहीं.

मि. निकोलेट डेपुटी कमिशनर, उमरावती हे मे महिन्यां पासून तीन महिन्याची हक्काची रजा घेणार आहेत आणि त्यांच्या जागीं मि. डेव्हिस साहेब असि. कमिशनर हे काम पाहतील असें ह्मणतात.

येत्या बुधवार पासून उमरावतीस हायर व लोअर परीक्षा सुरूं होतील. या परीक्षा नवीन सरक्युलराप्रमाणें यथास्थित झाल्या तर त्यांचें वास्तविक महत्त्व सहजीं कळून येईल.

मलकापूर तालुक्यांत ठिकठिकाणीं इनारी लोकांच्या सभा भरत आहेत आणि त्या सर्वांची प्रांतिक सरकारपाशी मागणी कीं जमिनीवरील सारा वाढवूं नये जमिनीवर सारा दीडपटीनें वाढविण्याचा विचार आहे आणि तो प्रजेच्या शक्ती पलिकडचा आहे लोकांची विज्ञप्ती कितपत मान्य होते पहावें!

येत्या पहिल्या तारखे पासून इलिचपूर छावणीत ह्मणजे परतवाड्यांत मुनसिपालिटी स्थापित झाली. दहा सभासदांचीं नांवें सरकारातून नेमून आलीं आहेत आणि दोन जागा भरावयाच्या आहेत. इलिचपूरचे डेपुटी कमिशनर या मुनसिपालिटीचे अध्यक्ष राहतील असें ठरलें आहे.

गेल्या पहिले तारखे पासून भुसावळ व नागपूर यांच्या दरम्यान दोन मिक्स गाड्या सुरू झाल्या असून त्या अनुक्रमें भुसावळेहून सकाळीं ६ वाजता व नागपुराहून ९॥। वाजतां निघतील व त्यांची अकोल्यास दिवसां येणाऱ्या उताराच्या गाड्यांशी भेट होत जाईल.

---

### नोटीस

रा. रा. धनाप्पा वाणी रहाणार अंदुर तालुके बाळापूर यांसः—

नोटीस देणार पांडु वलद शंकर राणे राहणार चांदूर तालुके मलकापूर नोटीशीनें असें कळवितो कीं, तुह्माकडे खातें बाकी वगैरे मिळून येणे रुपये (१३३) हे रुपये तुह्मी नोटिस पावल्या पासून १५ दिवसाचे आंत सदरहू रुपय व्याजा सुद्धां आणून द्यावे व पावती घ्यावी हे रुपये आह्मी चार पांच वेळां मागितले परंतु दिले नाहींत ह्मणून नोटीशीनें कळविणें भाग झालें याज करितां नोटीशीचा खर्च तुह्मी दिला पाहिजे. सदरील मुदतींत रुपये न दिल्यास रिती प्रमाणें फिर्याद करून अखेर निकाल होई पर्यंत जी नुकसान होईल ती सर्व भरून घेतली जाईल ह्मणून दिली नोटीस कळावें. ता० २-४-९३.

(सही)

पांडु वलद शंकर राणे राहणार चांदुर दस्तुर खु०

---

### नोटीस.

नोटीस बेशमी छोटमल अगरचंद मारवाडी राहणार मौजे दिग्रस परगणे चिंचोली ता० दारव्हा जोरहे वणी यांस नोटीस देणार राजापा बापु पद्मावार दुकान मौजे दिग्रस परगणे चिंचोली ता० दारव्हा जिल्हे वणी यजांकडुन नोटीस देण्यांत येते अशी कीं आमचे रुईचे ओझें तुम्हा कडून येणे आहेत ते असें कीं आमचे आडतीत दुकानदारांनीं ओझे खरेदी केले त्या पैकीं तुम्हापासून रुई येणें आहे तें खाली लिहिलें प्रमाणें.

१ हात रेच्या पैकीं रुई तुम्हापासून घेणे आहे तें बी तपसील.

१ रामजी नाईक काणव सराफ कारंजेकर दुकान दिग्रस पैकी रुई ओझें १८॥ याचे मण १३३।८॥।

२ मुळजी जेठाची कंपनी कारंजकर दुकान दिग्रस पैकी रुई ओझें १५ याचे मण १४४॥६।

२ जीनचे ओझें तुम्हा कडून येणें आहेत ते बि तपशील

१ धी वीरार म्यान्युफ्याक्चरींग कंपनी मील बडनेरा पैकीं ओझें ४३॥ याचे मण पक्या मीरानें ४३५

३ अमचे जातावत पैकीं सरकी खंडी २१ हात रेच्याची

असें या प्रमाणें रुई व सरकी तुम्हाकडून येणें आहे ते तुह्मांस मागितलें असतां, देत नाहीं असा जबाब दिल्या वरून तुह्मास या नोटीशीचे द्वारें कळविलें जात आहे कीं, नोटीस पावल्याचे तारखे पासून पंधरा दिवसाचे आंत सर्व मालाचा तोल करून द्यावा नाहीं पेक्षां जीनचे ओझ्याचा भाव दर ओझ्यास रु० ९० व हात रेच्याचा भाव दर ओझ्यास रुपये ७६ प्रमाणें आणि सरकीचा भाव दर खंडीस रुपये २० प्रमाणें धरून जितकी रुई खात्यांत निघेल त्याचे सदरील भावा प्रमाणें दाम करून जितकी रकम होईल तितक्याचा दिवाणी कोर्टांत दावा दाखल करून कोर्ट खर्च व या नोटीशीच्या खर्चा सह भरून घेतले जाईल. कळावें मिती चैत्र शुद्ध १३ तारीख ३० माहे मार्च सन १८९३. [illegible]राव खंडेराव कुलमुखत्यार द.खु.

(सही)

राजापा बापु दस्तुर खु.

---

## अकोला बाजारभाव

हुंडी मुंबईची दर्शनी.... .... .... ९९॥।-॥

" १५ दिवसांच्या मुदतीची ... ९९॥=

सुवर्ण २६॥ .... .... रुपें ....१०८॥.

मीठ....३॥।= .... आकशी मापी ११०

जवस वजनी ११२॥ .... चणे ६०-६५

गहूं काठे.......... ७६ बनशी ....८५

साखर.... ३॥....कराके.... .... ४।=

उडीद....३।.... .... मुग ३॥=

जवारी ५७— ६० ....सर्की.... ५॥

तूप.... ८।॥[illegible].. ............ तेल ७

कापूस....[illegible] ..........रुई ७२-८२

स[illegible]याचे भाव (इंग्रजी)

गहू वैशाख[illegible]द्ध १९४९ ....... ६६

आळशी चैत्र[illegible]"......."........ ०

रुई फाल्गु[illegible]........." ....... ०

सर्की वैशा[illegible] नवे सालची" ....५....५॥

जवारी.... वसंत.........".... .... ... ०

---

## वर्तमानसार.

नवीन कमांडरइंचिफ जनरल सर जॉर्ज व्हाइट हे हिंदुस्थानांत येण्यास निघाले.

अमेरिकेंत बेडकांची लागवड करण्याची सुरुवात झाली असून फायदेशीर होत आहे ह्यांचा उपयोग खाण्याकडे होत असल्यामुळें खप फार वाढत चालला आहे.

कोचिनचे महाराजांनीं बनारस येथें उपाध्यांस व देवांस ९० हजारांवर रु० दिले गयेस ५१६ रु. हजार होम हवनांत वातले.

मद्रास येथें मागच्या आठवड्यांत एका मनुष्यानें उंदरास घालण्याकरितां बाजारांतून सोमल विकत आणला त्याचा परिणाम काय होतो हें पाहण्याकरितां आपणही त्यांतील थोडासा चाखला त्याच्या योगानें तो असाध्य होऊन मरण पावला.

अप्रिलच्या ३ रे तारखेस व्हाइसरॉय साहेबांची स्वारी रेवा आणि राघ पूरच्या रस्त्यानें सिमल्यास जाण्याकरितां निघणार. १२ वे तारखेच्या सुमारास तेथें पोंचेल.

पंढरपूर येथें तार आफिस स्थापन झालें.

मद्रासेकडे वेलोर मुक्कामीं जमिनींतील द्रव्यसंचय मिळेल या आशेनें ३ लहानमुलांचा बळी देणाऱ्या क्रूर देवभोळ्या लोकांस तिकडील सेशन कोर्टानें फांशीची शिक्षा दिली.

व्हाइसराय साहेबांची स्वारी रेवा मुक्कामीं असे पर्यंत फारिन सेक्रेटरी सर मार्टिंगर डुरंड हे राजपुतान्यांतून कांहीं वेळ प्रवास करतील. सु० प०

मोठें माणीक— ब्रह्मदेशांतील माणकांच्या खाणींत एक मोठें माणीक सांपडलें आहे त्याची १७००० रुपये किंमत आहे. ह्या खाणींत आजपर्यंत एवढें माणीक कधींही सांपडलें नाहीं असें ह्मणतात.

विलायतच्या खर्चाची स्टेट सेक्रेटरीची रक्कम— विलायतेंतील खर्चासाठीं हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी दरसाल कांहीं रकम घेत असतात हे पुष्कळांस माहित असेल. १८९३-९४ सालासाठीं १८७००००० पौंड रक्कम घेण्याचा स्टेट सेक्रेटरी यांणीं ठराव केला आहे. मागल्या साला पेक्षांही रकम १७००००० पौंडांनीं जास्त आहे. ह्या सालीं इतकी जास्त रक्कम घेण्याचें कारण काय हें कांहीं प्रसिद्ध झालें नाहीं. सोळा रुपयांचा एक पौंड अशी हल्ली रुपयांची किंमत उतरली आहे. या भावानें इतके पौंड ह्मणजे २९९२००००० रुपये होतात. ह्या सालीं जी जास्त रकम घेण्याचा स्टेट सेक्रेटरींनीं ठराव केला आहे तिचे २७२००००० रुपये होतात. ह्मणजे मागल्या सालापेक्षां पावणेतीन कोटरुपये स्टेट सेक्रेटरी जास्त घेणार असें उघड दिसतें. ही स्टेट सेक्रेटरीची रकम दरसाल एक सारखी वाढत चालली आहे ह्यावरून तीस कांहीं मर्यादा ह्मणून नाहीं. हिंदुस्थानचें गेल्या सालचें उत्पन्न ८८ कोट होतें, त्या मानानें पाहिलें असतां एकंदर उत्पन्नाचा तिसरा हिस्सा होम चार्जिसच्या रुपानें विलायतेस जातो. ह्यावरून ह्या खर्चास कांहीं धारबळ नाहीं. आणि हाच खर्च हिंदुस्थानचें दिवाळें वाजविण्यास पहिल्या प्रथम कारण होईल असें ह्मणण्यास आह्मांस बिलकुल अडचण नाहीं. असल्या उधळ मसक्या खर्चानें धनपति कुबेर ही भिकारी होईल मग हिंदुस्थाना सारखा देश भिकेस लागेल याचें नवल काय?

शु० सू०

बंगाल इलाख्यांत सर्व पोष्टआफिसांतून तापावरचे औषध ( कोयनेल ) विक्रीस ठेवलेलें असतें व तें ठरलेल्या सरकारी दरानें विकलें जातें. सरकारचे ह्या चांगुलपणाचें कृत्याचा तिकडील गोरगरीब लोक फार उपयोग करून घेत आहेत. व नुकतेच झालेल्या रिपोर्टावरून कळतें कीं, कित्येक ठिकाणाहून तेथें जास्त पुरवठा ठेवण्याविषयीं सरकाराकडे लिहून गेलें आहे. इतर इलाख्यांतून सुद्धां निदान जेथें हवा थंड व घामट असल्यामुळें नेहमी तापाचा आजार असतो अशा ठिकाणीं जर सरकारानें हीच तजवीज केली तर रयतेस बरीच सोय होऊन त्यांची मोठी अडचण दूर झाल्यासारखें होईल.

दुष्काळाचे प्रसंगीं रयतेला तगाई देणें तीं किती रकमेपर्यंत द्यावी याबद्दल कायदा करण्याचें घाटत आहे असें समजतें.

सोलापूर — डा. माधवराव रानडे, भिषग्विलास कर्ते याचे वडील बंधूंना एकप्रकारच्या आजारामुळें बरेच दिवस बोलतां येत नसे. त्यांजवर गेले सोमवारीं येथील सिटी डिसपेनरीचे डाक्टर मि. पर्सनासिन यांनीं मेस्मारिझमचा प्रयोग करतांच ते चांगले बोलू लागले. क० त०

वर्तमानपत्रांचा हक्क — वर्तमानपत्रकर्त्यांस बातमीं देणारांचीं नांवें कसाही प्रसंग आला तरी प्रसिद्ध न करणें हें पत्रकर्त्यांचें ब्रीद असून इंग्लिश कायद्याचा उद्देश ही तसाच आहे. प्रिव्हिकौन्सलाच्या ज्यूडिशियल कमिटीपुढें ह्या संबंधाचा एक खटला थोड्या दिवसापूर्वी गेला होता; त्यांत प्रि. कौन्सलानें पत्रकर्त्यांच्या ह्या हक्काचें संरक्षण केलें. त्याची हकीकत अशी आहे कीं:- बाहामास येथील चीफ जस्टिस साहेबांचें वर्तन प्रतिबिंबित केलेला एक लेख नाऊसा येथील एका वर्तमानपत्रांत एकानें लिहून पाठविला होता. ह्या बातमीदाराचें नांव पत्रकर्त्यांकडून कळेना, ह्मणून सदहू पत्रकर्त्यास कोर्टाचा अपमान केल्याचे आरोपावरून चिफ् जस्टिसांनीं तुरुंगांत नेऊन पोंचविलें. बाहामा बेटाच्या गव्हरनरांस हें गैर वाटून त्यांणीं आरोपी पत्रकर्त्यास निर्दोषी करून सोडून दिलें त्यावरून हें प्रकरण विलायतेस प्रिव्हि कौन्सलाकडे गेलें होतें तेथें गव्हरनरांनीं केलेला निकाल व वर्तमानपत्रकर्त्याचें करणें बहाल झालें. वर्तमानपत्रकर्त्यास हा ठराव फार महत्वाचा आहे. न्या० सिं०

रा. सा. बाळकृष्ण आत्माराम गुप्ते. पोलिस कमिशनर, इंदूर यांनीं लंडन येथील प्राणिशास्त्रमंडळीचें फेलो नेमलें आहे. आनंदाची गोष्ट आहे!

बंगाल्यांतील इरिगेशन खात्याला खर्च वेच वजा जाऊन सालिना ३,००००० रुपये शिल्लक राहते.

तिबेटांत 'हानीचें देऊळ' ह्मणून एक बुद्ध धर्माचा मठ आहे. तो समुद्राच्या सपाटी पासून १६,०००फूट उंच आहे याच्या इतकें उंच स्थळीं असेलेलें दुसरें मांदर कोठेंच नाहीं, या ठिकाणी एकवीस जति रहातात.

पेरु देशांत गालेरा नांवाचें एक खेडें आहे. तें समुद्रापासून १५,६३५ फूट आहे. त्याचप्रमाणें तिबेटांत एक सुवर्णपलित आहे तें समुद्रापासून १५३०० फूट आहे हें उंच ठिकाणासंबधी झालें. परंतु बांधल्यामुळें उंच झालेलें असें सर्वांत उंच मंदिर अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांत मिनीयालिस येथें आहे. त्याला १८ मजले आहेत. या मंदिराचे खालचें क्षेत्र ८० चौरस फूट आहे. आणि वर तें निमुळतें होत जाऊन शेवटीं मनोऱ्याप्रमाणें त्याला आकृति दिली आहे. एकंदर इमारत ३५० फूट उंच असून त्यांत ७२८ दिवानखाने आहेत. १४।१५।१६ पासून २० मजल्यापर्यंत उंचीची घरें शिकागो येथें आहेत; आणि हल्लीं एक 'विक्षिप्त मंदिर' ह्मणून बांधणें चाललें आहे, त्याला मुख्यत: २० मजले करून वर मनोऱ्याचें १४ मजले करण्याचें ठरलें आहे. त्याची एकंदर उंची ५५६ फूट असून त्यास एकंदर खर्च १,५०,००,००० रुपये होणार आहे. क. णू

विलायतचा एक व्यापारी इजिप्तदेशांत एक कापडाची गिरणी घालण्यास तयार झाला असून इजिप्तचा राजा खेदीव यानें त्यास मंजुरीही दिली असें सांगतात.

पुष्कळ बोलून किंवा गाऊन आवाज बसल्यास थोडा टाकणखार तोंडांत धरल्यानें पाणी सुटून आवाज मोकळा होतो.

विलायती कोळशाच्या भुकणीच्या विटा केल्यास जळण्यास फार उपयोगी पडतात.

मुंबईचे मि. जहांगीर वाडिया चिकागोंस जाण्याकरतां रवाना झाले.

होळकरांनीं आपल्या रिविनियु खात्याची सुधारणा केली व आंतां ते इंजनेर खात्यामागें लागले आहेत.

येत्या मे महिन्याच्या १० व्या तारखेस विलायतेस इम्पीरियल इन्स्टटयुट उघडण्याचा जो समारंभ राणीसाहेबांच्या हातून व्हावयाचा आहे त्या वेळीं राणीसाहेबास सन्मान देण्याकरतां हिंदुस्थानांतल्या नेटिव रिसाल्यांतले कांहीं स्वार व एक नेटिव आफिसर असे विलायतेस जावयाचे आहेत पांच मुंबई इलाख्याच्या फौजेपैकी एक जावयाचा आहे. ही मंडळी ता. ८ एप्रिल रोजीं मुंबईहून निघेल व सुमारें तीन महिन्यांनीं परत येईल व त्यांस तिकडे जास्त भत्ताही मिळावयाचा आहे.

चीन सरकारानें आपल्या चिनी तुर्कस्थानप्रांतांतील आयात जकात बंद केली आहे. अफू वरील कायम ठेविली आहे.

कायदेकौंसलांत मेंम्बर नेमण्याकरतां तुह्मी एकाचें नांव कळवा असें बंगाल सरकारानें कलकत्याच्या व्यापारी मंडळीस कळविलें आहे.

बंगाल नागपूर रेलवे ता. १० पासून चालू झाली.

प्रसिद्ध सर रिचर्ड टेंपल हे आलीकडे विलायतच्या पार्लमेंन्ट मेंबरांच्या वर्तनाचें सुरेख टिपण ठेवीत असतात व आपल्या हयातीपर्यंत तें आपल्या जवळ बाळगून नंतर कोणाच्या तरी स्वाधीन करण्याचा त्यांचा विचार आहे असें सांगतात.

रशिया मनांत आणील तेव्हां बारा किंवा १५ तासांच्या आंत चाळीस किंवा पन्नास हजार फौज आडिसा येथून कान्स्टांटिनोपल येथें आणू शकेल अशी रशियानें हल्लीं व्यवस्था करून ठेवली आहे आणि रशिया, फ्रान्स व ग्रीस यांच्यांत भूमध्यसमुद्राच्या संबंधानें गुप्त एकोपा झाला आहे व त्यामुळें कांहीं गडबडीचा प्रसंग आल्यास इंग्रजी गलबतांस कान्स्टांटिनोपल येथें जाण्यास मनाई करण्याची व त्यास कोळसा वगैरे न मिळण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे अशी कित्येक इंग्रजांची ओरड आहे.

न्यायानें संपादन केलेल्या धनानें युक्त तत्व ज्ञाननिष्ट, अतिथिप्रिय; शास्त्रवेत्ता व सत्यवादी असा गृहस्थाश्रमीही मुक्त होतो.

ठा० अ०

भावनगर गोंडाळ रेलवेचे मानिस्टर रा. ब. भीमजी मोरारजी यांणीं आपल्या पुत्रविवाहोत्सवाबद्दल राजकोट हायस्कूलास एक हजार रुपये दिले. व या रकमेच्या व्याजांतून त्यांच्या जातीपैकीं कोणी मुलास दरमहा पांच रुपयांची स्कॉलरशिप मिळण्याची व्यवस्था केली आहे.

## नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्याच कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकिट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा आक्ट ७ प्रमाणें.

वर्ग १५

दि. कि. मु. नं. ५/१८९३

डिपुटी कमिशनर सा० जिल्हा इलिचपूर यांचे कोर्टांत.

नांव—आनंदराव

बापाचें नांव— चंद्रभान आ. पा. बळीराम बा विठेबा

राहणार— हरम ता० इलिचपूर

जि —इलिचपूर यांस मयत.

चंद्रभान बापाचें नांव विठोबा राहणार हरम तालुके इलिचपुर जिल्हे इलिचपूर यांचें कर्ज वसूल करितां येण्या साठीं सरटीफिकिट मिळावें ह्मणून सदरहु अर्जदार यानें अर्ज केला आहे यास करितां सदहू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागांवर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळाविण्यांत येत आहे कीं त्यानीं ता. १४ माहे एप्रिल सन १८९३इ० रोजीं सदहू अर्जाची चौकशी चिखलदरा येथें होईल त्यावेळी या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्काविषयीं लेखी हकीकत दाखल करावी. ता. २२ माहे मार्च सन १८९३ इ०

W. Hastings.

डे० कमि० इलिचपूर जिल्हा

उपडज्य

☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाचा आगाऊ रु० ५ डाक हांशील १।
साहामाही ,, ३ ,, ०८
सालअखेर ,, ७ ,, १०८
किरकोळ अंकास ......................४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ........०१

Annum in advance 5 Postage 13as
Annum in arrears 7 ,,1Rs 8 as
Six monthly............3 ,, 8 as
Single copy..............................4as

# वऱ्हाडसमाचार.

Advertisement
Below 10 lines...2Rs
per line over10... 4 as
Repetition perline 3 as

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXVII AKOLA MONDAY 10 APRIL 1893 NO. 14

वर्ष २७ आकोला सोमवार तारीख १० माहे एप्रिल सन १८९३ इ० अंक १४



## CLEMENTS TONIC

### दुखणेकऱ्यास संजीवनी

### क्लेमेंटचें टानिक.

( दुनियेचा पौष्टिक दवा )

क्लेमेंटचें टानिक ही रामबाण, त्वरित, आणि काय ती एकच खात्रीची औषधि आहे. तिच्या योगें मज्जूतील क्षीणता, शरीराचा ऱ्हास, चेतनाशक्तीचा हीनपणा, साधारण अशक्तता, कण्यांतलि थकवा, धातुश्राव आणि दुष्ट हवा, मनस्वी क्लेश, दगदग, दुर्व्यसन, दुरुपयोग, मूर्खपणा अगर अविचार या पासून शरीर क्षीण होऊन ज्या व्याधि जडतात त्या सर्व व्याधि व रोग दूर होतात.

क्लेमेंटचे टानिक स्वाभाविकपणेंच मनुष्याच्या शरीराला हुषारी आणते, क्षीण व अशक्त मनुष्यास तजेला व शक्ति देते. कमकुवत मनुष्यास सदृढ, बळकट व वीर्यवान बनवितें आणि नाजूक स्त्रिया बांध्यानें मजबूत व पाणीदार अशा करितें.

तरुण, मध्यम वयाचे, व म्हातारे पुरुष व स्त्रिया यांस खात्रीचे गुणावह औषध म्हणजे क्लेमेंट टानिक असें आढळलें. शारीरिक मानसिक मनस्वी दगदग, दुःख, उघड्या हवेंत राहणें, गुप्तस्त्राव, छांदिष्टपणा यां पासून ज्यांना विकृति जडतात अथवा ज्यांनीं अज्ञानपणानें व खोडसाळपणानें प्रकृति बिघडून घेऊन स्वतांवर अनेक दुःखें ओढून घेतलीं त्या सर्वांस याचा गुण आला आहे. शरीर क्रमाक्रमानें थकत चाललें असतांना त्या ऱ्हासाचीं लक्षणें या औषधानें तावडतोब नाहींतशीं होतात आणि कमी कमी झालेल्या शक्ति पूर्वी प्रमाणें जोमदार होऊन प्रकृति निकोप होते. मुख्य मुख्य इंद्रियें कमताकत झालीं, मेंदू बिघडला, शरीराचे व मनाचे व्यापार कुंठले, विचारांचा घोटाळा झाला, ज्याचा त्याला भरंवसा वाटेनासा झाला, स्वभाव अनावर व शीघ्र कोपी झाला, उदासीनता व भित्रेपणा वाटला, गुडघे व पाठ थकली, छाती धडधडूं लागली, वातशूल झाला, कंबरेत सळका मारल्या तसेंच पाठींत दुखणें वेळोवेळ दात दुखणें अवयव तिडकणें झोंप नाहींशी होणें, कपाळ दुखणें पहाटेस थकवा येऊन अवयव दुखणें, मूत्रपिंड व मूत्राशय यांची आग होणें लवकी पांढरें होणें परमा व गुप्तस्त्राव यांनीं धातुपात होणें या व्याधि झाल्या अथवा स्त्रीपुरुषास आपल्या जन्मांतलीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या बजावण्यास नालायक करणारा व त्यांच्या कामांत व्यत्यय आणणारा असा मानसिक व शारीरिक कोणताही आजार झाला तर या सर्वांवर क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय ठरला आहे व ठरत आहे.

क्लेमेंटचें टानिक हें खरोखरीच मनुष्यमात्रास एक ईश्वरी देणगीच मिळालेली आहे हें घेतल्या बरोबरच आपला रोगनाशक अद्भुत प्रभाव दाखवूं लागतें. ह्याविषयीं घेणारांची साक्ष सर्वत्र व विश्वसनीय अशी आहे. ते म्हणतात कीं, ह्याच्या प्रत्येक भागानें गुण येऊं लागतो. हें ज्ञानतंतूची जबरदस्त शक्ति वाढविणारें टॅनिक असून हें शरीरांतील सर्व अवयवांना व स्नायूंना ज्ञान तंतू योगानें पूर्व स्थितीवर आणणारें शक्तिदायक सत्व पोहोंचवितें; इतकेंच नाहीं पण तीक्ष्ण रोग थकवा, मेहनत, अतिश्रम अथवा कित्येक कुकर्मांच्या योगें शरीरप्रकृति अशक्त झाली असली, किंवा जोंवर ज्ञानतंतूंची अशक्तता, साधारण किंवा स्थानिक अशक्तता चालूं असेल तोंवर कोणत्याही कारणानें अशक्तता आलेली असली तरी हें औषध घेतल्यावर गुण आल्यावांचून राहणार नाहीं. जोंपर्यंत क्षीणता व ज्ञानतंतूंची अशक्तता हींच रोगाचीं कारणें असतील तोंपर्यंत, क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय आहे.

रोग्यांनीं लक्षांत ठेवावें कीं क्लेमेंटचें टानिक हेंच एक खात्रीचें औषध आहे, सर्व गांध्याकडे व बाजारांत तें विकत मिळेल F. Moor Clements. ही सही पेटीच्या बुडाशीं व वरच्या भागीं पाहून त्याची खात्री करून घेतांनां सावधगिरी ठेवावी, आणि जे नकलीं औषधें विकतात त्यांच्या पासून घेऊं नये. "क्लेमेंटचें टानिक" नांवानें शोध करा, आणि तेंच अस्सल औषध घ्या. हाड, मज्जा, व स्नायु ही यानें बनतात, आणि रक्त व मेंदु यांना हें फार मानवतें. हें घेतल्यानें प्रकृति सदृढ, बळकट, ताकतदार, आणि जोमदार होते आणिं दुनियेंत या सारखी ईश्वरी देणगी दुसरी नाहीं.

इंडियांतील एजंट—कैंप आणि को, ट्रेचर आणिको मुंबई, बालंटाईन को; स्मिथ, स्टानिस्ट्रिट को, बोनन को, कलकत्ता; डब्ल्यू इ. स्मिथ को, मद्रास; एन. एस. फरनानडो, कोलम्बो; आणि सर्व ठोकळ व किरकोळ गांध्याचीं दुकानं.

F. M. Clements, Inventor Sydney, Australia.


## पत्रव्यवहार.

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

३।४।९३ वाशीम

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. इंदुरी खुर्द्याचा इकडे फार फैलाव झाला आहे. दर रुपयास ०=। आणे वटाळा मिळतो. इंग्रजी खुर्दा सर्व बाजारांत नांवाला नाहीं. एखादे कार्डविकत आणण्यास अगर मुलांची फी भरण्यास रुपया कडेसच पाहावें लागतें. खुर्दा इतका स्वस्त झाल्यामुळें रुपयाकडे ते वेळीं बरें वाटतें खरें परंतु बाजारांत ज्यां जिन्नसास पावआणा पडण्याचा त्या ठिकाणीं अर्धा आणा! इंग्रजी पैशाच्या भावानें आठ आणे पायली जो जिन्नस मिळावयाचा त्यास अकरा आणे पडतात. बाजारांत खुर्द्या प्रमाणें सर्व जिन्नस विकण्याची नेहमीं वहिवाट तेव्हां अशा खुर्द्याच्या स्वस्ताईनें गरीब लोकांचें अतिशय नुकसान झालें आहे. हा खुर्दा प्रांतांतून अगदीं बंद झाला पाहिजे. हा ह्या प्रांतांत प्रथमतः आणिला कसा आणि कोणी याची दाद नसावी हें एक मोठें आश्चर्य आहे! ह्या खुर्द्या कडे प्रांताधिपती व जिल्हाधिपती लक्ष देतील तर गरीब लोकांचा बचाव होणार आहे.

शेती अजीबात बुडाली. शेती लोक ढळढळा रडत आहेत. साऱ्याचा पैसा देण्यास जवळ साधन नाहीं. एप्रिल महीन्यांतलि हप्ता जवळ येत चालला लोक फिकरींत पडले आहेत. सर्व मीजा शेतीवर त्या शेतीनें हातचें सोडलें. मग दैन्य किती होणार याची कल्पना करणेंच कठीण! सावकार कुळांना घरीं जवळ उभें करून घेत नाहींत. तेव्हां आतां शेतकरी लोकांचा पत्ता लागावा कसा? सरकार माय बाप अशा प्रसंगीं मदत करून लोकांना साऱ्याची सूट देईल. व पुढें सुबत्ता सूट झाल्यावर दिलेला सारा घेण्याचा हुकूम करील तर एक प्रकारें शेती लोकांवर कृपा केल्याचें श्रेय सरकारास मिळणार आहे.

हल्लीं बाजारांत धान्य येत नाहीं. जें कांहीं थोडेसें येतें तें मनास येईल त्या भावानें विकलें जातें. गरीब लोक उपासी मरूं लागले आहेत. दुष्काळा प्रमाणें सर्व भाव झाले आहेत. ज्या लोकांचा चरितार्थ केवळ मजुरीवर असतो त्यांना हल्लीं कामही मिळत नाहींसें झालें आहे. ह्या स्थितीकडे सरकारचें लक्ष जाऊन जर कांहीं तजवीज झाली तर गरीबांचा बचाव होणार आहे. नाहीं पेक्षां पुढें परिणाम कसा लागणार परमेश्वर जाणें. ह्या प्रसंगीं गरीबांना मदत करण्याकरितां कांहीं कामें सुरू होणें जरूर आहे. मागें सरकारानें अकोल्या पासून इंगोली पर्यंत आगगाडी करावी असा विचार मनांत आणून त्या रस्त्याची मोजणी ही केली होती व काम सुरु करण्याचे वेळीं असें ठरविलें होतें कीं ही रेल्वे दुष्काळाच्या प्रसंगीं करावयाची तो प्रसंग आतां आला आहे. तर ह्या कामाची आतां सुरुवात झाली असतां गरीबांना चांगली मजुरी मिळून सरकारचें काम ही होईल. आतां पहावें सरकार काय करतें तें.

रा. रा. केशवराव जैकृष्ण ए० अ० क० यांना हा जिल्हा लाभला नाहीं. येथें आल्या पासून ते बहुतक वेळा अजारी राहिले. प्रथमतः कांहीं दिवस बरे होते. शवटी फार आजारी होऊन एक वर्षाच्या आजारी रजेचें सरटीफिकीट घेऊन ते औषधोपचारा करितां नागपुराकडे गेले. ईश्वर त्यांना आराम देवो.

रा. रा. अंबादास संतो ए. अ. क. यांची बदली केळापुरास झाली. जरी ते वयातींत आहेत तरी तरण्या लोकांशी ते चांगलीच बरोबरी करितात. त्यांची शरीरप्रकृती निकोप आहे. जरी त्यांना इंग्रेजी येत नाहीं तरी काम चांगल्या रितीनें करण्याची त्यांना फार हौस. नियमितपणा त्यांच्या अंगीं फार वास करितो. सकाळीं अकरा वाजतां जाऊन एक वेळ खुर्चीवर बसले कीं संध्याकाळीं पांच किंवहुना सहा वाजेपर्यंत एक सारखी लेखणी चालत असे. कित्येक वर्षांचें सांचत पडलें काम त्यांनीं निकालांत आणिलें व गेल्या तारखेपर्यंत मागील कामाची शिलक बहुतक काढून टाकली. ह्या जिल्ह्यांत त्यांनीं वाहवा मिळविली. त्याच प्रमाणें मि. शाहापूरजी हे जरी तहशीलदारी करून प्रथमतः येथें आले व त्यांनीं त्या पूर्वीं जरी कोठें ए. अ. क. चें काम केलेलें नव्हतें तरी येथें होईल तितकी खटपट करून तें काम त्यांनीं चांगलें करून पक्षकार—वकील व इतर मंडळीना त्यांनीं फार सभ्य रीतीनें वागविलें. ह्या दोघा अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्यामुळें लोकांना फार वाईट वाटलें. त्यांना वकील वगैरे लोकांनीं पानसुपारीस बोलावून यांचा चांगला मानसन्मान केला. आतां येथें सर्वच साहेब झाले आहेत. काम कसें चालतें. पहावें. मि. प्राईज साहेब यांनीं कामाचा चार्ज घेतला. कळावें हे विनंती.

आपला
"क्ष"

## अर्थशास्त्र.

( १३ वे अंकावरून पुढें चालूं )

भांडवलानें, नवीन संपत्ती उत्पन्न करण्याचे कामांत मजुरांचें पोषण होतें येवढेंच नाहीं; तर त्या पासून दुसरें एक कार्य होत असतें. नवीन अर्थोत्पत्ती राखून ठेविली असते ती सर्व भांडवल आहे. म्हणून इमारती, यंत्रें हत्यारें वगैरे पदार्थ, जे नवीन उत्पत्तीस सहाय्यभूत होतात त्या सर्वांची गणती भांडवलांत होते. कोणता ही कारखाना घ्या म्हणजे, हें लक्षांत येईल कीं, कारखानदारानवळ मजुरास देण्या पुरतेंच भांडवल

म्हणजे झालें असें नाहीं; तर त्याचा कारखाना चालविण्याकरितां, वर सांगितलेली सामुग्री, म्हणजे इमारती, यंत्रें वगैरे पदार्थ ही असावे लागतात. तरी कारखानदार ऐषआरामाचे पदार्थांत जी संपत्ती खर्च करितो, तिला भांडवल म्हणतां येत नाहीं. यावर कोणी म्हणतील कीं सदर्हू कारखानदारानें ऐषआरामाचे पदार्थ घेण्यांत खर्च केलेली संपत्ती ही मनुष्याचे निर्वाहासच उपयोगी पडते; जसें त्यानें १०० रुपयांचा किनखाब घेतला असला तर तो तयार करणाऱ्या मजुरांच पोषणाकडेच हे रुपये लागले. म्हणून ही रकम त्यानें आपले स्वताचे कारखान्यांत घातल्या प्रमाणेंच आहे, एवढ्या करितां या रकमेस भांडवल म्हणण्यास काय हरकत आहे?

ह्या आक्षेपानें, भांडवलाविषयीं एक महत्वाचा प्रश्न उद्भवतो, व तो नीट समजून घेणें फार आवश्यक आहे. तो प्रश्न हा कीं "पदार्थांस गिऱ्हाईक असले म्हणजे त्यानें श्रमास तेजी येते असें नाहीं." कारण श्रमाची तेजी भांडवलावर अवलंबून असते, म्हणजे देशांत मांडवल कमी किंवा जास्त असेल त्या मानानें श्रमास गिऱ्हाईक असते, आणि पदार्थांस तेजी असली तर श्रमाचा उपयोग कोणीकडे करावा, याचा निर्णय होतो. ही गोष्ट उदाहरणानें स्पष्ट करूं. समजा, एक कारखानदार दर वर्षीस १०० रुपयांची कलाबतु घेतो, तर त्यानें हे रुपये कलाबतु खरेदी करण्यांत खर्च केले काय; किंवा आपल्याच कारखान्यांत जास्ती मजुर ठेविले काय एकच. कारण हे रुपये कलाबतुच्या कारखान्यांतील मनुष्यांचे पोषणाकडेच खर्चीं पडले. म्हणून सदरहु कारखानदार कलाबतु न घेतां, आपलेच कारकारखान्यांत ती रकम खर्च करील, तर हें भांडवल एका कारखान्यांतून दुसऱ्या कारखान्यांत गेलें, ऐवढेंच झालें, दुसरें कांहीं नाहीं, असा कित्येकांचा समज आहे. आतां ह्या शंकेचें बरोबर समाधान होण्यास वास्तविक काय प्रकार घडतो तो आपण पाहूं. वर सांगितलेला कारखानदार हे १०० रुपये आपलेच कारखान्यांत घालून कलाबतु घेईनासा झाला तर, कलाबतु करणारा, गिऱ्हाईक कमी झाले, व माल कमी खपूं लागला, म्हणून आपले कारखान्यांतून तितकें भांडवल काढील; व दुसरे एखाद्या कारखान्यांत घालील. आतां हें भांडवल, पूर्वींचा कारखानदार आपल्या मजुरांकडे जे खर्च करितो, ते नमून, अगदीं निराळे आहे. म्हणून या ठिकाणीं भांडवल, एके कारखान्यांतून दुसरे कारखान्यांत गेलें, असें झालें नाहीं. तर त्याची दुप्पट झाली. म्हणजे पूर्वीं नुसतेंच १०० रुपयेच कलाबतुच्या कारखान्यांत होते; ते दुसरे कारखान्यांत गेले; आणि पहिला कारखानदार जो कलाबतू घेईनासा झाला त्यानें कलाबतुंत जे १०० रुपये खर्च होत होते ते आपल्या कारखान्यांत घातले. मिळून पूर्वीं जे नुसते १०० रुपयेच कारखान्यांत होतें, ते आतां दोनशें झालें. यावरून हें उघड होते कीं ऐषआरामाचे पदार्थांत जर भांडवल खर्च केलें, तर व्यापारास चांगलें, हा जो समज आहे तो केवळ भ्रांतीमूलक आहे. ऐषआरामाचे पदार्थ करण्यांत भांडवल खर्चीं पडलें असतां मजुरांचा तर फायदा होत नाहीं; परंतु तुमचे त्यांचे दोन तऱ्हांनीं नुकसान होतें—एक, देशांतील भांडवल कमी होते व दुसरें, नवीन संपत्ति उत्पन्न होण्यास अडथळा होतो.

( पुढें चालू )

वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र वद्य ९ शके १८१५

उन्हाळ्यास प्रारंभ झाल्या बरोबर व्हाइसराय लार्ड लान्सडौन साहेब आपले कौंसिलदार व लवाजमा यांसह सिमल्याकडे जाण्यास निघाले. गव्हरनर आदिकरून इतर इलाखे सरकार आपआपल्या भागांतील रमणीय, थंडगार, व निर्मक्षिक अशा डोंगराशिखर रहाण्यास जात असतात. शैलारोहण करून तेथेंच चार सहा महिने आश्रम स्थापण्याची वहिवाट जुनी आहे तरी त्या पासून जनसमूहाचे मोठे तोटे होतात. हिंदुस्थानच्या खनिन्यांत तूट पडली, हुंडीचा भाव वाढला, कर्जावर राज्य कारभार चालविण्याची पाळी आली तरी आमच्या राज्यकर्त्यांचे विलास, मौजा, नाच, मेजवान्या वगैरे सुखाच्या बाबींत फरक पडतां कामा नये इतकेंच नाहीं तर समुद्रा पासून तीन हजार, पांच हजार अगर सात हजार फूट उंच अशा पर्वताच्या शिखरा वरील राजेशाई महाल बंगल्यांत राहिल्या शिवाय आमच्या राज्यकर्त्यांस चैन पडत नाहीं. राजकीय गोष्टींत विचार करण्यास सिमला, महाबळेश्वर, उटकामंड, नीलगिरी, मायेरान वगैरे स्थळेंच पाहिजेत. त्या खेरीज इतर ठिकाणीं सुखसोहळे पूर्णतेस पोंचत नाहींत. एक पत्रकर्ता म्हणतो कीं, ब्राह्मणाचें वार्षिक श्राद्ध चुकेल पण शैलारोहणांत खळ पडावयाचा नाहीं. खरोखर राज्यकर्त्यांस अशा आनंदाश्रमाची जरूरी असेल पण मजेला ती गोष्ठ आवडेल किंवा नाहीं याचा विचार तलवार बहादूर राज्यकर्त्यांनीं कां करावा बरें! राज्य कारभारांतल्या चिंता, विवंचना, व परिश्रम फार असतात तेव्हां सूत्रचालक अधिकारी शैलशिखरावर राहिले म्हणजे त्यांचें श्रम हरतात व त्यांस विसांवा मिळतो. युरोपियन व नेटिव व्यापारी, पेढीवाले, व इतर स्वतंत्र कारखानदार लोकांस परमेश्वरानें सपाटीवरच्या भागांत राहण्यास शक्ति व सामर्थ्य दिलें आहे तेव्हां कांहीं ठळक ठळक राज्यकर्त्यांसच ही शक्ति दिली नसेल असें आम्हास वाटत नाहीं. राज्यकर्त्यांच्या चैनी व ऐषआराम परभारे फुकटांत होतांत तेव्हां आपोआप चालत आलेल्या लक्ष्मी विलासास तृणवत मानण्याजोगे आमचे राज्यकर्ते तत्वज्ञानी कोठें आहेत! प्रजाजनाशी शैलस्थानापासून संसर्ग व दळणवळण चालत नाहीं. लोकांच्या गरजा व मागण्या राज्यकर्त्यांस कळत नाहींत आणि त्यामुळें आपल्या कर्तव्याला ते विसरतात. प्रजेच्या हिताहिताची फोड नीट होत नाहीं. राज्यकर्ते पाशवीकांत प्रजेस आपल्या तरवारीच्या जोरावर हुकमतींत ठेवितात परंतु राजनिष्ठा, प्रेमभाव, दृढ आसक्ति हीं मात्र विश्वास जातात. श्रमाचा परिहार होण्यासाठीं विसावा पाहिजे आणि त्यासाठीं सुट्या, रजेचे दिवस, वगैरे बिनकामाचे दिवस, सर्वजण उपभोगीत असतात. त्या उपभोगांत मनोरंजनाच्या चैनी केल्या तर त्या योगें कर्तव्य चांगलें बजावण्यास जोर येतो. पण सुखाचीच नित्य अपेक्षा केली तर कर्तव्या पासून विन्मुख मनुष्य होतो आणि कंइट सवयी जडतात. आमच्या राज्यकर्त्यांस मूळच्या वहिवाटी पासून अशाच अनेक खोडी लागल्या आहेत त्या घालविण्याचा त्यांचा इरादा नाहीं तर नामदार दादाभाई नवरोजी सारखें कळकळीचे हितकर्ते पार्लमेंटांत चौकशी करून ही वहिवाट मोडून टाकतील तर मोठें कल्याण होईल.

सर चार्लस इलियट बंगालचे लेफ्टेनन्ट गव्हरनर यांनीं रजा घेतली आणि ती रजा संपते तेव्हां त्यांच्या हिंदुस्थानांतील नोकरीची पांच वर्षांची मुदत ही पुरी होते. रजा घेण्यास कारण कीं जूरीची न्यायपद्धति बंद केल्या विषयीं त्यांचा हुकूम निघाला, होता तो जूरी कमिशनच्या अभिप्राया वरून रद्द करण्यांत आला. सर इलियट हे बंगाल्यांत आल्या पासून त्यांच्या कारकिर्दींत अनेक लोकहिताच्या गोष्टी घडून आल्या सर्व इलाख्यांत त्यांच्या गुणांचीच कीर्ति ऐकूं येत होती. जूरीच्या प्रकरणांत मात्र लोकांच्या अभिप्रायांशी त्यांचा विचार पटला नाहीं. हे मोठे पाणीदार, अभिमानी व विद्वान आहेत. त्यांची कर्तृत्वशक्ति फार विलक्षण आहे तथापि कांहीं सद्गुण मर्यादेच्या बाहेर गेले म्हणजे तेच दुर्गुण होतात त्याच प्रमाणें त्यांनीं आपल्या जूरी संबंधीच्या विचारांचा बाणा राखला तो फार गैर प्रकारें राखला. आपल्या मताचाच विजय व्हावा ही इच्छा चांगली पण हेकेखोरपणानें आपल्या बरोबरीच्या सुज्ञ लोकांच्या म्हणण्याचा अव्हेर करणें व आपलीच प्रतिष्ठा मिरविणें हा चांगुलपणा नाहीं. दुसऱ्यांनीं आपल्या मताचा स्वीकार करावा असें ज्यांस वाटतें त्यांनीं दुसऱ्यांचा मताचा योग्य मान राखला पाहिजे. सर इलियट यांनीं रजा घेण्यांत जो स्वताचा त्रागा केला आहे तो त्यांनाच शांतपणाच्या विचारांत आवडणार नाहीं पश्चात्तापमूलक परिणामीं होईल असें आम्ही समजतों त्यांच्या या कृतीनें लोकमता वरील त्यांचा दाब व जोर कमी झाला आणि ते कोठेंही गेले तरी त्यांस हिंदुस्थानांतली कारकीर्द आपल्या कार्यकालचा शेवट गोड करण्याची मुश्किली दाखवील अशी आम्हांस उमेद आहे.

मामूल वहिवाटी प्रमाणें आकोला हायस्कूल गेल्या ९ वे तारखेपासून सकाळचें भरूं लागलें. यंदा पाऊस फार झाला व तो अगदीं अलिकडे झाला म्हणून सकाळचे शाळा होण्यास एक पंधरवाडा उशीर लागला. सकाळीं शाळा ७ वाजतां भरून ११ वाजतां सुटते. शाळा भरण्याची वेळ जशी कसोशीनें राखली जाते तशी गोष्ट सुट्टी संबंधानें होत नाहीं. सुट्टी नेहमीं ११ वाजल्या नंतर घटका पावघटकेनें झाली तरी चालते किंबहुना ती पुढें ढकलावीच लागते. आकोला हायस्कूल गांवांपासून फार दूर असल्यामुळें विद्यार्थ्यांस अकराच्या उपरान्त उन्हांत तळमळत यावें लागतें आणि त्यामुळें त्यांच्या शरीरावर अनेक वाईट परिणामही होत असतील. सूक्ष्मदृष्टीनें पाहतां सकाळची शाळा विद्यार्थ्यांस हितकारक होत नाहीं. आकोला हायस्कूलाचें स्थळ लोकांस सोयीवार नाहीं म्हणून रोजच्या हजिरीचें प्रमाण फार कमी पडतें असें रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. हे हेडमास्तर असतांना म्हणत असत आणि ते विद्यार्थ्यांचे हाल व ताप लक्ष्यांत आणून उन्हाळ्यांत सकाळची शाळा दहा साडे दहा वाजतां सोडण्या विषयीं काळजी घेत असत. विद्यार्थी पुष्कळ जण गरीब असतात, त्यांच्या जवळ गाड्या घोडे असतात, आणि रहा घालण्या नंतर ही मास्तरांचा मान राखण्या साठीं आवडल्या जागेवर बसतात व अभ्यास न करितां सुटीची घटका मोजीत असतात या गोष्टी आमचे आक्टींग हेडमास्तर रा. रा. हरी रामचंद्र रोहिणखेडकर बी. ए. लक्ष्यांत घालील असें आम्ही इच्छितों शाळा एक तास कमी केली अगर सकाळीं एक तास अगोदर भरविली तर त्या पासून विद्यार्थ्यांस मोठा संतोष होऊन ते आपल्या गुरुवर्यांचे गुण सुवाद्य गातील यांत काडीमात्र संदेह नाहीं.

## The Berar Samachar

MONDAY APRIL, 10 1893.

The Indian Councils Act of 1892 gave us for the first time the right of discussing the annual budget, and the budget estimate of the revenue and expenditure of the the financial year which has just begun is accordingly before the Imperial Legislative Council. His excellency the Viceroy regretted the fact that the irony of events invited discussion on a statement of a dis heartening feature the like of which the financial minister had never the ill luck of submitting. Sis David Barbour admits the fact that the revenue of the vast Indian empire is gradually rising and presents still more hopeful prospects in future. The branches of expenditure are multiplied and have also augmented the sphere of their wide extent. There is every chance of matters turning unfavourable to the equi librium between revenue and expenditure. The probabilities of the times are that the difficulties with which the finances of India have been beset for the last five years are too many and the ways and means proposed to meet them were so many efforts to evade them. But the efforts of avoidance and evasion proved inadequate and we are now brought face to face with the stern realities. The sorry tale of the Indian finances is not an upshot in issues and events of the present year. It is rather the result of the growing and uncontrolled expenditure of the past. The aggrandizing policy of expanding the British dominitions, the ambitious war-affairs and expeditions

in petty states on the northern borders, the military proceedings in the frontier questions of demarkation, and the heavy and fast increasing demands of the State Secretary on the national Exchequer have all united to lead India in the way of bankruptcy and insolvency. It is true that Sir David argues that Indian finances are still adequate for her wants provided the rate of exchange remains stationary and stops all further fluctuations and embarrassments. The rate of exchange is, in the opinion of the Friance-Minister the sole grand cause which dwarfs all others in the magnitude and importance of the manifold evil effects on the financial equilibrium. We would do better if we were to to state, in the very eloquent and suggestive words of Sir David Barbour, some of his statements on the present position and future policy in connection with the Indian finances. The views of that able financier and stateman are as follow:—

"The Revised Estimates of the current year show a deficit of Rx. 1,081,900; the Budget Estimates of the coming year show a deficit of Rx. 1, 595,100. The prospects of the future are disheartening because, although the ordinary Indian Revenue grows rapidly, the fluctuations in Exchange are such as to set all calculation at defiance. The increase in Expenditure during the last two years, caused by the fall in in the rate of exchange, amounts to Rx. 4, 142,400, and the increase of Expenditure due to this cause has not yet come to an end. The heavy fall in the rate of exchange has most seriously affected the position of Government servants not domiciled in India; their case cannot be put on one side much longer, and, as matters now stand, no remedy is possible which does not involve further increase of Expenditure."

"Under the circumstances stated in the preceding paragraph the natural and ordinary course would be for the Government of India to at once take such measures as would suffice to cure the existing deficit and establish equilibrium between Revenue and expenditure. Financial embarassment gathers weight and force the further it proceeds, and it is the obvious duty of every Government to allow no avoidable delay to occur in dealing with a declared deficit. Postponement of action cannot be justfied except on grounds of irresistible weight.

"The immediate cause of our financial difficulties, and the cause which, by comparison and for the time being, dwarfs all others, is the fall in the gold value of silver, which, as I have already shown, has added to the Indian expenditure in two years more than four crores of rupees. If that fall could be stayed and the rate of exchange with England fixed permanently at even its present low figure, the difficulty of dealing with the present deficit would be comparatively light. The Revenue continues to grow in a satisfactory manner; even under the influence of indifferent seasons and poor harvests it has made fair progress. If we could feel assured that there would be no further fall in exchange, I have little doubt that increase of Revenue, restriction and reduction of Expenditure, with possibly some taxation of a temporary nature, would, in a very short time, re-establish equilibrium. A serious would no doubt be required in the first instance, but with a fixed rate of exchange we would have a definite task before us and our measures could be regulated accordingly."

Sir David Barbour concludes his well-balanced arguments coupled with lucid explanations of the present matters, in a para of a sound and solid counsel which ought to command the attention of every thinker. The laconic style of it is as well most striking as it is general and comprehensive in its terms:—

"Even under present circumstances, when the horizon is dark with the approach of what may prove to be the greatest financial convulsion of the present century, I do not draw back from the opinion I formerly expressed that the revenues of India are adequate to meet her wants; but I wish to say in the most emphatic terms that, if the Ship of State is to pass successfully through the storm which she is now entering, our measures must be taken in due time, must be regulated by prudence and forethought, and must be carried into execution with strict regard to economy."

But after all to our plain mind there can be no solution of the question of Exchange even if ten English Committees were to sit in succession to that of Lord Herschell. Because the causes that govern the rapid fluctuations in the rate of exchange are not within the measure and compass of one nation. It is only an international settlement of the problem that will remedy the present grievances. The Government has already threatened us with the near and immediate chances of a new taxation. When all the available resources of revenue have been exhausted to meet the large deficits the imposition of a new tax will in the long run make the nation worse in its material condition. Taxation beyond a certain limit and beyond the means of the taxpayer results in the helplessness and bankruptcy of the imperial finances. The Indian ryot cannot bear an iota of any addition in the already crushing burden of taxes. The general shrinkage in people's abilities to pay the govt. dues is no safe solution of the present circumstances. Whatever may be the woes of the Civil and Military servants who receive their salaries in the depreciated Rupee and howsoever pressing may be the demands of the India-offices in England we must confess, we are sorry, that no human financier under the present circumstances can secure the stability and equilibrium of the Exchequer unless all the expenditure be defreyed absolutely and unconditionally in the Indian Rupee—no matter whether the value of silver in gold rises or falls.

---

The Honorable V. Bhashyam Iyengar at the last convocation-address directs the attention of his learned audience to the fact that the educated people are to pose themselves between the govt. and the ryot and make the work of administration as speedy, cheap and beneficial as possible. He attempts to point out the institutions where our pioneer efforts in that direction should begin and leaves a suggestion as to how we should proceed. He observes:—

"Municipalities, Local Fund Boards, and the system of trial by jury have now been in existence for some years. The principle of popular election by vote has been recognized in the constitution of municipal, local fund, and temple councils; and it has just been introduced, in a modified form and to a limited extent, in the Imperial and Local Legislative Councils.

"Remember, gentlemen, that this system is on its trial in India; and unless you prove to your rulers that you are fully alive and equal to the responsibilities imposed upon you, you will not be justified in asking for greater privileges. It, therefore, behoves you to exercise the right of voting with discrimination and a sense of responsibility and to impress upon the minds of electors the importance of the franchise. Popular election can work successfully only when every individual vote, though in itself a drop in an ocean, is realized to be of sufficient importance given, and to be given too, under a sense of public duty, and not from considerations of race, kinship or friendship."

Having thus indicated the line of our future work he does not omit to take note of the obstacle that lies in our way. Here it is that he freely expresses his despondent view of the matter. It is however well instructive to note what he says in vague generalities.

"The Bureaucratic system in this country is not calculated to widen your sympathies or enlarge your views. An administrator of a Taluk, Division, or District is often apt to fancy that he is a king in miniature and as such "can do no wrong," and that any person criticising his official acts in the press or elsewhere is guilty of disloyalty or disaffection to the British Throne. When you rise to any such position bear in mind that you are, as your designation significantly denotes, only a servant of the Public, and that it is your duty to consult always the interests of the people and promote their good and not domineer over them as their lord."

---

## WOMAN'S RIGHTS

(By Helen M. Burnside)

At present there is a great question agitated before the English public in regard to woman's Rights. The following piece of poetical composition by the above named authoress I send to you for the use of your readers. I quote it *in extenso* from the Girl's own Paper for February 1893.

"Oh! Those boasted "rights rights of women"
Rights, of which so much is said!
Yet what are they? Can you tell me,
Wedded wife or learned maid?
'Tis a vexed and vexing question,
Which I fain would understand,
Often asked, but never answered,
Oh, my sisters in the land.
In the days long syne, I'm thinking,
Hearts were just as brave and true;
Woman's work was never wanting
For a woman's hand to do.
'Twas our privilege and duty
To shed light on Earth's dark ways,
Though we never talked, or dreamed of
"Woman's Rights in those old days!
Ah! long syne lang syne, my sisters
There were women standing by
When the Saviours went
Up the steeps of Calvary.
Women soothed the pain and anguish
Of those hours, so dread and dim;
Their's the right, so sweet yet awful
E'en to minister to him!
Such sweet rights are ours for ever,
Oh, my sisters in the land!
Rights of ministry and mercy,
To be wrought with heart and hand.
Think you that that those "rights" you talk of,
Make them whatsoer you please,
Can be deemed more honour worthy
Or more high and dear than these?

*G. N. K*

---

## वऱ्हाड

सर्जन क्याप्टन आर. वी. रॉ० सिव्हील सर्जन, वऱ्हाड हे रजेवर विलायतेस गेले असून त्यांनीं सहा महिन्यांची आजारीपणाची रजा आणखी घेतली आहे.

रा. रा. पी. गोविंदराज ऐ० असि. कमिशनर यांची बदली बुलढाण्याहून उमरावतीस झाली.

उमरावती, इलिचपूर, आकोला, खामगांव, शेगांव, आकोट, वाशीम, व उमरावती क्यांप येथील मुनसिपल हद्दींत सन १८८०चा देवी काढण्याचा कायदा चालू करण्या विषयीं अकिशान रेसिडेंट साहेबांचा हुकूम झाला आहे.

वऱ्हाडचें फर्स्ट असिस्टंट रेसिडेंट मि. जी. इरविन यांची अन्य प्रांतांत बदली झाल्यामुळें त्यांच्या जागीं मि. बं.जानक्केट यांस नेमिलें.

मि. सय्यद महमद नायब तहशिलदार यांस जळगांवासच रा. रा. वामन गणेश यांच्या रजेंत आक्टिंग तहशिलदार नेमिलें.

रा. रा. शामराव रामचंद्र यांस येथील मराठी आफिसांतून जळगांवच्या नायब तहशिल्दारीवर धाडलें.

मि. रुस्तुमजी फरदुनजी असि. कमिशनर, बुलढाणा यांस ५००० रुपया वरील दावे चालविण्याचा डेपुटी कमिशनरचे कोर्टांचा अधिकार मिळाला.

मि. मीर सफदर अली बेग एक्स्ट्रा असि. कामशिनर मेहकर व मि. इ. मार्शल एक्स्ट्रा असि. कमिशनर आकोला या उभयतांच्या कोर्टास असिस्टंट कामिशनर वर्ग १चे अधिकार देण्यांत आले.

गेल्या गुरुवारीं रात्रीं उमरावती येथील नेटीव क्लबांत कर्नल मेकंझी कमिशनर वऱ्हाड यांस सी. आय. इ. हा किताब मिळाला ह्मणून त्यांच्या सन्मानार्थ पानसुपारी देण्याचा समारंभ झाला.

मौजे अंजनी खुर्द ता० मेहकर येथून एक 'क्ष' कळवितात कीं गेल्या तारीख २७-३-९३ रोजीं तेथील शाळेंत रा० रा० विठ्ठलराव दाजी साहेब काळीकर तहशीलदार हे शाळा पाहण्यास आले होते आणि शाळेची सुव्यवस्था पाहून त्यांनीं मुलांस बसण्यासाठीं तरटें करण्याकरितां १० रुपये वर्गणी जमा करून दिली. तहशीलदार साहेब ब्वकर कायम व्हावे अशी रयतेची मनीषा आहे कांकीं ते सर्व प्रकारें तसेच चांगले आहेत.

मि. अनवरअली तहशीलदार आकोला यांनीं तीन महिन्यांची हकाची रजा घेतली आहे. त्यांच्या रजेंत येथील नायब तहशीलदार रा० रा० माधवराव रामचंद्र यांस आक्टींग तहशीलदार नेमलें ही निवड मोठी चांगली झाली.

---

## अकोला बाजारभाव

हुंडी मुंबईची दर्शनी.... .... .... ९९|||=
" १५ दिवसांच्या मुदतीची.... ९९||=
सुवर्ण २६|| .... .... रुपें ....१०८||
मीठ....३|||= .... आळशी मापी १०७
नवस वननी ११२|| .... चणे ६०-६५
गहूं काठे............ ७२ बनशी ....८४
साखर.... ३||....करांळे.... .... ४|=
उडीद....३|.... .... मुग२||=
जवारी ५७— ६० ....सर्की ....५||
तूप.... ८ ............... तेल ७
कापूस....५२ ............रुई ६०—७१

सट्याचे भाव (इंग्रजी)

गहूं वैशाख शुद्ध १९४९........ ६६
आळशी चैत्र "........"........ ०
रुई फाल्गून............" ........ ०
सर्की वैशाख नवे साळची" ....५....५||
जवारी.... वसंत........"............ ०

---

## वर्तमानसार.

कानपूरच्या बराकींतून नवीन तऱ्हेच्या सरकारी ६ बंदुका चोरीस गेल्या व त्यांचा पत्ता नाहीं.

दिवाळींत जो जुगार न खेळेल त्यास पुढच्या जन्मीं माकडाचा जन्म येईल अशी पंजाबी लोकांची समजूत आहे.

हिंदुस्थानच्या प्रवासास निघालेला आस्त्रियन राजपुत्र कलकत्त्यास येऊन विनास रवाना झाला.

बंगालसरकार आपल्या प्रांतांत आनररी मुनसफ व आनररी बेंव मुनसफ असे नेमीत आहेत.

धूर न होणाऱ्या दारूचा अनुभव हिंदुस्थानांत लवकरच पाहाण्यांत येणार आहे.

ब्रह्मदेश व सायाम यांच्या दरम्यानची हद्द कायम करण्याचें काम चांगल्या रितीनें चालूं आहे.

सायामच्या हद्दींत मेक्यांग नांवाची एक नदी आहे, व ती सयाम सरकारच्या मालकीची आहे. पण त्या नदीवर हल्लीं फ्रान्स आपली मालकी सांगत असून त्या नदींतून इग्रजांच्या लोकांस जाण्या येण्याची बंदी करण्याचा फ्रान्साचा विचार आहे असें सांगतात.

कुरम खिंडीवर बुलंदखेल येथें कांहीं आठवड्यां पासून जी इंग्रजी फौज ठेवण्यांत आली होती त्या फौजेस तें ठिकाण सोडून देवून परत येण्याचा हिंदुस्थानसरकारचा हुकूम झाला. पीन साहेबा बरोबरच्या खलित्यांत अमिराची हीच तकरार होती असें सांगतात व त्या करतांच ही फौज माघारी आणण्यांत आली असेल तर हिंदुस्थान सरकारानें हें फार धोरणाचें काम केलें असून त्याच्या योगानें अमिरास फार समाधान होईल असें वाटतें.

मोरोको प्रांतांत फिगीग येथें लढाई सुरूं आहे असें सांगतात.

विलायतच्या पार्लमेन्टमेंबरांस वेतन देण्या बद्दलचे पार्लमेन्ट सभेपुढें बील आणण्याची सूचना पास झाली. आतां तें बील २७६ मतें बिलाच्या तर्फेची व २२९ विरुद्ध झालीं. लवकरच पार्लमेंट पुढें येणार आहे.

मद्रासच्या कालेजांत संस्कृत प्रोफेसरच्या जागीं मिळेल तर कोणा नेटिवांचीच नेमणूक करावी असें स्टेट सेक्रेटरी कडून या पूर्वींच हिंदुस्थान सरकारास लिहून गेलें आहे, असें मि. दादाभाई याच्या प्रश्नास उत्तर देतांना अंडर सेक्रेटरी मि. रसेल यांनीं पार्लमेन्टांत सांगितलें.

हुंडीचा भाव वाढल्यानें हिंदुस्थानच्या सिव्हिल व मिलिटरी कामदारांचें जें नुकसान होत आहे तें भरून देण्याची तजवीज करणें अवश्य आहे कीं नाहीं हें ठरविण्या करतां एक कमिटी नेमावी अशी सर सीमोर किंग यांणीं पार्लमेंट पुढें एक सूचना आणली त्या सूचनेंत सुधारणा ह्मणजे फेरफार करण्याची उप सूचना मि. दादाभाई नवरोजी यांणी आणली व त्यांत ते ह्मणाले कीं, इंग्लंड हिंदुस्थाना पासून फार मोठी संपत्ती मिळवीत असून हिंदुस्थान करतां एक पै ही खर्च करीत नाहीं, या करतां हिंदुस्थाच्या प्रजेवर हा नवा बोजा लादणें अगदीं अन्यायाचें आहे.

मि. रसल ह्मणाले कीं, हिंदुस्थानच्या नेटिव लोकांच्या हिताचे रक्षण करणें हें सरकारचें कर्तव्य आहे हे मि. दादाभाईचें ह्मणणें मला कबूल आहे.

निझामाच्या हैद्राबादेस कोणत्या वेळीं काय गपा उठतील व कोणत्या वेळीं काय काय घाणेरीं कृत्यें बाहेर येतील याचा कांहीं नेमच नाहींसा झाला आहे. चालू असलेल्या अति घाणेरड्या अब घेण्याच्या खटल्यांत असे कित्येक प्रकार बाहेर आले आहेत कीं, त्यांची आटवण झाली ह्मणजे वाईटच वाटतें. आतां अशी एक गप बाहेर आली आहे कीं, तो अबूचा घाणेरडा खटला ज्या मित्र नांवाच्या माणसावर चालू आहे तो मित्र गरीब असून त्याच्या पक्षाच्या वकील बारिस्टरांचा वगैरे सर्व खर्च निझामाच्या कारभारी मंडळा कडून पुरविण्यांत येत आहे आणि तो खर्च पुरा करण्याकरतां एक बड्या कामदारानें दुसऱ्या एका फार बड्या कामदाराकडून धमकी देऊन लाख रुपये उपटले अशाबद्दल तेथील रेसिडन्टाकडे एक फिर्याद झाली आहे व रेसिडेन्टाकडून त्याची चवकशी चालली आहे. या कामदारांचीं नांवें वगैरे जरी बाहेर आलीं आहेत तरी त्या गोष्टीस आधार काय हें अजून बाहेर आलेलें नाहींच. पण तें कसेंही असले तरी या असल्या फिर्यादी रिसिडेन्टाकडे कां व त्याणें त्यांची चौकशी करावी कां हें समजत नाहींच. रेसिडन्ट हा निझामावरचे अपील कोर्ट आहे कीं काय?

गिऱ्हाइकांस फसाविण्याकरतां खोटा हिशेब ठेवण्याची कित्येक व्यापाऱ्यांची रीत आहे ती मोडण्याकरतां पीनलकोडांत सुधारणा करण्याचा सरकारचा विचार आहे. विचार चांगला आहे. पण त्याच्याच बरोबर विलायतेहून येणाऱ्या कापडांत वाजवीपेक्षां जास्त खळ घालून हिंदुस्थानच्या गरीब गिऱ्हाईकांस फसाविण्याची जी रीत सुरू झाली आहे त्या करतां ही पीनलकोडांत एक सुधारणा याच्याच बरोबर करण्यांत येईल तर फार चांगलें होईल ठा. अ.

बडोद्या येथें राजमार्गावर स्टेशनावरून येणाऱ्या एका व्यापाऱ्याला कांहीं लोकांनीं आडविलें, व आपण अफु घेऊन जात अहां तेंव्हां आपला झाडा घेतला पाहिजे असें मिष केलें, झाडा घेताना त्या व्यापाऱ्या जवळ आठ हजाराचे तोडे दिसले; पैकीं दोन हजारांचे त्या चोरांनीं घेऊन ते फरारी झाले.

अनुयन नांवाचें एक खेडें फ्रेंच सरकारच्या ताब्यांत आहे. या खेड्यांत घरें २५ च आहेत. परंतु त्यांत ८५ वर्षे होऊन गेलेली माणसें १८ असून १०० वर्षांवरील वयाची ही दोन आहेत. गांवाला स्मशान भूमि नाहीं आश्चर्य!

दंतकृमीवर अनुभवलेलें औषध — निळी निर्गुड, कावळी आणि कडू भोंपळी या प्रत्येक वनस्पतीच्या मुळाचे चूर्ण करून ते चूर्ण दातांत भरावें ह्मणजे कृमीला पाडून टाकितें.

दुसरा उपाय— कोरांटीचीं पानें बारीक चांटून तीं दातांत धरावीं. याप्रमाणें तीन दिवस करावें. गुण येईल.

तिसरा उपाय— रक्तबोळ व गुग्गुळ दाढेस लावावा.

खोकल्यास उपाय— टाकणखाराचा लाही आडुळशाच्या रसांत उगाळून द्यावी.

दुसरा उपाय— काळी मिऱ्ये किंवा थोडी हळदीची बुकी दुधांत घालून तें दूध गरम करून प्यावें.

तिसरा उपाय— अबाळ्याचें चूर्ण १ तोळा व मिऱ्याची पूड १ तोळा हीं एकत्र करून मधांत चाटन करून द्यावें. दिवस तान.

पटकीवर "रामबाण" उपाय — सफेत कांदा, फुदीना (बडतलाव) व आलें हे तिन्ही जिन्नस समभाग घेऊन त्यांचा रस काढून त्यास थोडा हिंग लावून प्रथम जुलाब व उलटी होतांच रोग्यास द्यावें ह्मणजे तावडतोब गुण येतो. न्या. ह.

महाराणी साहेब व्हिक्टोरिया ह्या हल्लीं इटलींत फ्लारेन्स येथें गेल्या आहेत.

स्त्री मजूर— अमेरिकेंतील छापखान्यांत ३००० स्त्रिया अनेक कामावर आहेत खुद्द लंडन शहरांत १०० स्त्रिया खिळे जुळवण्याच्या कामावर आहेत.

क्वयनाइनचें उत्पन्न— सगळ्या जगांत दरसाल ५०००००० औंस क्वयनाइन तयार होतें. कायनइन तयार करण्याचे जगांत १७ कारखाने आहेत, पैकीं एकट्या जर्मनींमध्यें ६ कारखाने आहेत.

लबाड पोलिसास शिक्षा— पांडू विश्राम नामक मुंबई पोलिसांपैकीं एका शिपायानें भिमा, येसू व नारायण बाबाजी यांच्या पासून कांहीं दिवसांच्या बोलीनें एक करगोटा आणि हातांतील रुप्याचीं कांकणें लग्नासाठीं ह्मणून मागून नेलीं. बोली प्रमाणें त्या जिनस परत दिल्या नाहींत एवढेंच नव्हे पण मालकांनीं मागितल्या असतांही परत दिल्या नाहींत. उलट त्या सावकाराजवळ गहाण ठेविल्या असें मालकांस समजल्यावरून ती गोष्ट मालकांनीं पोलिसच्या मुख्यास कळविली. तीवरून पोलिसांनीं त्यास पकडलें, व सावकारा जवळ दागिने ही मिळाले. त्यावर खटला होऊन त्याची त्याजवर पूर्ण शाबिती झाल्यामुळें माजिस्ट्रेट मि. ह्यामिल्टन यांनीं सवर पोलिसास सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा दिली.

युरोपियनावर भयंकर आरोप—आग्रा आणि अजमीर यांच्यामध्यें बी. बी. आणि सी. आय. रेलवेचें बानकी ह्मणून स्टेशन आहे. तेथें मि० प्राइस यास पोलिसांनीं पकडलें आहे. ज्या गाडीनें मि० प्राइस जात होता त्याच गाडीनें एक श्रीमान नेटिव स्त्री जात होती. तिच्या आंगास मि० प्राइस झोंबला असा त्याजवर आरोप आहे. ह्या गोऱ्या मनुष्याचा बाप फार संभावित असून अजमीर येथें राहतो.

ठराव ज्यांस फांशीं दिलें त्यांचीं प्रेतें आजपर्यंत तुरुंगाच्या स्मशानांत पुरीत असत, पण यापुढें तीं प्रेतें त्यांच्या आप्तांनीं अगर स्नेह्यांनीं मागितली असतां अंत्य विधीसाठीं द्यावीं असा ठराव हिंदुस्थान सरकारानें नुकताच केला आहे.

नरयज्ञ—पेल्का नांवाचें एक जहाज उत्तर समुद्रांत गेल्या दिसेंबर महिन्यांत फुटलें. त्यावरील चार उतारू एका फळीच्या आधारानें तेरा दिवस समुद्रांत तुरंगत होते. तितक्या भुकेनें व्याकूळ झाल्यामुळें आपल्यापैकीं एक जणास मारून त्यांनीं तेथें भोजन केलें. पुढें त्यांना एक जहाज भेटून त्यानें त्यांस वर घेतलें. माणुस मारल्या बद्दल हल्लीं त्यांच्यावर खटला चालूं आहे. शु. सु.

दीर्घ प्रयत्नानें आंधळा मनुष्य मोठमोठ्या योग्यतेस चढल्याचें विलक्षण उदाहरण—डाक्तर रजेर या नावाचा एक लंडनांतील गृहस्थ ज्यानें नुकतेंच आपलें लग्न केलें हा लहानपणींच आंधळा झाला. परंतु आंधळेपणामुळें त्याच्या अभ्यासाला मुळींच अडथळा न येतां त्यानें लंडन युनिव्हर्सिटीच्या कितीएक पदव्या मिळविल्या. विशेष सांगण्यासारखी गोष्ट ही कीं तो आतां यशस्वी सॉलिसिटर झाला आहे.

दिल्लीपासून कराची जवळ पडावी ह्मणून रोहटक व शिंद मधून आगगाडीचा फाटा नेण्याचा विचार आहे.

सिंधू नदीच्या कांठच्या सक्कर शहरीं रॉकॉईला करितां खणून पाहणार आहेत.

टर्की मध्यें अर्थशास्त्राचे आधारानें गाई मारण्याचें बंद केलें आहे.

कलकत्याकडे साधारण इनफ्लुएंझा सुरू झाला आहे. सु० प०

गेल्या खानेसुमारीवरून असें दिसतें कीं, गेल्या दहा वर्षांत हिंदुस्थानच्या बहुतेक प्रांतांतील लोक संख्या शेकडा १० पासून २५ ह्या प्रमाणानें वाढली आहे. पण अयोध्या व वायव्य प्रांत ह्यांतील लोकसंख्या मुळींच वाढली नाहीं. व ह्याचें कारण इंग्रजी शास्त्री असें सांगतात कीं, त्या देशांत भलत्याच एका नक्षत्राचा पर्जन्य पडल्यामुळें संतती वाढली नाहीं. विशाखा, अनुराधा वगैरे नक्षत्र पडल्यास उंदीर व विषारी प्राणी यांची उत्पत्ती होते असें सांगतात. पण मनुष्याची उत्पत्ती बंद करणारें हें नवें नक्षत्र वरील शास्त्री बुवा सांगतील तर सर्वांस मोठा उपयोग होईल.

पुढील सालीं उत्तर प्रांतांत नवीन रेलवे बांधण्याचें घाटत आहे. रतलामा पासून भरतपुरावरून मथुरा पर्यंत एक, कुठनापासून सागरा पर्यंत दुसरी, विकागंजापासून इरावतीपर्यंत तिसरी. लुधियाना पासून फरोजपुरापर्यंत चौथी. पांचपुरापासून उमरकोटपर्यंत पांचवी. आणि सहावी. हिचाच फाटा गढमुक्तेश्वरापर्यंत बांधावयाचा. ह्या प्रमाणानें चोहिकडे रेलवे बांधली गेल्यास लोकांची सोय उत्तम होईल, पण ह्या सर्व रेलवे इंग्रजाच्या असल्यामुळें लोकांस भाडें खर्चण्याची ऐपत राहणार नाहीं असें वाटते ! !

मद्रासेतील विजेच्या ट्रामवेचें काम सुरू करण्यास आणखी ६ महिन्यांची मुदत कंपनीनें मागितली आहे. स. शो.

विंचवावर औषध.—सुपारी पाण्यांत सहाणेवर उगाळून तो बलक चावल्या जागीं लावावा, व तो वाळेपर्यंत ती जागा शेकावी, वाळल्याबरोबर विंचू उतरून रोग्यास सुखावह वाटतें. हा उपाय आह्मीं प्रत्यक्ष करून पाहिला आहे. भि० वि०

---

हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाचा आगाऊ ... (top line cut off)
साहामाही " ३ " ८९
सालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास ............... ४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ......०।१

Annum in arrears 7 ,,1Rs 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy..............................4as

Advertisement
Below 10 lines...2Rs
per line over10... 4 as
Repetition perline 3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXVII AKOLA MONDAY 17 APRIL 1893 NO. 15

वर्ष २७ आकोला सोमवार तारीख १७ माहे एप्रील सन १८९३ इ० अंक १५

## CLEMENTS TONIC

### दुखणेकऱ्यास संजीवनी

### क्लेमेंटचें टानिक.

( दुनियेचा पौष्टिक दवा )

क्लेमेंटचें टानिक ही रामबाण, त्वरित, आणि काय ती एकच खात्रीची औषधि आहे. हिच्या योगें मज्जूतील क्षीणता, शरीराचा ऱ्हास, चेतनाशक्तीचा हीनपणा, साधारण अशक्तता, कण्यांतलि थकवा, धातुश्राव आणि दुष्ट हवा, मनस्वी क्लेश, दगदग, दुर्व्यसन, दुरुपयोग, मूर्खपणा अगर अविचार या पासून शरीर क्षीण होऊन ज्या व्याधि जडतात त्या सर्व व्याधि व रोग दूर होतात.

क्लेमेंटचे टानिक स्वाभाविकपणेंच मनुष्याच्या शरीराला हुषारी आणते, क्षीण व अशक्त मनुष्यास तजेला व शक्ति देते. कमकुवत मनुष्यास सदृढ, बळकट व वीर्यवान बनवितें आणि नाजूक स्त्रिया बांध्यानें मजबूत व पाणीदार अशा करितें.

तरुण, मध्यम वयाचे, व म्हातारे पुरुष व स्त्रिया यांस खात्रीचे गुणावह औषध म्हणजे क्लेमेंट टानिक असें आढळेल. शारीरिक मानसिक मनस्वी दगदग, दुःख, उघड्या हवेंत राहणें, गुप्तस्त्राव, छांदिष्टपणा यां पासून ज्यांना विकृति जडतात अथवा ज्यांनीं अज्ञानपणानें व खोडसाळपणानें प्रकृति बिघडून घेऊन स्वतांवर अनेक दुःखें ओढून घेतलीं त्या सर्वांस याचा गूण आला आहे. शरीर क्रमाक्रमानें थकत चाललें असतांना त्या ऱ्हासाचीं लक्षणें या औषधानें तावडतोब नाहींतशीं होतात आणि कमी कमी झालेल्या शक्ति पूर्ण प्रमाणें जोमदार होऊन प्रकृति निकोप होते. मुख्य मुख्य इंद्रियें कमताकत झालीं, मेंदू बिघडला, शरीराचे व मनाचे व्यापार कुंठले, विचारांचा घोटाळा झाला, ज्याचा त्याला भरंवसा वाटेनासा झाला, स्वभाव अनावर व शीघ्र कोपी झाला, उदासीनता व भित्रेपणा वाटला, गुडघे व पाठ थकली, छाती धडघडूं लागली, वातशूळ झाला, कंबरेंत सलका मारल्या तसेंच पाठींत दुखणें वेळोवेळ दांत दुखणें अनयत्र तिडकणें झोंप नाहींशी होणें, कपाळ दुखणें पहाटेस थकवा येऊन अवयव दुखणें, मूत्रपिंड व मूत्राशय यांची आग होणें लघवी पांढरि होणें परमा व गुप्तस्त्राव यांनीं धातुपात होणें या व्याधि झाल्या अथवा स्त्रीपुरुषास आपल्या जन्मांतलीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या बजावण्यास नालायक करणारा व त्यांच्या कामांत व्यत्यय आणणारा असा मानसिक व शारीरिक कोणताही आजार झाला तर या सर्वांवर क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय ठरला आहे व ठरत आहे.

क्लेमेंटचें टानिक हें खरोखरीच मनुष्यमात्रास एक ईश्वरी देणगीच मिळालेली आहे हें घेतल्या बरोबरच आपला रोगनाशक अद्भुत प्रभाव दाखवूं लागतें. ह्याविषयीं घेणारांची साक्ष सर्वत्र व विश्वसनीय अशी आहे. ते म्हणतात कीं, ह्याच्या प्रत्येक भागानें गुण येऊं लागतो. हें ज्ञानतंतूची जबरदस्त शक्ति वाढविणारे टॉनिक असून हें शरीरांतील सर्व अवयवांना व स्नायूंना ज्ञान तंतू योगानें पूर्व स्थितीवर आणणारें शक्तिदायक सत्व पोहोंचवितें; इतकेंच नाहीं पण तीक्ष्ण रोग थकवा, मेहनत, अतिश्रम अथवा कित्येक कुकर्मांच्या योगें शरीरप्रकृति अशक्त झाली असली, किंवा जोंवर ज्ञानतंतूंची अशक्तता, साधारण किंवा स्थानिक अशक्तता चालू असेल तोंवर कोणत्याही कारणानें अशक्तता आलेली असली तरी हें औषध घेतल्यावर गुण आल्यावांचून राहणार नाहीं. जोपर्यंत क्षीणता व ज्ञानतंतूची अशक्तता हींच रोगाचीं कारणें असतील तोंपर्यंत, क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय आहे.

रोग्यांनीं लक्षांत ठेवावें कीं क्लेमेंटचें टानिक हेंच एक खात्रीचें औषध आहे, सर्व गांध्याकडे व बाजरांत तें विकत मिळतें F. Moor Clements. ही सही पेटीच्या बुडाशीं व वरच्या भागीं पाहून त्याची खात्री करून घेतांनां सावधागिरी ठेवावी, आणि जे नकली औषधें विकतात त्यांच्या पासून घेऊं नये. " क्लेमेंटचें टानिक "नांवानें शोध करा, आणि तेंच अस्सल औषध घ्या. हाड, मज्जा, व स्नायु ही यानें बनतात, आणि रक्त व मेंदु यांना हें फार मानवतें. हें घेतल्यानें प्रकृति सदृढ, बळकट, ताकतदार, आणि जोमदार होते आणि दुनियेंत या सारखी ईश्वरी देणगी दुसरी नाहीं.

इंडियांतील एजंट—कॅंप आणि को, ट्रेचर आणिको मुंबई, बालंटाईन को; स्मिथ, स्टानिस्ट्रिट को, बोनन को, कलकत्ता; डब्ल्यू इ. स्मीथ को, मद्रास; एन. एस. फरनानडो, कोलम्बो; आणि सर्व ठोकळ व किरकोळ गांध्याचीं दुकान.

F. M. Clements, Inventor Sydney, Australia.

---

नोटीस

ती० मारुतीसा भवानसा रंगारी राहाणार दुकान पेठ बाळापुर शेवेशी तुकाराम भवानसा रंगारी राहाणार बाळापुर साष्टांग नमस्कार विज्ञापना या नोटीशीने आपणास कळवितो कीं संमत १९४६ अधिक भाद्रपद मासीं तुमचे आमचे हिस्से जाहाले त्यांत अकोले येथील नबाबपुरा येथील हवेली उभयताच्या वाटणीवर आली असून त्या प्रमाणें तुम्ही तीचा निमेहिस्सा मजला दिला नाहीं व आपण म्हणता कीं मी अर्धा हिस्सा तुझे वाटणीचा खरेदी घेतो वगैरे परंतु तसे ही केले नाहीं. याज करतां ही नोटीस दिली आहे तर नोटीस पावल्या पासून पंधरा १५ रा दिवसांत सदर्हु हवेलीची वाटणी करून आपचे ताब्यात द्यावी आणि नुकसानी बद्दल भाडे दरमहा रुपये ५ पाच या प्रमाणें सर्व २ महिने ९ नऊ बदल भाडे रुपये ( १६५ ) द्यावें सदरहु मुदतींत नोटिशींत लिहीले प्रमाणें आपण केले नाही तर सदर्हु हवेलीचा अर्धा हिसा रुपये ७५० साडेसातशे रुपयांस खरेदी घेतला असें समजून रुपये न द्याल तर आपणावर रुपये ७५० चा दावा सदर्हु मुदत संपताच करूं व या नोटिशीचा व नोटीशींत कळविलेल्या सर्व गोष्टींचा निकाल होई पर्यंत जो खर्च लागेल तो आपल्यास भरून द्यावा लागेल म्हणून दिल्ही नोटीस सही ता० १२ माहे एप्रील सन १८९३ इसवी.

सही.

तुकाराम भवानसा रंगारी बाळापूर दस्तुर खुद्द.

---

नोटीस

मेहेरबान खाजा ग्यासोद्दीन वल्लद खाजा निजामोद्दीन नकल नवीस वस्ती अकोले यांस.

खाली सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं कजवे अकोले येथील काळे हनुमान पुष्पातील मकान माझे चुलतीचे वडिलोपार्जित असोन त्यांत मी व माझी चुलती राहत असोन ते नादुरस्त झाल्या कारणांनीं तुह्मी दुरुस्त करून राहण्यास मागितले वरून तुह्मास आह्मी ५ पांच वर्ष पर्यंत करारानें राहण्यास आह्मी दिले होते तें पांचवें वर्ष पुरें झाले. सबब आमचे मकान अतां खाली करून द्या. नोटिशीचे तारखेपासून आठ दिवसांचे आंत आमचे आह्मास परत द्यावे न दिल्यास रितीप्रमाणें तजवीज केली जाईल. व तुमची कोणतेही प्रकारें सबब ऐकली जाणार नाहीं. कळावे तारीख १२ माहे एप्रील सन १८९३ इसवी.

( सही ) अमनबी मर्द शेखदाऊद

निशाणी खुद्द हातची बांगडी

---

## अर्थशास्त्र.

( १४ वे अंकावरून पुढें चालूं )

ह्याच मुद्यावर आणखी उदाहरण घेऊन जास्त फोड करूं. एक शेतकरी आपलें धान्य विकून कांहीं पदार्थ विकत घेऊं इच्छितो, अशी आपण कल्पना करूं. विकत घ्यावयाचे पदार्थ जर अनुत्पादक रीतीनें खर्च होण्या जोगे असले तर त्यांच्या किंमती इतके देशांतील भांडवल कमी होईल, परंतु तेच जर खर्च होत असतांना नवीन उत्पत्तीस मदत करण्या जोगे असतील, तर तितकें देशाचें भांडवल वाढेल. त्यानें रेशीमकांठी धोतर-जोडा घेतला असें समजा. ह्या धोतरांनीं त्याला आनंद वाटेल हें खरें. परंतु त्यां पासून नवीन संपत्तीचे उत्पत्तीस कांहीं सहाय्य होत नाहीं; ह्मणून तीं फाटून गेलीं. ह्मणजे त्यांच्या किंमती इतकें देशांतील भांडवल कमी झालें; हें उघड होतें. आतां हा धोतरजोडा न घेतां सदरहू शेतकरी जर आपले शेतांतच मजुराकडे खर्च करील, तर हे मजूर आपल्या निर्वाहास लागणारे जरूरीचे पदार्थ विकत घेतील. मजूर लोक, जें कांहीं खातात किंवा वापरतात, त्यानें नवीन अर्थोत्पत्तीस सहाय्य होतें. ह्मणून पहिल्या प्रकारच्या खर्चानें कांहीं वेळ आनंद होतो, या पेक्षां जास्त कांहीं होत नाहीं. परंतु दुसऱ्या प्रकारच्या खर्चाचा परिणाम नवीन अर्थोत्पत्ती हें उघड झालें.

वरच्या विवेचनांत अनेकदां हें सिद्ध करून दाखविण्यांत आलें आहे कीं, भांडवल हें खर्चाचा परिणाम नसून संग्रहाचा आहे. तसेंच, जो श्रीमंत ऐषआरामांत फार खर्च करितो तो देशाचें भांडवल कमी करितो. ह्मणूनच चैन करणें व्यापारास चांगलें, हें ह्मणणें खरें नाहीं. एखाद्या श्रीमंत गृहस्थानें जर हिवाळ्यांत आंब्याचे फळें आणण्या करितां, त्यास योग्य उष्णता देण्यासाठीं, दोन खंडी कोळसे खर्च केले तर तेवढे कोळसे व्यर्थ गेले, असें ह्मटलें पाहिजे. निदान त्यांचा योग्य बदला तरी मिळाला नाहीं. कारण एवढा खर्च करून केलें काय? तर आंब्यांस चार फळें आणिलीं. ह्या फळांनीं घटकाभर एका दोघास बरें वाटलें एवढेंच, दुसरें कांहीं नाहीं. आतां तेच कोळसे जर लोखंडाचे किंवा ग्यासाचे कारखान्यांत खर्च केले असते, तर त्या पासून जास्त हितकारक परिणाम झाला असता. अनुत्पादक रितीच्या खर्चानें देशाचें भांडवल कमी होतें; ह्मणून मजुराप धर्म केल्यानें त्या पासून त्यांचा फायदा नसून उलटा तोटा आहे.

भांडवल जरी संग्रहाचा परिणाम आहे, तरी त्याजवरून असें समजतां कामा नये कीं, जमवून ठेविलेल्या संपत्तीनें देशांतील भांडवल वाढतें. भांडवलाचें मुख्य काम जें अर्थोत्पत्ती तें संपादण्यास त्याचा खर्चच झाला पाहिजे. भांडवलाची जी पूर्वी व्याख्या सांगितली आहे. ती मनांत आणिली ह्मणजे भांडवल, अर्थोत्पत्ती करीत असतांना खर्च होत असतें, असें उघड दिसून येईल. मजूर लोक जें अन्न खातात तें तात्काल नाहींसें होतें. इमारती, यंत्रें हत्यारें वगैरे जीं कारखान्यास लागतात, ती हळू हळू वापरून नाहींतशीं होत असतात. आतां मजुरांचें ज्यावर पोषण होतें, त्या अन्ना पासून

नें काम होतें तें, इमारती वगैरे पासून जें काम होतें, त्याहून अगदीं निराळें आहे ही गोष्ट सहज समजण्या जोगी आहे. ह्मणून भांडवलाचे दोन प्रकार होतात. एक फिरतें भांडवल, व दुसरें, स्थिर भांडवल जें भांडवल एकदांच उपयोग केल्यानें नाहींसें होतें, त्यास फिरतें भांडवल ह्मणतात. जसें अन्न व कोळसे. दुसऱ्या प्रकारच्या भांडवलाचा उपयोग अनेकवेळां होतो. जसें नांगर इमारती, यंत्रें वगैरे. ह्मणजे यांचा एकदांच उपयोग होऊन, तीं नाहींतशीं होत नाहींत; तर तीं मोडे पर्यंत त्यांचा उपयोग होत असतो. अशा भांडवलास स्थीर भांडवल ह्मणतात. कीरतें भांडवल त्वरित सव्याज परत येतें. जसें, शेतकऱ्यानें आपल्या शेताच्या कीस्तगारी करितां मजुरींत घातलेले भांडवल, शेतांत माल तयार होतांच त्यांस नफ्यासह परत मिळतें परंतु स्थीर भांडवलाचा एकदां उपयोग केल्यानें, जें कार्य उत्पन्न होतें, त्याच्या किंमतीनें स्थीर भांडवलाचा अंश मात्र दर खेपेस परत होत असतो. जसें बाऱ्या शेतकऱ्यानें बाकीचा नांगर घेतला, तर तो त्यास अनेक वेळां व अनेक वर्षें उपयोगीं पडतो. ह्मणून ह्या नागरांत घातलेलें भांडवल, परत व्हावयास पुष्कळ काळ लागतो.

( पुढें चालेल )

वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख शुद्ध १ शके १८१५

'पायोनिअर' पत्रकर्त्यांस हुंडीच्या भावा मुळें आपल्या आंग्लो इंडियन बांधवाचें मोठें नुकसान होतें म्हणून वाईट वाटत आहे. त्या पत्रकर्त्यांची भूतदया जागृत होऊन ते सरकारास तरणोपाय सूचवितात कीं हल्लीं जे कलेक्टर, कमिशनर, सिव्हील जज्ज, माजिस्ट्रेट वगैरे अधिकारी आहेत त्यांच्या चिरंजीव मंडळीस या वडिलांच्या जागा द्याव्या असा सरकारनें नियम करावा म्हणजे हुंडणावळीचा मोबदला या प्रकारें भरून येईल. पायोनिअरची युक्ति उत्तम कोटींतली आहे. तिचा एकलकोंडेपणा दिसू नये म्हणून जोडगोळीची सूचना अशीही करितात कीं हा नियम आंग्लो इंडियना प्रमाणें नेटीवांस ही लागूं करावा. या दुसऱ्या कोटीक्रमानें आपल्या म्हणण्याचा कटूपणा, व आत्मसाधुपणा दूर झाला अशी त्या पत्रकर्त्यांची समजूत आहे. हें बकध्यान आम्ही पूर्ण ओळखून आहों. आंग्लो इंडियन लोकांस हल्लीं जे अधिकार व पगार मिळतात त्यास ते नेटिवा पेक्षां कमी लायक आहेत तेव्हां परीक्षेच्या कसाला जे चांगले टिकतील त्यांसच अधिकाराच्या जागा मिळाव्यात ह्मणजे खर्च पुष्कळ कमी होईल, कामें नीट होतील आणि राज्यकारभार लोकांस सुखावह होईल अशी नेटिव पत्रकर्त्यांची ओरड आहे. त्या अर्थी वंशपरंपरेचें तत्व सरकारी नोकरीस लागूं पडूं नये अशी आमची इच्छा आहे. गुणाची पारख करून त्याला अनुरूप कामगिरी सांगावी असें या शतकाचें तत्व आहे आणि निष्प्रतिबंध व्यापाराचें तत्वही याच शतकांत उर्जित दशेस येत आहे तेव्हां या वंशपरंपरेच्या तत्वाचा निभाव लागणार नाहीं हें निराळें कळविण्यास नको. सरकारी नोकरीवर नेटिव लोक उड्या घालतात अशी नेटिवांची निर्भत्सना करितांना व परोक्षरीत्या आत्मश्लाघा करितांना आह्मी पुष्कळ अंग्लो-इंडियनांस आह्मी पाहिलें आहे.

परंतु एखादी जागा रिकामी झाली ह्मणजे ती पटकाविण्या विषयीं कितीजणांच्या एकमेकांवर शिफारसीच्या चिठ्या घेऊन भिडतात आणि विलायतचा कोणी आपला सोयराधायरा अधिकारारूढ होण्याविषयीं नानाविध खटपटी करितात तें पाहिलें ह्मणजे आंग्लो इंडियन पुराणिकांचा स्वतंत्र धंदे काढण्या संबंधाच्या उपदेशाचा मथितार्थ कळून येतो. सरकारी नोकरी मिळविण्याचे भगिरथ प्रयत्न करण्यापेक्षां स्वतंत्र धंदे सुखावह असते आणि हुंडणावळीच्या भावानें नुकसान होऊन जो पगार मिळतो तो फार कमी पडतो असें असतें तर 'पायोनिअर' ची वंशपरंपरेनें सरकारी नोकरी देण्याविषयींची सूचना निरर्थक नव्हे काय?

हिंदुस्थानच्या कायदे कौंसिलचे सभासदांनीं १८९३–९४ सालाच्या बजेटावर चर्चा केली ती विचारपूर्वक, शांतपणें व योग्य दिशांनीं करण्यांत आली हें पाहून हिंदुस्थानचे फडणीस सर डेव्हीड बारबर व व्हाइसराय लार्ड लान्सडौन हे उभयतां फार आनंद पावले. कायदे कौंसिलच्या नव्या कायद्या प्रमाणें पहिलें बजेट कौंसिलदारा समोर ठेवण्यांत आलें त्यांत आरंभीच दुःखाच्या व निराशेच्या हकीकती नमूद कराव्या लागल्या तथापि त्या बजेटा वरील भवति न भवति अत्यंत समाधानकारक व समर्पक झाली. कौंसिलदारांनीं बजेटावर वादविवाद करण्याच्या हक्काचा योग्य प्रकारें उपयोग केला. ही गोष्ट सूचवितें कीं आगामी अधिकार वैभवाचा पहिला ओनामा सुखप्रद व यशकारक होईल आणि लोकमतास स्थैर्य येऊन त्याचा राजदरबारांतून योग्य मान रहात जाईल.

हुंडणावळीचा भाव हल्लीं प्रमाणें चढत व उतरता राहिला तर जमेचें तोंड व खर्चाचें तोंड हीं बरोबर कशीं मिळवितां येतील या विषयीं इंडिया सरकारास मोठा गूढ प्रश्नच आहे. मिलीटरी खर्च आणखी दोन वर्षें कमी होऊं शकत नाहीं आणि हल्लींचा वाढता खर्च ही देशसंरक्षणास अगत्याचा असून काढीमात्र गैरवाजवी नाहीं. रुप्याची किंमत सोन्याच्या नाण्यांत फार उतरल्या मुळें युरोपियन पगारवाले अधिकारी लोकांचें फार नुकसान होत आहे आणि त्यांचा केकाध्वनि ऐकून आम्हास ही मोठी कींव येते पण या गोष्टीस इलाज नाहीं. डाक्टर रासबिहारी घोस यांनीं सांगितल्या प्रमाणें सर्व इंडियाच्या हिताहिताची बाजू लक्ष्यांत आणली म्हणजे वरील निरुपायाचें संकट एकीकडेस पडतें आणि सर्व रयतेच्या कल्याणाच्या मानानें युरोपियन आफिसरांचा आपत्काल फार क्षुद्र वाटतो. हिंदुस्थानच्या रयतेचा पैसा हा सरकारापाशीं अमानत ठेवी प्रमाणें आहे आणि ते तिचा हिशोब किती सचोटीनें व नेकीनें देतात ही पाहण्याची आणीबाणीची वेळ हीच आली आहे. प्रजेवर नवीन कराचा बोजा लादणें जरूर आहे व तो लवकरच कादावा लागेल असें व्हाइसराय आदिकरून मुत्सद्यांनीं वारंवार ध्वनित करून कळविलें आहे. या देशाची प्रजा अगोदरच सरकाराच्या करांनीं त्रस्त आहे आणि तिच्या मिळकतीच्या मानानें जास्ती कर देण्यास सवड नाहीं तेव्हां नवीन कर बसवूं नये आणि व्हाइसराय साहेबांनीं किंबहुना स्टेट सेक्रेटरी साहेबांनीं आपल्या स्वतांच्या पगारा पासून सर्व मोठमोठ्या खर्चाच्या बाबींत शेंकडा दहा प्रमाणानें काटकसर करावी तरच सांप्रत येत चाललेला नादारपणा व दिवाळें टळतील असें आह्मी पक्केपणीं समजून आहों. पण हा उपदेश राज्यकर्त्यांस अत्यंत अप्रिय, कटु, व हानिकारक आहे. सर्व राष्ट्रावर संकट आहे तेव्हां प्रत्येकानें सोशीस घेतलीच पाहिजे. खर्च वाढला आणि जमा खुंटली तर जमेचे अन्य दरवाजे खुले होई पर्यंत खर्च कमी केला पाहिजे किंवा नको हें उघड आहे. खर्च वाढत आहे म्हणून वाटेल त्या प्रकारें जमेच्या बाजी वाढविणें सुखावह होत नाहीं. आणि शहाणा, काटकसरीचा व बातेबताचा फडणीस जमा वाढल्या पूर्वीं खर्च वाढू देणार नाहीं परंतु या गोष्टी हिंदुस्थानास लागू पडत नाहींत हें नवल आहे धनतृष्णा व राज्यतृष्णा अनिवर झाली म्हणजे ती तहान भागविण्या साठीं मनुष्यास कांहीं मार्गाला पुढील ताळ रहत नाहीं आणि तीच स्थिति राज्यकर्त्यांनीं स्वतांवर ओढून घेतली आहे.

शेतकरी लोकांसाठीं सरकार तगाई ह्मणून कर्जाऊ पैसा देत असतें. ही सरकारची शेतकऱ्या प्रीत्यर्थ छोटेखानी पेढीच आहे. शेतकऱ्यांस कर्ज भारी व्याजानें काढावें लागतें आणि त्यामुळें त्यांच्या मिळकतीचा भाग व्याजाच्या रकमांत पुष्कळ जातो व अखेर शेतकरी कामधंदा करून देखील उपाशी मरण्याच्या स्थितींत असतें. ही शोचनीय स्थिती ध्यानांत घेऊन व्याजाचा शेकडा दरसाल २४ चा दर परस्पर स्पर्धेनें उतरावा व शेतकऱ्यांचें ऋणविमोचन होण्यास एक मार्ग काढावा ह्मणून इतर प्रांतस्थ सरकारा प्रमाणें वऱ्हाड सरकारनें या प्रांतासाठीं शेतकऱ्यांस तगाई देण्या संबंधानें नवीन सरक्युलर काढलें आहे. या तगाईचे फंडाचा लोकांनीं जितका पुष्कळ उपयोग करावा तितका केला जात नाहीं असें आढळून आलें आहे. आणि हीच गोष्ट सर्व इंडिया संबंधानें आहे. यंदाच्या बजेटावर संभाषण करितांना नामदार चेंतसळराव यांनीं तगाईचे फंडा विषयीं लोकांची अनास्था असल्याचीं तीन कारणें दाखविलीं तीं अशीं:–

( १ ) सरकारांतून कर्जाऊ पैसा मिळत असतो अशा विषयीं रयतेचें अज्ञान.

( २ ) कर्ज देण्याविषयींचे नियम फार सावकाशपणाचे व दिरंगाईचे आहेत.

( ३ कर्जाच्या परत फेडी विषयीचे सक्तीचे नियम.

तिसऱ्या कारणा संबंधानें वऱ्हाड प्रांताच्या वरिष्ट अधिकाऱ्यांनीं यंदाच्या सरक्युलरांत बऱ्याच सुधारणा करून लोकांच्या अधीक सोयी पाहिल्या आहेत. पहिलीं दोन कारणें दूर करण्या विषयीं नामदार चेंतसळराव यांनीं सूचविलें आहे कीं प्रांतोप्रांतीं या तगाईच्या कामा साठीं एक स्वतंत्र अधिकारी असावा आणि त्यानें आपल्या अधिकार खालील सर्व गांवीं फिरून रयतेस सरकारच्या शेतकरी पेढी विषयीं माहिती देऊन कर्ज देण्यांत दिरंगाई न होईल अशी तजवीज ठेवावी.

वैशाखांत व ज्येष्ठांत शुक्राचा अस्त असल्यामुळें लग्न मौजींचे मुहूर्त पंचांगांत नव्हते ह्मणून हीं मंगलकार्यें लोकांनीं गेल्या माघ फाल्गुनांत उरकून घेतलीं आतां असें कळतें कीं ज्येष्ठ शुद्ध १९ नंतर लग्नाचे व मौंजी बंधनाचे सुमुहूर्त आहेत. हे मुहूर्त पुण्याच्या शास्त्री मंडळानें निर्णीत केले आहेत. शुक्राचा उदयकाल काशीशगणितानें ज्येष्ठ शुद्ध ७च्या रात्रीं आहे तेव्हां अस्तकालचा बाध त्या दिवशीं दूर होईल. या मिती पासून पौर्णिमे पर्यंत चांगले दिवस नाहींत ह्मणून पौर्णिमे नंतर लग्नें व व्रतबंध सुमुहूर्तावर करण्यास सवड आहे पुण्याच्या शास्त्री मंडळाचा हा शास्त्रार्थ सर्वत्र ग्राह्य होण्यास कांहींच हरकत नाहीं तेव्हां त्रैवर्णाच्या व्यवस्थेतील लोकांचा या शास्त्रार्थानें मोठा फायदा झाला. गेल्या वैदर्भाच्या अंकांत वरील तात्पर्याचा शास्त्रार्थ चिखलीचे जोशी रा. रा. व्यंकटेश बापूजी गाळफाडे यांनीं प्रसिद्ध केला आहे तो पुण्याच्या शास्त्री मंडळा प्रमाणेच आहे.

## The Berar Samachar

MONDAY APRIL,
17 1893.

The Town Fund is about to be abolished and substituted by some more friutful impost. So far as the scheme goes we have nothing to say against it. The burdens of an income-tax fall heavily on men of fixed in comes; so also the burdens of Town Fund hitherto fell heavily on persons of fixed. incomes No doubt in matters of taxation Revenue is the first care of the taxing body. Incidental attention may be paid to the morality of the public on whom an impost is levied. But this consideration is secondary. The morality of a people is always conventional. Some years ago evasion of taxes or a persistant attempt to escape the vigilance of a ruling body was regarded as a matter of true wisdom however truthful and honest the advocates of this principle may have been in their other delaings both public and private. Conventional morality therefore rests on the stigma the public is prepared to attach at any

particular time to any particular action. It is, no doubt, no valid argument to say that an impost is undesirable because it touches the morality of the rate payers. It is yet noxious to the interest of the rate payers if it fails with undue rigour on a certain body of men and leaves others to avoid it. The consequence is that one class is enriched or given an unmerited privilege to the hardships of the other. It is on this ground of contention that we would be inclined to deprecate the duty. But the amount of revenues thus decreased by the abolition of some fruitful revenue must be made good by some other protective duty if revenue be necessary for maintaining works or instutions of general or public utility. An indirect taxation generally fares best. The incidence of such a tax falls on the consumers of the commodities taxed. The tax is paid in proportaion to the abilities of those who pay it. To tax an article of general consumption such as salt would however secure no equality of taxion. Therefore it is necessary to suggest some such articles of general consumption as would not impoverish the resources of the people nor tell upon their standard of comfort. Taxation on certain vegetables coming to the market or a wheel tax or some other such imposts, too numerous to be mentioned will without laying any hardships on the people replaec to a pie the revenue about to be decreased by the abolition of the Town Fund.

---

The long and short of the discussion on the Imperial Budget for 1893—94 is that there would be no equilibrium between revenue and expenditure unless a new tax is assessed in the immediate future. The pressure of expenditure is beyond the control of the governing authorities. To get over the financial difficulties is almost hopeless. It is worth minding the advice of Dr. Rash Behari Ghose if the Govt. mean to find out a safe and honorable escape. The learned gentleman has indirectly asked the Govt to forget self-interest in the event of a national bankruptcy and to learn the wise lesson of self-sacrifice. We are of opinion that his words will bear out a good many repititions with fruitful results. He observes:—

"Every one must sympathise with the European servants of the Crown in India in their present difficulties, which it is to be hoped are only of a temporary nature. But, while fully acknowledge the magnitude of the burden which the European servants of the Government of India are called to bear, we cannot altogether shut our eyes to the state of our Exchequer or to the magnitude of the burden which would be imposed on the tax-payer by the suggested addition of a crore of rupees to the estimates. It must also be borne in mind that the Government is in the position of a trustee of the public money, and that it cannot in the present critical condition of the finances be fairly called upon to be generous to any class of its servants at the expense of the tax-payer, the *cestui que trust*, so to speak, whose interests have to be carefully watched and protected."

---

The Forest report for 1892 contains a number of useful topics and we know that the request in the last memorial to the Resident while at Akola has opened the question of forest-administration for the reconsideration of the Govt. The rigour and strictness of the recent Forest laws, the sad want of pasture lands, and the increasing dearth of fuel have created a feeling of discontent in the minds of the people and the redress of the consequent grievances is urgently and pressingly sought at the hands of the Resident. In his review of the Forest report Col. Mackenzie has observed in connection with the fuel-question in the following instructive manner. He goes straight to the question and discusses it from more stand—points than one. Let us express once—again our full and sole trust in him and we hope that a speedy and nece ssary reform will not be delayed in the matter of ryot's difficulties in the Forest administration. We quote his remarks in full and invite our reader's attention to them. We shall however reserve to some other occasion the view that the Resident and the Govt. of India have taken of the question:—

"What is causing denudation so rapidly is the demand on the part of ginning mills for fuel for their furnaces. These mills are starting up all over the country, even in so comparatively remote a locality as Pusad. They consume annually an enormous quantity of wood. To raise the rates of fuel, as the Conservator suggests, would punish the proprietors of those mills insignificantly without checking denudation, while it would furnish a serious grievance to the country at large. The rich already greatly feel the rise in fuel prices, and the poor are in such serious straits that for the most part they are driven for fuel to rely on cattle droppings. The remedy lies in driving these mills to use coal, either by cheapening the supply from Warora or circuling them with nakahs, which should specially tax the wood they get in at such rates that they would be driven to the Central Provinces-Warora collieries, at present the only open source of coal supply in our neighbourhood. The Resident is aware that I have been endeavouring (I fear unsuccessfully) to induce dealings with Warora. For as long as the mills can get wood at present prices—and wood is cheaper than coal—they naturally avoid Warora. And as Warora will not, or cannot, reduce its charges to oblige Berar (I see no reason why it should) the only remedy left for us is, it seems to me, by some device to make wood *to these mills* so dear that it will then be to their advantage to go to Warora and pay to Warora what it now demands. The difficulty is to arrange this. I have done something towards facilitating dealings with Warora, by arranging (the Comptroller not objecting) that Warora bills may be met by money payments into the local treasury nearest the mill dealing with Warora. The effect of this remains to be seen next season, but I fear it will not be much, and meanwhile I feel that our stable door is open and that our horses (in the shape of fuel wood) are rapidly disappearing. We made a great mistake at the last survey and settlement, I conceive, in allowing the potkharab or unassessed areas along the banks of nalahs and streams to be thrown into the adjoining fields as survey numbers. For by doing this we presented *for nothing* to the field-holders tracts that would simply have been invaluable to the Government and the country as grass and fuel reserves. It is having given all this land off that now puts it in the power of people, in the greed of gain, and utterly regardless of consequences, present or future, to themselves or to posterity, to denude the country when the temptation arises: and for my part I see no reason why in justice and policy we should not take advantage of the coming revision and settlement to undo this mistake. Those who for 30 years have enjoyed the benifit *for northing* could have no reasonable ground of complaint if we excluded these unassessed areas from the fields and left to them exactly what is assessed and what alone they pay for. I venture to assert that, within 10 or even 5 years, the advantage to the country would be patent. My proposal confines itself solely to the lands situated along the banks of rivers and streams, and not to the exclusion of potkharab everywhere, which would be a bigger and, for practical ends, an unnecessary business. It is really lamentable to see what destruction has been and is being worked by the general clearance going on, which climatically too, if present opinion is correct, must adversely affect the country, besides tending in the future to throw on our necessarily isolated and comparatively speaking, as to area, limited reserves a strain that it is impossible they can bear. At present the fuel question is really a very important one, and I am preparing to deal with it after certain information asked of district officers is got in.

---

The London Correspondent of the Hindu of Madras writes about a new Bill which has been introduced by Mr. Jesse Collings, Sir John Lubbock, Mr. Robert Reid, Sir John Kennaway, Sir Bernaard Samuelson and Mr. George Dixon, all of them sensible, practical men. The Bill is intended to provide for teaching in public elementary schools of agricultural and horticultural subjects, and for the practical illustration and application of such teaching. Considering how almost wholly agricultural India is, all well wishers for the prosperity of India will, it may be hoped, join the wish that something like what is proposed to be done in England should be done in India. The special teaching proposed will include:

Fruit, Flower, and Vegetable Growing.
Poultry, Bee, and Pig Keeping.
Budding, Pruning, Planting, and propagating
Rotation of Garden Crops.
Nature and Properties of Soils.
Use of Manures.
Knowledge and Choice of Seeds.
Structure and Life of Plants.
Action of Birds and Insects on Crops.
Choice and Use of Simple Tools.

---

## वऱ्हाड

कर्नल मेकंझी कमिशनर साहेब वऱ्हाड यांची स्वारी गेल्या मंगळवारीं चिखलद-ऱ्यास जाण्या साठीं रवाना झाली. साहेब मजकूर उन्हाळा तेथेंच वालवितील असें वाटतें.

---

रा. रा. कृष्णाजी हरी कोल्हटकर आफि. एक्स्ट्रा असि. कमिशनर हे बुलढाण्यास बदली झाल्या प्रमाणें तिकडे रवाना झाले. मध्यंतरीं ते गेल्या शुक्रवारीं आकोल्यास मित्र मंडळींच्या भेटी साठीं उतरले होते.

---

पातुरशेखबाबू येथील लायब्ररीचा दुसरा वार्षिक उत्सव मोठ्या थाटमाटानें करण्याचा तिच्या उत्पादकांचा विचार दिसतो. हा उत्सव पुढील महिन्याचे ७ वे तारखेस आहे.

---

येथील इंग्लिश आफिसांतील स्टांप स्टॉअर कडील दप्तरदार रा. रा. दत्तात्रय बाबाजी यांस आकोल्यास नायब तहशिलदार तीन महिन्या साठीं नेमलें आहे.

---

येथील पोस्ट आफिसांतील क्लार्क रा. रा. बाळकृष्ण अनंत जोशी यांस तीस पगारावर बुलढाण्याचे पोस्टांत हेड क्लार्क नेमिलें.

---


## जाहिरात.

खालीं सही करणार याजकडून जाहीर करण्यांत येतें कीं, माझा मुलगा नामें मारोती अंबादास सोनार वस्ती अकोलें. हा वाईट चालीचा निघाला असोन त्याची वर्तणूक चांगली नाहीं. करितां त्याजला कोणी सावकार वगैरे लोकांनीं कर्ज देऊं नये व आमचा स्थावर व जंगम माल खरेदी घेऊं नये अगर कोणत्याही प्रकारें इस्टेटीवर कर्ज वगैरेचा बोजा ठेवूं नये ह्मणून या लेखानें जाहीर केलें आहे या उपर जो कोणी त्याच्याशीं व्यवहार करील तो त्याची जबाबदारी आपल्या माथ्यावर घेईल. कळावें तारीख १५ माहे एप्रील सन १८९१ इ०

( सही. )

अंबादास बाबनजी सोनार वहिवाटदार नारायण अंबादास बस्ती अकोलें. द. ख.


---

## अकोला बाजारभाव

हुंडी मुंबईची दर्शनी ........ .... ९९||| ||
" १५ दिवसांच्या मुदतीची.... ९९||
सुवर्ण २६|| .... .... रुपें ....१०८|||
मीठ....३||=|...आळशी मापी १०८
जवस वजनी ११२|| .... चणे ६०—६५
गहूं काठे........... ९५ बनशी ....८५
साखर.... ३||....कराळे.... .... ४|=
उडीद....३|.... .... मुग२||=
जवारी ९५— ९७ ....सर्की .... ९|
तूप.... ८||| ... ........... तेल ६|=
कापूस....४९ ...........रुई ६८—७६

सट्याचे भाव ( इंग्रजी )

गहू वैशाख शुद्ध १९४९ ....... ६६
आळशी चैत्र "........"........ ०
रुई फाल्गुन........." ....... ०
सर्की वैशाख नवे साल्चा" ....५....५||
जबारी.... वसंत......."........ ०

---

## वर्तमानसार.

काठेवाड प्रांतांत घनगरांची एक जात आहे त्या जातींत बीस वर्षांनीं लग्नाचें एक साल येत असतें. तें गेलें साल होतें, ह्मणून तिकडे अतोनात लग्नें झालीं. उपजून एक तास झालेल्या मुलाचें लग्न झाल्याचीं उदाहरणें आहेत!

युनिव्हर्सिटीच्या सभेंत खालील परिक्षांचे फींचे दर वाढविण्यांत आले. यू. एस. एफ १० रु. चे १५; प्रवेश परिक्षा १० रु. चे १२; दुसरी बी. ए., दुसरी बी. एस. सी. व पहिली एल. एल. बी. १० रु. चे २०; दुसरी एल. एल. बी. २० चे रु. ३०; १ ली एल. एम. अन्ड एस. १० रु. चे १५ व दुसरी एल. एम. ॲन्ड एस. १० रु. चे. २०

एका न्यायकोर्टाचा ठराव रद्द झाला ह्मणजे त्या न्यायकोर्टास दंड करावयाचा अशी चीन देशांत पद्धत आहे ह्मणतात.

इंग्लंडांतील कापसाचा व्यापार १८८७ सालांत एकशेंदहा कोटीचा होता, तो १८९१ सालांत एकशें ऐंशी कोटीचा झाला.

तारेची अजब कल्पना कागदाच्या लहानशा चिठ्ठीवर खूण करून ती चिठ्ठी तारेस चिकटविली ह्मणजे दुसऱ्या टोकांस असलेल्या चिठ्ठीवर सर्व चिन्हें उठतात, अशी विलक्षण युक्ति विलायतेस आहे, ती हिंदुस्थानांत सुरूं करण्याचा प्रयत्न चालू आहे व तो सफळ झाल्यावर तारेचे दर उतरावे असें सरकारचे मनांत आहे.

धुळें येथील एका श्रीमंत सावकारानें पैसे खर्च करून अखेर फसून मुसाशी लग्न लाविल्याची वदंता आहे. क० त०

कलकत्ता पोस्ट आफिसांतील एका टेलिग्राफ सिग्नलरानें विलक्षण लफंगाई करून तारेने मनी आर्डर आणवून १००० लंबे केले असें तिकडून आलेल्या बातमी वरून समजतें.

दरोडखोर पकडले— मध्य प्रांतांतील प्रख्यात दरोडखोर हिम्मतसिंग, व त्याचा साथीदार गोरायघोसी, आणि दहा अनुयायी यांस सागर भागचे पोलिस सु० मि० नेलर यांणीं दोन नेटिव इन्स्पेक्टर आणि १५ पोलीस शिपाई यांच्या मदतीने मोठ्या धैर्यानें व शिताफीनें पकडलें. या त्यांच्या कृत्याबद्दल चिफ कमिशनर साहेबांनीं मि० नेलर यांचे फार फार आभार मानले, इनस्पेक्टरांस व शिपायांस रोख बक्षिसें दिलीं व संधि येईल तेव्हां त्यांस बढती देण्याचें वचन दिलें आहे. शु० सू०

पायोनियर सांगतो कीं कमांडरंड हा चिली येथें जाण्याकरतां पिलजित येथून निघण्याच्या बेतांत आहे. चिली येथील स्थिती पुन्हा भयभद्र दिसूं लागली आहे. मागच्या हल्यांत शत्रूचे जरी २५० लोक जाया झाले तरी आतां आसपासच्या खेड्यापाड्यांचे पुष्कळ लोक एकत्र जमून हल्ला करण्याच्या विचारांत आहेत असें सांगतात. इंदूजव्हाली प्रांतांतील कोहिस्थानी वगैरे एकत्र झाले असून त्यांची संख्या जरी हजारो झाली आहे तरी त्यावरून पुन्हा हल्ला करण्याचा त्यांचा इरादा मात्र दिसतो, पण त्यांचीं हत्यारें चागलीं नसून लोकही शिकलेले लढाऊ नसल्यामुळें आमच्या फौजेशीं त्यांचा टिकाव लागेल असें नाहींच.

चिलीच्या आसपास कोहिस्थानी लोक सुमारें दोन हजार जमले आहेत व हल्लींच्या उपासाच्या रमजान महिन्यांत एखाद्या शुक्रवारीं ते हल्ला करतील असा अदमास आहे.

हत्यारें व लढाऊ सामान परदेशांतून ब्रम्हदेशांत येण्याची १८९६ अखेर बंदी करण्यांत आली आहे.

रशिया व बुखारा यांच्या दरम्यान संगनमत होऊन बुखाऱ्यास अमु दर्यापर्यंत कस्टमच्या जकातीचा बंदोबस्त करण्याचा रशियानें परवाना दिला व त्यामुळें अफगाणीस्थानांतील स्थिती वेगळीच झाली आहे. या व्यवस्थेनें बुखारा व आफगाणिस्थान यांच्या दरम्यानचा व्यापार जरी खुला आहे असें दिसतें तर आफगाणीस्थानचे फार मोठें नुकसान आहे, कारण आंतां अर्थातच रशिया बुखारा हेही आपला माल बिन जकातीनें आफगाणिस्थानांत पाठवून विकण्याची सुरुवात करतील. खरें पाहिलें तर आफगाणिस्थानचा जर बिन जकातीनें तिकडे जाईल तर त्यांचा इकडे कां येऊं नये? पण रशियाचा माल बीन जकातीनें आफगणिस्थानांत येऊं लागला ह्मणजे आफगाणिस्थानांत जाणाऱ्या इंग्रजीमालास तोंड सामनेवाला होईल व तेंच या ओरडीचें मूळ असावें.

चिनहिलच्या शेजारच्या कित्येक खेड्यांतल्या लोकांकडून इंग्रजसरकारास जी वार्षिक खंडणी यावयाची ती न आल्यामुळें इंग्रजसरकारच्या फौजेची एक टोळी त्यांच्यावर रवाना झाली आहे.

लंडन टाईम्स सांगतो कीं, इजिप्त प्रकरण फार नाजुक झालें आहे. आणि कारभारास हरकत आणण्याचा रहस पाशाचा हल्लींचा क्रम असाच कायम राहिल्यास त्याणें १८९१ सालाप्रमाणें कारभारांतून एकीकडे होणें भाग होणार आहे.

फ्रान्साच्या अयोग्य अशी सायामनें कबूल करूं नये असें इंग्रजांचें ह्मणणें आहे. इंग्रजाच्या कबूल कराव्या कीं नाहीं?

उभयतांच्या कामदारांच्या मार्फत सुधारणा करण्याच्या इंग्रज कामदारांच्या बहुतेक सूचना इजिप्त सरकारानें नापसंत केल्या असें सांगतात. इतकें धारिष्ट कोठून आलें?

इजिप्त देशांतल्या इंग्रजी सत्तेविरुद्ध फ्रेंच लोकांची ओरड चालू झाली आहे.

इंग्रजी राज्यव्यवस्थेनें इजिप्त देशाची भरभराट होत आहे. सौडन प्रांताचा कबजा घेण्याचा यत्न करणें तुर्त चांगलें नाहीं असें त्या राज्यांतले मुख्य इंग्रज कामदार लार्ड क्रामर्स हे आपल्या वार्षिक रपोटांत लिहितात पण त्यांच्याकडे रपोट करणार लार्ड रोजबरी ह्मणतात कीं, आतां या प्रांतांत कांहीं दंगाधोपा होणारी भीती नाहीं व इंग्रजांनीं या प्रांतांतून निघून जाणेंही चांगलें नाहीं.

ख्रिस्तावर हल्ला— हांगकांगचीं बातमी सांगते कीं, टोटसई येथील लोक ख्रिस्ती लोकांच्या विरुद्ध फार चवताळले आहेत. कित्येक लोकांची एक मोठी टोळी जमली असून युनिवार्सिटीचा ग्राजुएट असा एक माणूस त्यांचा पुढारी आहे. या टोळीनें ख्रिस्ताची प्रार्थना करणाऱ्या कांहीं ख्रिस्त्यांवर हल्ला केला व त्या सर्व ख्रिस्त्यांस धरून ठोक दिला व त्यांत एक ख्रिस्तीबाई ठारही झाली. तिचा एक मुलगा फारच घायाळ झाला व बाकीच्यांस त्या टोळीवाल्यानीं दोऱ्यांनीं बांधून झाडास टांगून ठेवलें. कांहीं दिवसांनी त्या टोळीच्या मुख्यास अधिकाऱ्यानीं कैद केलें व त्यावरून सर्व लोक फार चवताळले आणि त्यांनीं पुन्हा ख्रिस्त्यांवर फार मोठा हल्ला केला आणि त्यांच्या प्रार्थना देवळाचीही मोडतोड केली, व त्यामुळें तेथील बऱ्या पाऱ्द्यास तेथील माजिस्त्रेटाचा आश्रय मागणें भाग झालें आहे. यावरून ख्रिस्ताच्या आश्रयापेक्षां माजिस्त्रेटचा आश्रय जास्त महत्वाचा आहे असें होतें.

इंग्रजसरकारच्या कैदेंत असलेला काबूलचा माजी अमीर याकुबखान याची सास डेराडून येथें राहात असून ती याकुबखानाशीं कांहीं गुप्त पत्रव्यवहार करीत आहे अशी काबूल येथून पेशावर येथें बातमी आली आहे. ही बाई जमशेदी घराण्यांतली असून हिरात येथील राहाणारी आहे.

गेल्या १८५७ सालच्या वेळीं हैदराबादच्या रेसिडेन्टावर हल्ला करणारा मौलवी अल्लाउद्दीन हा आजपर्यंत अंदमान बेटांत काळ्या पाण्याच्या कैदेंत होता तो नुकताच म्हातारपणामुळें मरण पावला.

बंगलोराहून दक्षण महाराष्ट्र रेल्वेने पुण्यास येऊन जे विलायतेस जातील त्यांस विलायतच्या भाड्याचें स्पेशल टिकीट मिळेल व त्यांस दक्षण महाराष्ट्र रेलवेचें वेगळें भाडें पडणार नाहीं असें प्रसिद्ध झालें आहे.

मुंबईचे नवे कमांडर इनचीफ सर हडसन आपल्या कामावर रुजू झाले व गव्हरनरांच्या कौंसलांतील कौंसलदारीच्या जागेवरही रुजू झाले.

क. पाट साहेब होशंग येथें जाण्याकरतां लवकरच कटा येथून निघणार आहे.

आफगाणिस्थानांत व विशेषेंकरून जलालाबादेंत धान्याची फार महागाई झाली आहे. हल्लीं ६ शेरांचा भाव आहे बर्फ वितळल्यावर स्वस्ताई होण्याचा रंग आहे.

मुंबईच्या ५ व्या मौटन तोफखान्यास, ६ व्या रिसाल्यास, २ ऱ्या पल्टणीस व कांहीं सापर मानर लोकांस खोलातच्या कामावर जाण्यास तयार असावें असा हुकूम झाला आहे. ठा. अ.

लखनौ येथें एक पोलीस ट्रेनिंग स्कूल होणार असें ह्मणतात.

श्री० सयाजीराव महाराजाच्या नांवाचा रुपया वर्षप्रतिपदेपासून सुरू झाला. या नवीन नाण्यामुळें सराफीचा ह्मणजे पारख्यांचा धंदा बसून लोक त्यांच्या त्रासांतून मुक्त होतील. रुपयावर एका बाजुला महाराजाचा मुखवटा आहे, व त्या भोंवतीं "श्री सयाजीराव म० गायकवाड" हीं अक्षरें आहेत व दुसऱ्या बाजूवर वेलबुट्टी असून "एक रुपया १९४९" अशी अक्षरें आहेत व समशेर आहे. कांठीवर रेघपंक्ती आहे.

लंडन शहराला कांचेचे आच्छादन करण्याचा कांहीं लोकांचा विचार चालला आहे. प्रथम कांहीं भागावर असें आच्छादन करून पाहण्याचें त्यांच्या मनांत आहे.

मेक्सिको शहरांत एक प्रकारचे झाड आहे. हें झाड तेथील प्रत्येक शेतकऱ्याच्या घराच्या बाहेर आंगणांत लावलेलें असतें. याचीं पानें काळसर हिरवे रंगाची असतात प्रत्येक पानाच्या पुढे एक बारिक कांटा असतो. हा कांटा जुना झाल्यावर पानाची पुढची अणी पिकून त्यातून तो कांटा सुई सारखा बाहेर पडतो व बरोबर आंतून एक मजबूत व सफाईदार बारीक दोर हा बाहेर पडतो. हा दोरा फार लांब असून त्याचा उपयोग सुई दोऱ्याप्रमाणेंच कपडे शिवण्यांत करतात या वरून या झाडास "सुई धाग्याचें झाड" असेच तिकडील लोक ह्मणतात.

या झाडाचीं मुळें खाण्यास चांगलीं असून गरीब लोक त्यांवर आपली उपजिविका चालवितात. पानें मजबूत असल्यामुळें झावळ्या प्रमाणें तीं घरावर घालण्याच्याही उपयोगीं पडतात; इतकेंच नाहीं तर त्या पानाच्या रसाची एका तऱ्हेची उत्तम मिठाई बनवितात. जून दोऱ्याच्या मजबूत दोऱ्या अथवा कापड करतात. एकंदरींत ह्या एका झाडापसून सर्व कुटुंबांचें रक्षण होण्यासारखें आहे. न्या० सु०

शिकागोला जाणारा एतद्देशीय जादुगार मुंबईस आपल्या हातचलाखीच्या वगैरे अद्भुत खेळांनीं लोकप्रिय झालेले जादुगार मि नथू मंछाचंद हे येत्या ता० १ एप्रिल रोजीं शिकागो येथें जाण्यासाठीं मुंबईहून निघणार. हे जादुगार युरोपियन जादुगारांपेक्षाही मोठे; कसबी व वाकब आहेत अशी त्यांची प्रसिद्धी असून अमेरिकेचे मुंबईस असलेले कान्सल मि. ब्यालंटाईन यांणी प्रोफेसर नथू मंछाचंद यांचे अद्भुत खेळ बघितले असून त्यांच्या प्रेरणावरूनच प्रो. नथू मंछाचंद हे शिकागोला जात आहेत. कांचा गिळणें, बाटल तेथील साप धरून तो अंगावर चालविणें, तोंडातून सुया गिळून डोळयांतून काढणें, वगैरे प्रकारचे अद्भुत खेळ सदर प्रोफेसर करून दाखवितात. व हे सर्व खेळ शिकागो येथें दाखविण्यांत येतील.

बेडकांचे पिक— फ्रेंच लोकांस बेडूक फार आवडतात. बेडकांची लोणची हा त्यांचा अत्यंत रुचिकर व स्वादिष्ट पदार्थ होऊन बसला आहे व त्यासाठीं त्या प्राण्यांचा विपुलता जेथें असेल तेथें फ्रेंच व्यापाऱ्याचे गुमास्ते जाऊन मिळतील तितके बेडूक मिळवितात; व त्याच प्रमाणें करवतील तितके बेडूक उत्पन्न करितात. अमेरिकेंत मिसिसिपी नदीच्या कांठीं शेंकडों एकर लांबीच्या मैदानांत दलदलीच्या जागीं बेडकांची लागवड करून तेथें लक्षावधि बेडूक उत्पन्न करण्यांत येतात. ही बेडकांचीं शेतें मोठ्या काळजीनें लागवड करून राखण्यांत येतात. प्रतिदिवशीं सकाळी हजारो बेडकां करितां गिऱ्हाईकांची दाटी होते. न्या० रि०

---

हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांणीं छापून प्रसिद्ध केलें.

सालअखेर " ७ " १८
किरकोळ अंकास ........................४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ........०१

Single copy............................4as

Advertisemen
Below 10 lines... 2Rs
per line over10... 4 as
Repetition perline 3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXVII AKOLA MONDAY 24 APRIL 1893 NO. 16

वर्ष २७ आकोला सोमवार तारीख २४ माहे एप्रील सन १८९३ इ० अंक १६

## CLEMENTS TONIC

### दुखणेकऱ्यास संजीवनी

### क्लेमेंटचें टानिक.

( दुनियेचा पौष्टिक दवा )

क्लेमेंटचें टानिक ही रामबाण, त्वरित, आणि काय ती एकच खात्रीची औषधि आहे. तिच्या योगें मज्जूंतील क्षीणता, शरीराचा ऱ्हास, चेतनाशक्तीचा हीनपणा, साधारण अशक्तता, कण्यांतलि थकवा, धातुश्राव आणि दुष्ट हवा, मनस्वी क्लेश, दगदग, दुर्व्यसन, दुरुपयोग, मूर्खपणा अगर अविचार या पासून शरीर क्षीण होऊन ज्या व्याधि जडतात त्या सर्व व्याधि व रोग दूर होतात.

क्लेमेंटचे टानिक स्वाभाविकपणेंच मनुष्याच्या शरीराला हुषारी आणते, क्षीण व अशक्त मनुष्यास तजेला व शक्ति देते. कमकुवत मनुष्यास सदृढ, बळकट व वीर्यवान बनवितें आणि नाजूक स्त्रिया बांध्यानें मजबूत व पाणीदार अशा करितें.

तरुण, मध्यम वयाचे, व म्हातारे पुरुष व स्त्रिया यांस खात्रीचे गुणावह औषध म्हणजे क्लेमेंट टानिक असें आढळलें. शारीरीक मानसिक मनस्वी दगदग, दुःख, उघड्या हवेंत राहणे, गुप्तस्राव, छांदिष्टपणा यां पासून ज्यांना विकृति जडतात अथवा ज्यांनीं अज्ञानपणानें व खोडसाळपणानें प्रकृति बिघडून घेऊन स्वतांवर अनेक दुःखें ओढून घेतलीं त्या सर्वांस याचा गुण आला आहे. शरिर क्रमाक्रमानें थकत चाललें असतांना त्या ऱ्हासाचीं लक्षणें या औषधानें ताबडतोब नाहींतशीं होतात आणि कमी कमी झालेल्या शक्ति पूर्वी प्रमाणें जोमदार होऊन प्रकृति निकोप होते. मुख्य मुख्य इंद्रियें कमताकत झालीं, मेंदू बिघडला, शरीराचे व मनाचे व्यापार कुंठले, विचारांचा घोटाळा झाला, ज्याचा त्याला भरंवसा वाटेनासा झाला, स्वभाव अनावर व शीघ्र कोपी झाला, उदासीनता व भित्रेपणा वाटला, गुडघे व पाठ थकली, छाती धडधडूं लागली, वातशूल झाला, कंबरेत सलका मारल्या तसेंच पाटींत दुखणें वेळोवेळ दात दुखणें अवयव तिडकणें झोंप नाहींशी होणें, कपाळ दुखणें पहाटेस थकवा येऊन अवयव दुखणें, मूत्रपिंड व मूत्राशय यांची आग होणें लघवी पांढरि होणें परमा व गुप्तस्राव यांनीं धातुपात होणें या व्याधि झाल्या अथवा स्त्रीपुरुषास आपल्या जन्मांतलीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या बजावण्यास नालायक करणारा व त्यांच्या कामांत व्यत्यय आणणारा असा मानसिक व शारिरीक कोणताही आजार झाला तर या सर्वांवर क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय ठरला आहे व ठरत आहे.

क्लेमेंटचें टानिक हें खरोखरीच मनुष्यमात्रास एक ईश्वरी देणगीच मिळालेली आहे हें घेतल्या बरोबरच आपला रोगनाशक अद्भुत प्रभाव दाखवूं लागतें. याविषयीं घेणारांची साक्ष सर्वत्र व विश्वसनीय अशी आहे. ते म्हणतात कीं, याच्या प्रत्येक भागानें गुण येऊं लागतो. हें ज्ञानतंतूची जबरदस्त शक्ति वाढविणारें टॅानिक असून हें शरीरांतील सर्व अवयवांना व स्नायूंना ज्ञान तंतू योगानें पूर्व स्थितीवर आणणारें शक्तिदायक सत्व पोहोंचवितें; इतकेंच नाहीं पण तीक्ष्ण रोग थकवा, मेहनत, अतिश्रम अथवा कित्येक कुकर्मांच्या योगें शरिरप्रकृति अशक्त झाली असली, किंवा जोंवर ज्ञानतंतूंची अशक्तता, साधारण किंवा स्थानिक अशक्तता चालूं असेल तोंवर कोणत्याही कारणानें अशक्तता आलेली असली तरी हे औषध घेतल्यावर गुण आल्यावांचून राहणार नाहीं. जोपर्यंत क्षीणता व ज्ञानतंतूंची अशक्तता हींच रोगाचीं कारणें असतील तोंपर्यंत, क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय आहे.

रोग्यांनीं लक्षांत ठेवावें कीं क्लेमेंटचें टानिक हेंच एक खात्रीचें औषध आहे, सर्व गांध्याकडे व बाजरांत तें विकत मिळेंत F. Moor Clements.ही सही पेटीच्या बुडाशीं व वरच्या भागीं पाहून त्याची खात्री करून घेतांनां सावधगिरि ठेवावी, आणि जे नकली औषधें विकतात त्यांच्या पासून घेऊं नये. 'क्लेमेंटचें टानिक 'नांवानें शोध करा, आणि तेंच अस्सल औषध घ्या. हाड, मज्जा, व स्नायु ही यानें बनतात, आणि रक्त व मेंदु यांना हें फार मानवतें. हें घेतल्यानें प्रकृति सदृढ, बळकट, ताकतदार, आणि जोमदार होते आणिं दुनियेंत या सारखी ईश्वरी देणगी दुसरी नाहीं.

इंडियांतील एजंट—केंप आणि को, ट्रेचर आणिको मुंबई, बाळंटाईन को; स्मिथ, स्टानिस्टिट को, बेनन को, कलकत्ता; डब्ल्यू इ. स्मीथ को, मद्रास; एन. एस. फरनानडो, कोलम्बो; आणि सर्व ठोकळ व किरकोळ गांध्याचीं दुकान.

F. M. Clements, Inventor Sydney, Australia.

## उन्हाळ्याच्या शाळा.

(आमच्या एका शिक्षक मित्रा कडून.)

उन्हाळ्या दिवसांत कित्येक शाळांस महिना दीडमहिना सुटी देतात, कित्येक एक वेळच्या सकाळीं भरवितात आणि कित्येक दोन्ही वेळा भरवितात पण त्यांत दोन प्रहरची शाळा उशीरानें करितात. हायस्कुल, इंग्रजी—मराठी शाळा, व प्राथमिक शिक्षणाच्या शाळा यांतून वरील प्रकार फेरफारानें दृष्टीस पडतात. या सुट्या, व वेळांतील फरक उन्हाळ्या निमित्त आहेत आणि या सोयी ऋतुमाना मुळेंच होत असतात तर त्या वऱ्हाडा सारख्या अति उष्ण प्रांतांत फार आवश्यक आहेत. उष्ण मुलुखांत उन्हाळा इतका प्रखर होत असतो कीं हातांतील कामधाम सोडून मनुष्यास विसावा घेत बसणें भाग होतें आणि त्या कारणा वरून ऐन दोन प्रहरच्या घटका दोन घटका शाळांचीं कामें तहकूब असतात.

या सर्व गोष्टी खऱ्या आहेत तथापि मला ही व्यवस्था " चांगलीशी वाटत नाहीं. मूळ उद्देश आणि या व्यवस्थेचे परिणाम हीं अगदीं भिन्न स्वरूपाचीं दिसून येतात. पहिला प्रश्न असा कीं वरील फेरफाराच्या तजविनी शिक्षकांस गैरसोयीच्या असतात किंवा नसतात? एका महिना भराची सुटी ज्या शाळांस असते त्यांतील शिक्षकांस हक्काची रजा निराळी मिळत नाहीं. उन्हाळ्या निमित्त सुटी असल्यानें त्यांस अन्य वेळीं भरपगारावर रजा मिळत नाहीं. विद्यार्थ्यांस शिकविलेले विषय महिनाभराच्या सुटीनें मलीन होतात, बहुतेक पुन्हा शिकवावे लागतात आणि त्या मुळें शिक्षकांचें काम जितकें चांगलें व्हावें तितकें नजरेस पडत नाहीं. शिवाय विद्याभ्यासाच्या वयांत शिक्षक व विद्यार्थी यांचा सहवास जितका निकट व सततचा राहील तितका तो त्या वयांत फलद्रूप चांगला होत असतो. पण दरसाल एक महिन्याची सुटी फक्त उष्णकाला मुळें झाल्यानें हें साहचर्य कमी घडतें इतकेंच नाहीं तर त्या पासून वरील अनिष्ट परिणामही घडतात. आपल्या प्राचीन पद्धती प्रमाणें गुरुगृहीं बारा वर्षें वास करून विद्या संपादण्याचा मार्ग कोणिकडे आणि अलिकडील पद्धति कोणी कडे? अलिकडील शिक्षण क्रमांत सहवास, साहचर्य, पूज्यभाव वगैरे उत्तम संस्कारास तिलांजली मिळते.

विद्यार्थ्यां संबंधानें या प्रश्नाचा विचार केला तर बालपण व तरुणपण या अवस्थेंत ज्या महिनाभराच्या सुट्या, व दोन प्रहरच्या सुट्या मिळतात त्या निरर्थक, तापमूलक, व व्यासंगच्छेदी होतात. अभ्यासाच्या पूर्व वयांत शालागृहाची कैद मोठी विलक्षण व अत्यंत कल्याणप्रद असते. ही कैद नसती तर स्वेच्छाचार, उच्छृंखलपणा व मूढपणा हीं जडून मनुष्य निरुपयोगी, आत्मघातक, व समाजाला अपायकारक बनला असता. खेळ, अभ्यास, व निद्रा हीं रहाट गाडग्याच्या फेऱ्या प्रमाणें एका मागून एक पूर्ववयांत व्यवस्थशीर नियमानें चाललीं तर त्यांचा परिणाम फारच हितकारक होत असतो. अशा वयांत महिनाभराची सुटी अगदीं नको असते. ती मिळाल्यानें आपल्यावर कोणी महिनाभर शास्ता नाहीं असा समज होतो आणि त्या पासून मुलांची बुद्धि, संवयी, व गृहशिक्षण यांच्या मानानें कमजास्त तोटे होत असतात. तसेंच सकाळीं शाळा भरवून दोन प्रहरीं सुटी दिल्यानें खेळाडू विद्यार्थी उन्हास जुमानतात व घरीं थंडसे एका बाजूस बसतात असा आमचा अनुभव नाहीं.। खरोखर उन्हाळ्यांत ज्या सुट्या दिल्या जातात त्यांचा दुरुपयोग उन्हांतच होत असतो असें बहुत वेळा घडतें. त्यांचे अभ्यास कमी होतात, त्यांचा काल वृथा जातो, आणि नऊ दहा महिन्यांच्या संवयी दोन महिन्यांनीं समूळ नाहींतशा होतात.

सणावाराच्या व इतर किरकोळ सुट्या माफक व वेळोवेळ मिळत गेल्या तर त्यांज पासून विद्यार्थ्यांस विसांवा मिळतो, त्यांचे अभ्यास तरतरीत राहतात व त्यांना अधीक अभ्यास करण्यास दुप्पट जोर येतो. सारांश, पुष्कळ दिवसांच्या सुट्या शाळांना असूं नयेत असा आमचा अभिप्राय आहे. परंतु हल्लीं शिकण्यासाठीं मुलें आईबापा पासून दूर येऊन शहर गांवीं रहात असतात तेव्हां अशा विद्यार्थ्यांस आपापल्या घरीं राहण्यास वर्षांतून एक दोन वेळा या मोठ्या सुट्या मिळाल्यानें सवड असते. खरोखर, ज्या मुलांस आपल्या वडीलधाऱ्या मंडळीच्या सानिध्यानें विद्या करण्यास मिळत नाहीं तीं मुलें अभागीं समजलीं पाहिजेत. तेव्हां अशा दुर्दैवी मुलांस लांब लांब सुट्या पासून थोडा बहुत फायदा होईल हें आह्मी कबूल करितों पण त्यांच्या साठीं भाग्यशाली मुलांस त्यांच्याच पायरीला आणवून बसवावें लागतें. तथापि एखादी मोठी सुटी देणें झाल्यास निदान उन्हाळ्यानिमित्त तरी नसावी. वार्षिक परीक्षा आटोपल्या नंतर दसऱ्या दिवाळीला लागून महीनाभराची सुटी दरसाल देत असतात ती आमच्यामतें पुरेशी आहे.

उन्हाळ्या निमित्त हायस्कुलांस व इंग्लिश—मराठी शाळांस सुटी देतात तीच प्राथमिक शाळांस दिली जात नाहीं याचें कारण असें सांगतात कीं प्राथमिक शाळा ठिकठिकाणीं असल्यामुळें बाहेरगांवचीं मुलें फार नसतात. हें कारण यथार्थ दिसतें तरी तें वर झाल्या प्रमाणें अहितकारक आहे.

पावसाळ्या, हिंवाळ्या प्रमाणेंच उन्हाळ्यांतही शाळा चालाव्यात असें आह्मी दर्शविलें पण त्याचा एक मोठी अडचण दिसते. सध्यां वऱ्हाडांत जीं शालागृहें आहेत तीं उन्हाळ्यांत फार पीडाकारक होत असतात. खेड्यापाड्यांतलीं शालागृहें पाहिलीं म्हणजे मुलांस बसण्या संबंधानें अनेक गैरसोयी असतात असें आढळून येईल. उन्हातापाची बाधा कमी होईल अशी त्या शालागृहा पासून आशा करणें व्यर्थ असतें. शालागृहें उष्णकालाला योग्य करण्या साठीं सरकारी कचेऱ्या.............रुई १०नाळ्याच्या त-

## वर्तमानसार.

त्या वगैरे योजना शालागृहांतून झाल्या पाहिजेत. सरकारी कचेऱ्यांतून वरील गोष्टी नित्याच्या कामा साठीं केलेल्या असतात. पण कचेरीवाल्या लोकांस सुखसमाधानींत ठेऊन त्यांच्या कडून आपलीं कामें करून घेण्या पलिकडे सरकारचा हेतु नसतो. (ज्या खात्यांतील सरकारी कामें बिनबोभाट वरील व्यवस्थेशिवाय होण्या सारखीं सरकारास वाटतात किंवा तीं होत असल्याचा परिपाठ आहे तेथील कामदारासाठीं सरकार कितपत काळजी घेते हें लहानसहान कचेऱ्या, पोस्ट आफिसें वगैरे पाहिलीं म्हणजे कळून येईल.) तेव्हां सरकारी कचेऱ्यांतून उन्हाळ्या निमित्त ज्या व्यवस्था असतात त्या शालागृहांतून कां असूं नयेत? शालागृहाच्या सोयी अगोदर झाल्या पाहिजेत. सर्व राष्ट्राची समूळ इमारत शालागृहांतील बालसमूहावर उभारावयाची असते. त्यांच्यावर सर्वांची भिस्त. त्यांच्या साठीं आपण योग्य लक्ष्य पुरविलें नाहीं तर ते आपल्या पिढी विषयीं काय ह्मणतील बरें? त्यांच्या मनांत आपल्या विषयीं पूज्यबुद्धि जागृत असावी असें आपणास वाटत असेल तर आपण अगोदर त्यांच्या शालागृहांतील सोयी पाहिल्या पाहिजेत. ज्या महाराणी सरकारच्या राज्यावर सूर्य कधींच मावळत नाहीं त्या पराक्रमशाली, भाग्यवान व लोककल्याणकारी महाराणी सरकारचे न्यायाची कचेरी भव्य-रमणीय, व मौल्यवान असली पाहिजे असें एक न्यायाधीश मद्रासेस नव्या इमारतींत आपली कचेरी भरविते वेळीं बोलले त्याच प्रमाणें आह्मी निःशंकपणें वऱ्हाडांतील शाळाखात्याचे वरिष्ठांस सूचवितो कीं त्यांनीं शालागृहें उन्हाळ्या साठीं विद्यार्थिदेशाला उपभोगक्षम, आल्हादकारक व व्यासंगाला उद्दीपक अशीं ठेवण्या विषयी अगोदर तजवीज केली पाहिजे. उन्हाळ्यांत घरीं राहण्या पेक्षां शालागृहांत काल घालविणें सुखकर आहे अशी विद्यार्थ्यांच्या मनानें धांव घेतली तर आमच्या मतें शाळाखात्यांत या एका पिढींत एक मोठी सुधारणा झाली असें मानूं.

वऱ्हाडसमाचार

मित्ती वैशाख शुद्ध ९ शके १८१५

सन १८९२ सालीं हिंस्र पशु व विषारी सर्प यांनीं २२० मनुष्यें व १४९१ जनावरें ठार केलीं. चित्ते व बिबळे वाघ, अस्वलें, लांडगे वगैरे वनश्वापदा कडून मनुष्य ३१ मारलीं गेलीं तरी त्यांचा हल्ला गुराढोरावर फार मोठा होत असतो तो एवढा कीं १४९१ जनावरा पैकीं १२९२ त्यांच्याच मुखीं बळी पडलीं. सर्पांच्या विषा पासून मनुष्यांची प्राणहानि १८९ झाली आणि ही संख्या भरंवसा लायक मानली तरी प्रांताच्या मानानें बुलढाणे

प.रि०, चाले.
his reply to

जिल्ह्यांत लांडग्याचा उपद्रव मनस्वी आहे म्हणून लांडगेमाऱ्यास उत्तेजन देण्यासाठीं प्रत्येक लांडग्याच्या शिकारी बद्दल १० रुपये पर्यंत इनाम वाढविण्या विषयीं कर्नल स्पानस्की साहेबांची सूचना आहे. त्या जिल्ह्यांत ३२ नेटीव शिकारी इसमांस बंदुकीचे परवाने देण्यांत आले असून ज्या भागांत हिंस्र पशु अधीक असतील तिकडे शिकारी लोकांचें लक्ष्य वेधण्या साठीं स्पानस्की साहेब खुद्द कांहीं विशेष तजवीज व खटपट करीत असत. वणी जिल्ह्यांतील पुष्कळ जनावरें हिंस्र पशूंनीं मारलीं आहेत म्हणजे १४९१ पैकीं ९१६ जनावरें याच जिल्ह्यांत वन्य श्वापदांच्या भक्षस्थानीं पडलीं. इलिचपूर जिल्ह्यांत गुराच्या मरणाची संख्या ४३ एवढी अल्प आहे. आणि त्यांत विशेष गोष्ट ही कीं त्याच जिल्ह्यांतील मेळघाट तालुक्यांत मोठमोठीं जंगलें असून देखील थोडीं गुरें मेलीं.

सन १८९२ सालीं १७९ चित्ते व बिबळे वाघ, ११ अस्वलें, १९३ लांडगे, ७१ तरस आणि ८९ सर्प मारले गेले. आकोले जिल्ह्यात ६१ लांडगे मारले. वरील प्राणभक्षक जनावरांची शिकार करण्या बद्दल इनाम दाखल रुपये ४१३८॥ वाटण्यांत आले. बंदुकीचे परवाने बाळगणारे इसम सर्व प्रांतांत ४३९९ आहेत. या परवान्या पैकीं बहुतेक शेतीवाडीच्या रखवाली साठीं लोकांनीं काढले असून कांहीं निवळ लग्न समारंभांतून बंदुका मिरविता येण्या साठीं व स्वतांचा इतमाम व सरंजाम डामडौलाचा दाखविण्या साठीं बंदुकीचे परवाने लोक घेत असतात. शिकारीच्या पेशानें अगर शोकानें परवाने घेणारे लोक थोडे आढळतात आणि हरिणें डुकरें वदकें वगैरे निरुपद्रवी व गरीब प्राण्यांची शिकार करण्या पेक्षां वाघ, लांडगे वगैरेची शिकार करण्यास नेटीव लोक धजत नाहींत असा कर्नल मेकंझी यांनीं शेरा दिला आहे. हरिणें, डुकरें वगैरे प्राणी भक्षा साठीं मिळत नाहींत म्हणून वाघ व लांडगे चवताळतात आणि त्यांची मोठी धाड गुरावर पडते. नेटीव लोक खऱ्या शिकारीचे भोक्ते नाहींत म्हणून युरोपियन लोकांसच हिंस्र पशूंची शिकार करावी लागते. कमिशनर साहेब स्वकीयांची फुशारकी मारतांना म्हणतात कीं जंगी शिकार मारण्याला युरोपियन अधिकाऱ्यास वेळ सांपडत नाहीं ही गोष्ट सुमार होय. नेटीव शिकारी कातड्याच्या व शिंगाच्या व्यापारावर पैसा कमविण्याच्या नादानें वाघ वगैरेच्या घातुक शिकारीला जात नाहींत असें ही त्यांचें म्हणणें आहे. तेव्हां अखेर कामिशनर साहेबांचें मागणे काय आहे हें मात्र आम्हांस कळत नाहीं. कामानें नाडलेल्या शिकारी साहेबांस सर्व प्रांतभर शिकार करण्याचें कमिशन द्यावें असा तर त्यांच्या लिहिण्याचा रोख नसेलना! परंतु आम्हास हें पक्कें ठाऊक आहे कीं बहुतेक साहेब शिकारीला निघाले म्हणजे त्यांच्या समवेत जे नेटीव शिकारी असतात ते साहेबांची मेहरबानी संपादण्या साठीं सर्व शिकार साहेबां साठीं तयार करून त्यांच्या गोळीच्या आटोक्यांत आणून उभी करितात आणि नंतर साहेब बार काढून शिकार आपलीशी करितात. शिवाय नेटीव लोकांस परवान्या शिवाय शस्त्रें बापरण्याची मुभा नाहीं व त्यांस कायदेबाज पणानें शस्त्रहीन करून सोडलें आहे त्याअर्थीं वाघाऱ्यास ज्यांना शिकारीचा अशा युरोपियन लोका समोर ते हार पदाकदाचित गेले तरी त्यांत गोऱ्या लोकांचा मोठासा पुरुषार्थ तो कोणता!

नबाब मेंदिहसेन जे पूर्वीं निजाम सरकारचे प्रायव्हेट सेक्रेटरी होते आणि हल्लीं जे कामावरून दूर आहेत यांनीं नऊ दहा महिन्यापूर्वीं मि. मित्र नांवाच्या मनुष्यावर अब्रूनुकसानी बद्दल फिर्याद केल्याचे आमचे वाचकांस स्मरतच असेल. हा खटला चालू झाल्या पासून ज्या नानाविध गोष्टी उजेडांत आल्या व जीं कृष्ण कारस्थानें उमगून पडलीं आणि जीं अनेक लचांडें व व्यूह रचण्यांत आले हें सर्व लक्ष्यांत घेतलें म्हणजे हा एवढा काळ लागला हा फार लागला नाहीं असें दिसून येईल. मूळ खटल्याचा उगम असा कीं ज्या मडमशीं नबाब साहेबांनीं आपल्या तरुणपणांत लग्न लाविलें त्या बाई साहेब लग्नापूर्वीं व्यभिचारांत रत होत्या आणि लग्नानंतर ही छोटे सर सालरजंग यांच्याशीं रत होण्यास त्यांना नबाबांची आज्ञा होती अशा मतलबाचा मजकूर मि. मित्र यांनीं पुस्तक रूपानें प्रसिद्ध केला आणि त्यांत नबाब साहेबांच्या विवाहीत स्थितीला प्रतिकूळ, अब्रूस बट्टा लावणारी आणि कुलाला कलंक आणणारी गोष्ट मि. मित्र यांनीं केली तेव्हां याज बद्दल त्यांना पारिपत्य मिळावें आणि आपण पूर्ववत् अब्रूस चढावें या करितां नबाबानीं भगीरथ प्रयत्न केला.

इतके दिवस लांबलेल्या या प्रकरणाचा न्यायाधीश मि० बोझांकेट यांनीं निकाल सांगितला आहे कीं, ज्या अर्थीं फिर्यादीनें बेअब्रूचें पुस्तक कोर्टाचे हद्दींत छापलें गेलें असें भरंवसा लायक पुराव्यानीं सिद्ध केलें नाहीं त्या अर्थीं या कोर्टाला या संबंधीं कांहींही निकाल देता येत नाहीं. जर वरिष्ट कोर्ट माझ्या अधिकारांतला हा खटला आहे असें ठरवील तर ह्याचा निर्णय सांगण्यास मी सिद्ध आहे असें न्यायाधिशांनीं कळविलें. पुराव्या वरून हा खटला आपले अधिकाराचे बाहेर आहे असें कळल्या नंतर कोर्टानें बेअब्रू संबंधाच इतर पुरावा आणू दिला आणि आरोपीस बचावासाठीं अन्य पुरावा आणण्यासही परवानगी दिली ही मोठी चूक केली. नबाब साहेबाचा उत्कर्ष सहन न होऊन दरबारी मंडळीनें मि. मित्र यास पुढें करून आपला डाव साधला असें जें फिर्यादीनें अनेक वेळा दर्शविलें आहे. तें खरें किंवा खोटें असो पण निदानीची गोष्ट आह्मास एवढीच दिसते कीं, नबाबांनीं हा खटला चालविला यांत त्यांचा अब्रू वरील कलंक नाहींसा करण्याचा जो मूळ उद्देश तो अद्याप निकाल न झाल्यामुळें सिद्धीस गेला नाहीं.

सर चार्लस क्रॉस्थवेट, वायव्य प्रांताचे लेफ्टेनंट गव्हरनर यांची स्वारी हरद्वार मुक्कामास नुकतीच गेली होती. तेथें लोकांशीं बोलतांना त्यांचें अमर्यादशील, अनुदारबुद्धीचें आणि आत्मस्तुतीचें वर्तन ऐकून आह्मांस त्यांच्या शहाणपणाची मोठी मौज वाटते. हरद्वारास गेल्या यात्रेच्या वेळीं पुष्कळ जणांस हकालून दिलें आणि त्यांचा अनेक प्रकारें छळ झाला ही गोष्ट आमचे सरकारास अनुचित होय अशी जी चोहोंकडे ओरड झाली ती गैर वाजवी केली व तींत सरकारची नालस्ती केली असें जोरदार भाषणानें कळविते वेळीं साहेब मजकूर बेताल होऊन भलतीकडे वाहवले त्यांनीं लोकांना प्रश्न केला कीं, हरद्वार येथें हजारों वर्षांपासून यात्रा भरत आहे तेव्हां तुह्मांवर जे हिंदुराजे व मुसलमान बादशहा राज्य करीत होते त्यांच्या पैकीं कोणी तरी लोकांचे सुखासाठीं हरद्वारास एखादी तरी गोष्ट केली आहे काय?

या उपरोधिक भाषणानें त्यांनीं ब्रिटिश राज्याची जी थोरवी गायिली आणि पूर्वींच्या राज्यांची निंदा केली ती अयोग्य होय. असा क्रम चालूं ठेवणें चांगलें नाहीं इतकेंच नव्हे तर त्या योगें लोकांचीं मनें उलटीं दुषित होतात. इंग्रज सरकारचें राज्य सुखावह आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. आणि त्यांनीं हरद्वारास सार्वजनिक आरोग्य राखण्यासाठीं जी कडक सक्ती केली ती गैरवाजवी आहे असें ही नाहीं. पण जो पर्यंत लोकांना धर्म आरोग्याहून ही जास्त पूज्य आहे तो पर्यंत सक्त हुकूमानें यात्रा बंद करणें निष्फळ होय. लोकांना आपलेसें करून घेण्याची खरी गुरुकिल्ली ह्मणजे हीच कीं त्याना सुशिक्षित करून त्याचे विचार आपले विचारा सारखे करणें होय. लोकांना टोंचून भाषण करण्यांत व त्यांना दोष लावण्यांत व त्यांचा पूर्वींच्या राजांविषयींचा पूज्यभाव नाहींसा करण्यात राज्यकर्त्यांचे ठायीं लोकांचीं मनें सप्रेम रहात नाहींत. ही गोष्ट आमचे आंग्लोइंडियन अधिकारी लक्ष्यांत धरतील काय?

## The Berar Samachar

MONDAY APRIL, 24 1893

The progress report of the Forest. Administration in Berar for the year 1891—92 is the last of its kind which is based on the old classification of the forest areas hitherto adopted. The recent Forest—Law that has been framed for Berar has laid down a new system of classification and the next report will, consequently, appear in the modified form. In the report under review Mr. F. B. Dickinson, the officiating Conservator, has spaired no pains to make it a full and complete story of the year's working of forests. The minor details and the figures with which the reportbristles all through, make it a less interesting reading and tires out the patioence of even a student of it. We hoped, to have a fair and general idea of the forest—progress but

our disappointmens is great as regards the main body of the report. The review of the report by the Commissioner, the Resident, and the Government of India has noted down many points of general interest and public utility.

Properly speaking, a forest—department ought to be attractive for students of the science. Those who have a special liking for this branch of study should be encouraged to prosecute an efficient study of the science of forest. Such an encouragement is only possible when the Government reserves some of the posts within its gift for men who have obtained diplomas from schools like the Imperial Forest-school at Dehra Dun. The Berar Government has neither invited the attention of the young generation nor has it afforded opportunities for the advanced students in the province. There should be instituted some scholarships to attract students to the most distant northern School at Dehra Dun. We are aware of the advantages that the Government of India has put forth for the successful students of that School but the difficulties that lie in the path of a Berari youth are too many to need a mention in detail. A forest school is, indeed, a novelty to many a province and it will require a long time before a school of that sort enrolls a large number of candidates and turns out equally a good number of successful students to fill the enviable places in the forest department. We must, however, be grateful to Mr. Dickinson, because he knew the importance of the matter and asked us to draw through our columns public attention to the calendar of the forest school at Dehra Dun for the necessary information on the subject. But it is most desirable that the Conservator should call upon the Director to take up the question in right earnest so that they may adopt a decisive and effective step in the direction to create a new field for students of Berar with chances of high emoluments in the forests administration.

We have noticed in our last issue the remarks of the Commissioner on the great important question of the great scarcity of fuel. In order to make fuel cheap he has proposed two different alternatives. The great consumere of fuel are the mills and the factories in the province and Colonel Meckenzie asks the proprietors to use coal in lieu of fire-wood. The coal mines at Warora afford plenty of coal but it requires in his opinion a protective duty to make wood as dear as or even dearer than coal so that the mills may be prohibited from using wood. Such a protective tax as this the higher authories are rightly inclined to disapprove of. It stands on no economic principle to subject the highly useful and productive mills and factories with restrictions of a distrubing nature. The other proposal to meet the want of fuel is to wrest from the land—holders the *potkharab* ( पोट खराब ) along the banks of rivers and nalas and to preserve them as grass and fuel reserves. The Government of India feeling the importance of the question and being half satisfied with the second alternative have called for such measures and proposals as are deemed necessary the well-being of the country and community. We are, therefore, sanguine in our hopes that both the Resident and the Commissioner will settle, for some years at least, tha fuel problem in the most satisfactory manner.

When Mr. Plowden was in our midst, he has already anticipated in his reply to the address at Akola the remarks of the India Government on the other important question of pasture fields. We are aware that he pointed out the inequalization of the grazing lands and not the want of them is the grievance of the province. The following paras from the orders of the higher authorities are worth a full perusal and lay down observations as to the future reforms which should be effected on the principle noted therein:—

"The policy of opening some of the Demarcated State Forests to grazing upon payment of a double fee and for limited periods was no doubt a judicious measure, having regard to the special circumstances of the past season. And the arrangements which are being made for setting apart blocks for grazing in rotation and for excluding foreign cattle are all in the right direction. The Commissioner has not noticed the very important question of the adequacy or otherwise of the existing rates charged for grazing. This matter should be gone into and proposals for such changes as may be deemed advisable submitted for the Resident's orders."

Upon this view of the Resident the India Govt. makes the following remarkable suggestion:—

"The observations on cattle grazing contained in the Report and in your review have been read with interest. Adverting to the remarks of the Con. servator on these subjects, the Government of India consider that the refusal to allow grazing privileges to persons other than agricultural residents of the villeges adjoining the forests is warrantable, wherever scarcity of fodder exists or is apprehended. Cattle necessary for the *bona fide* requirements of the agricultural population should usually be allowed the first claim to such grazing as may be available, but it is no part of the duty of the Forest Department to provide pasture for an unlimited number of animals, many of which can be of little or no no service for agriculture and must die in seasons of scarcity. The cattle belonging to banjaras and other professional graziers, who rely entirely on the profits derived from milking and breeding, might reasonably, if admitted to graze at all, be charged a higher scale of fees than that demanded for agricultural cattie. It is understood that this subject will be specially treated in the Report for the current year."

## वऱ्हाड

कप्तान आर. पी. कोलम्ब आसि. कमिशनर, आकोला यांनीं गेल्या १७ वे तारखे पासून ९० दिवसांची हक्काची रजा घेतली आहे. त्यांचे कामाचा चार्ज रा० रा० विश्वानाथ नारायण दांडेकर एक्स्ट्रा. आसि० कमिशनर यांनीं घेतला.

मि० जी० सी० सुब्रापलू नायडू तहशीलदार आकोट यांस तेथील म्युनसिपालिटीचे समासद नेमिलें आहे.

पुढील महिन्याचे १ ले तारखेपासून कुमार श्री हरबानजी रावजी असि० कमिशनर, यवतमाळ यांस दीड महिन्याची हक्काची रजा मिळाली.

मि. आजिजुद्दीन ए० अ० कमिशनर हे गेल्या जानेवारी अखेर फारीन सर्व्हिसवर बलुचिस्थानाकडे गेले होते ते पुढील महिन्यांत परत वऱ्हाडांत येणार आहेत असें समजतें

आकोल्यास नवीन आलेले वनस्पतीचे

डाक्टर रा. रा. कृष्णराव पवार यांनीं येथील बोहरी मि. तय्यब अली अब्दूल अली यांच्या बायकोस रक्तपितीच्या महाव्याधी पासून बरें केलें असें खुद्द सदर्हू बोहरी सांगतो.

### नोटीस

राघो वल्लद मंगाजी टेकाये रहाणार बोरडी तालुके आकोट जिल्हे अकोलें यांसः—

नोटीस देणार सोनाई मर्द राघो राहणार दोनवडे तालुके अकोलें इजकडून नोटीशीनें असें कळविलें जातें कीं, तु माझा लग्राचा नवरा असून तुज पासून मजला कन्याहि एक झाली आहे. कन्या आज सुमार ११ वर्षांच्या वयाची लग्नास आलि आहे. मजला तुह्मी वागवीत नाहीं व अन्नवस्त्र वगैरे बद्दल ही कांहीं तजवीज करीत नहीं. मी आज बरीच वर्षे तुमचें नांवावर कर्ज काढून राहिलें आहे, आतां मजला कर्ज ही कोणी देत नाहीं. व मुलगी ही लग्रास झाली आहे. आज पावतों तुह्मी आला नाहीं व आमच्या उभयतांच्या पोटा पाण्याची कांहींच तजवीज लावली नाहीं. आह्मांस उपाशी रहावें लागतें तर तुह्मास असें कळविलें जातें कीं नोटीस पावल्या पासून दिवस (३०) चे आंत माझे व पोरीचे इतके दिवसाचे खावटीचे रुपये (३००) देऊन आह्मास चांगलें रितीनें वागवाल अशा बद्दल चार जातभाई व पंच यांची खात्री करून देऊन घेऊन जावें. जर असें केलें नाहीं तर आमच्या पोटाची तजवीज करावी. असें झालें नाहीं तर इतके दिवसाचे खावटीचे रुपये (३००) ह्या नोटीशीला खर्च व दरमहा पोटगी बद्दल दिवाणींत दावा करून अखेर निकाल होईपर्यंत जे नुकसान होईल. तें सर्व भरून घेतलें जाईल. ह्मणून मी तुझी हीच सोडचिठ्ठी समजून दुसरा घरठाव करीन मग कोणच्या ही प्रकारचा नवरेपणाचा हक्क तुझा मजवर नाहीं. ह्मणून दिली नोटीस सही तारीख २२ माहे एप्रील सन १८९३ इ०

(सही.)

सहीची निशाणी बांगडी सोनाई मर्द राघोजी इच्या हातची असे दतुर प्रसादगीर विठ्ठल गीर गोसावी राहणार मौजे दोनवडे तालुके अकोलें.

### नोटीस

ब्रिजराज वल्लद खडकराम मारवाडी राहणार मोरगांव वाघाचे तालुके बाळापूर यांस नोटीस देणार गोंडी वल्लद तुळशींग पाटील राहणार मोरगांव यांज कडूनः—

नोटीशीनें असें कळवितों कीं, आह्मी तुह्मास आमचा इमला असलेली जागा व मळा गहाण दिलें व त्याचे कागदही रोख रुपये दस्तऐवज करून देऊन घेतले. परंतु मळा व वीटबंदीचें घरें या दोन्हींचे रुपये कागद करून घेऊन एक कवडी सुद्धा दिली नाहीं. याज प्रमाणें दस्तऐवज रुपये ५० पन्नासचा घेऊन त्या पैकीं रुपये ३३ तेहतीस दिले. बाकी कागदाचे ही कांहीं दिलें नाहीं. तह्मी आम्हास फसविलें. व तुमचा व्यवहार बरोबर नाहीं. याज करतां तुम्हास ह्या नोटीशीनें असें कळवितों कीं, नोटीस पावले पासून दिवस (३ तीन) आत तुह्मी आमचे सर्व व्यवहार सदरी झालेला याचा हिशोब दाखवून हिशोबानें रास्त रास्त जे तुमचे रुपये असतील ते घेऊन जावे. तुह्मी मळा व वीटबंदीचे घरें व दस्तऐवज रुपये ५० चा घेऊन रुपये (३३) दिलें. बाकी दिले नाहींत. याजला साक्षी वगैरे सर्व आहेत. तर तुमचे जे वाजवी व हिशोबानें रुपये निघत असतील ते सदरील मुदतींत घेऊन जावें असें झालें नाहीं तर निकाल होण्या करितां आह्मास जे खर्च वगैरे लागेल तो व ह्या नोटीशीचा अखेर निकाल होई पर्यंत सर्व तुह्मास द्यावा लागेल. कारण तुमचे वे भरंवशीर धंद्या मुळें व आह्मास बुडविण्याच्या इराद्यामुळें तुह्मी आह्मास विनाकारण खर्चांत घालून त्रास देत आहा याज करितां तुह्मास हे अगोदर कळविलें आहे. काय तो निकाल सदरी लिहिलेले मुदतींत करावा ह्मणून दिली नोटीस सही तारीख २१ माहे एप्रील सन १८९३ इ

(सही)

सहीची निशाणी वखर गोंडी वल्लद तुळसिंग पाटील यांच्या हातची असे.

## जाहिरात.

सर्वत्र लोकांस भगवान वल्लद एकोजी कोळंबकार जात जिरे माळी रहाणार उमरी इतबारपूर तालुके दर्यापूर जिल्हे इलिचपूर याजकडून:—

या जाहिरातीनें कळविलें जातें कीं, आह्मी मारुती वल्लद शामजी रहाणार एकलारे तालुके दर्यापूर जिल्हे इलिचपूर यांस मुखत्यार नेमिला होता. व त्यास रिती प्रमाणे मुखत्यारपत्रही दिलें गेलें आहे. परंतु सदरहू मारुती वल्लद शामजी हा आमचे हुकमा बाहेर व मर्जी बाहेर सर्व प्रकारानें वागला व वागत आहे. याजमुळें आमची सर्व प्रकारची नुकसान झाली व करीत आहे. याज करितां आह्मी त्यांस दिलेलें मुखत्यारपत्र या जाहिरातीनें रद्द केलें आहे. आह्मा करितां सदरहू इसमास कोणी कर्ज देईल, किंवा घेईल, किंवा जामीन घेईल अगर कोणच्या ही प्रकारची देवघेव करील तर आह्मास कोणत्याही प्रकारानें मान्य नाहीं. नफा नुकसान ज्याची त्यांनीं सोसावी. ह्मणून दिली जाहिरात सही तारीख २१ माहे एप्रील सन १८९३ इसवी.

(सही)

भगवान वल्लद येकोजी कोळंबकार दस्तुर खुद्द.

| | |
|---|---|
| हुंडीमुंबईची दर्शनी ........ .... | ९९॥।=॥ |
| " १५ दिवसांच्या मुदतीची.... | ९९॥ |
| सुवर्ण २६॥ .... .... रुपें .... | १०८। |
| मीठ....३॥=।॥....आळशी मापी | १०८ |
| जवस वजनी १०० .... चणे | ६०–६५ |
| गहूं काठे............ ५५ बनशी .... | ८५ |
| साखर.... ३....कराळे.... .... | ३॥ |
| उडीद....३।.... .... मुग | २॥= |
| जवारी ५५— ५७ ....सर्की .... | ६ |
| तूप.... ८॥ .... ............ तेल | ६ |
| कापूस....४५ ............रुई | ६४–७४ |

## वर्तमानसार.